
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५८



REFBK-0005567

# ...िकामपणाची कामगिरी

नों. नं. ११०१८
मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ८५६
स्थळ प्रत

# रिकामपणची कामगिरी

लेखक
राम गणेश गडकरी
ऊर्फ
'गोविंदाग्रज'

दा. क. ५५६७

REFBK-0005567

मूल्य दीड रुपया

परचुरे पुराणिक आणि मं.
ग्रंथ प्रकाशक नि विक्रेते.
माधवबाग, मुंबई

: प्रकाशक :
अनंत मोरेश्वर पुराणिक
परचुरे पुराणिक आणि मंडळी
माधवबाग, मुंबई ४

: मुद्रक :
विठ्ठल नारायण टेंभुर्णीकर
जनता प्रिंटिंग प्रेस, लिमिटेड.
८१७ शुक्रवार, पुणे २

चतुर्थावृत्ति
संवत् २००५

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन.

२५८

" रिकामपणची कामगिरी " या सदराखालीं कांहीं लेखांक लिहून रिकामटेकड्या वेळीं मला जे कांहीं अनुभव आले, ते वाचकांपुढें ठेवण्याचा संकल्प केला आहे. वाचकांनीं सुद्धां अगदीं रिकामपणींच ही वाचनाची कामगिरी उरकून घेण्याची कृपा करावी. म्हणजे या वडवडीपासून कांहीं फायदा झाला नाहीं, तरी वेळ फुकट गेल्याबद्दल बिचाऱ्या 'बाळकरामा 'वर दांतओंठ खाण्याचें कारण राहणार नाहीं.

बाळकराम

जुलै, १९१२

# अनुक्रमणिका


१. वरसंशोधन. १

२. लग्नाच्या मोहिमेची पूर्वतयारी. २७

३. लग्न मोडण्याचीं कारणें. ४३

४. स्वयंपाकघरांतील गोष्टी. ५६

५. कवींचा कारखाना. ६८

१०
सं. नं. ८५८
स्थळ प्रत
११०१९

# रि का म प ण ची
# का म गि री

—बाळकराम.

# प्रस्तावना

काव्य, नाट्य व विनोद या ललितवाङ्मयाच्या तीन महत्त्वाच्या विभागांत अत्यंत मोलाची भर घालून ज्यांनीं आपलें नांव मराठी वाङ्मयांत चिरस्थायी करून ठेवलें असे एकच लेखक म्हणजे कै. राम गणेश गडकरी हे होत. गेल्या पंचवीस वर्षांचा मराठी वाङ्मयाचा इतिहास अवलोकन केला, म्हणजे गडकऱ्यांच्या प्रतिभाशाली लेखनाचें एकंदर मराठी वाङ्मयावर, लेखकांवर व त्यांच्या लेखनपद्धतीवर केवढें जबरदस्त वर्चस्व पडलें आहे हें लक्षांत येईल. गडकऱ्यांच्या प्रत्यक्ष लेखनाची कालमर्यादा १९१० ते १९१९ म्हणजे अवघी ९ वर्षांची होती. या काळांत विद्युल्लतेप्रमाणें झळकणाऱ्या त्यांच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचे तेजस्वी विलास पाहून त्यांच्या वाचकांचे व प्रेक्षकांचे डोळे दिपून गेले, तर त्यांच्या ज्येष्ठ पिढींतील बऱ्याचशा जुन्यापुराण्या लेखकांची व टीकाकारांची पोटदुखीनें त्रेधा उडून गेली! तथापि त्यांच्या गुणांचा जो योग्य गौरव त्यांच्या हयातींत झाला नाहीं, तो त्यांच्या अवसानानंतर गेलीं अठरा वर्षें अव्याहतपणें व अत्यंत उत्साहानें महाराष्ट्रांत होत आहे. हजारों महाराष्ट्रीय तरुण स्त्री-पुरुषांना आपल्या काव्यानें, नाट्यानें व विनोदानें त्यांनीं दीड तपपर्यंत वेड लावून ठेवलेलें आहे. म्हणूनच त्यांचा स्मृतिदिन महाराष्ट्रांतील गांवोगांवीं व शहरोशहरीं साहित्यप्रेमी जनतेकडून अत्यंत भक्तिभावानें पाळला जातो. हें अपूर्व भाग्य गडकऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही मराठी लेखकाच्या वांट्याला आतांपर्यंत आलेलें नाहीं. गेल्या दहापंधरा वर्षांत अनेक कवींना व लेखकांना गडकऱ्यांच्या वाङ्मयानें स्फूर्तीचा उत्साहाचा पुरवठा केलेला आहे; म्हणून हें लेखनाचें युग 'गडकरी युग' म्हणून संबोधण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

गडकऱ्यांचा जन्म गुजरातेंत नवसारी येथें १८८५ सालीं झाला. त्यांचें बालपण गुजरातेंतच गेल्यामुळें गुजराती भाषा ही त्यांना जवळ-जवळ जन्मभाषेप्रमाणेंच येत होती. लहानपणापासूनच गडकऱ्यांना थोडें-बहूत लिहिण्याचा नाद होता. तथापि थोड्याशा स्फुट कविता व एखादें दुसरें छोटेसें नाटक यापलीकडे त्यांच्या लेखनाची मजल त्या वेळीं गेलेली नव्हती. वाचनाचा त्यांना जबरदस्त हव्यास होता. तुकाराम, नामदेव व मोरोपंत यांच्या काव्यांचा व लावणी; पोवाडे-वाङ्मयाचा अभ्यास करून त्यांनीं आपली भाषा कमावून ठेवली होती. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत हे तर त्यांना गुरुस्थानीं होते व स्वतःला काव्याच्या बाबतींत ते 'केशवसुताचे चेले' म्हणवून घेत असत. मॅट्रिक झाल्यानंतर गडकऱ्यांच्या वाङ्मयव्यासंगामुळें त्यांच्या अभ्यासांत खंड पडला व मध्यंतरींच्या काळांत ते 'किर्लोस्कर नाटक मंडळीं'त मुलांना शिकविण्यासाठीं शिक्षक म्हणून राहिले. तेथें त्यांचा नाट्यवाङ्मयाशीं व रंगभूमीशीं प्रत्यक्ष परिचय झाला. त्या काळांत कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे दोन नाटककार नाट्यसृष्टींत चंद्रसूर्याप्रमाणें तळपत होते. संगीत नाटकांमध्यें कोल्हटकरांच्या नाटकांनीं त्या वेळीं श्रेष्ठ स्थान पटकावलें होतें. म्हणून कोल्हटकरांच्या नाटकांचा व लेखनपद्धतीचा गडकऱ्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. व ते कोल्हटकारांना नाटकांच्या बाबतींत गुरुस्थानीं मानूं लागले. किर्लोस्कर मंडळींत असतांना गडकऱ्यांच्या काव्यलेखनाला बहर आला व त्यांच्या नाट्यलेखनाला सुरुवात झाली. प्रल्हाद-हिरण्यकशिपूच्या कथाभागावर त्यांनीं त्या वेळीं 'गर्वनिर्वाण' नाटक लिहिले; पण तें अपूर्ण राहिल्यानें रंगभूमीवर येऊं शकलें नाहीं. १९१० च्या सुमाराच्या त्यांनीं 'प्रेमसंन्यास' हें आपलें गद्य सामाजिक नाटक लिहिलें व तें महाराष्ट्र नाटक मंडळीनें १९११ मध्यें रंगभूमीवर आणलें. सदर नाटकानें अखिल महाराष्ट्राचें लक्ष गडकऱ्यांकडे वेधलें गेलें. हिंदु सामाजांतील विधवांची करूण स्थिती हा या नाटकाचा मुख्य विषय होता. अनुप्रासयुक्त काव्यमय भाषा, थक्क करून सोडणाऱ्या नावीन्यपूर्ण कल्पना, भावना क्षुब्ध करून टाकणारे प्रसंग व खदखदून हसावयास लावणारा निर्मळ विनोद व बुद्धिमान् कोट्या यांची या नाट-

कांत इतकी रेलचेल उडाली होती कीं, एवढ्या भांडवलावर आपण चार नाटकें लिहूं शकलों असतों असे एका विख्यात नाटककारानें त्या वेळीं उद्गार काढले होते. याच सुमारास गडकऱ्यांच्या कविता ‘गोविंदाग्रज’ या टोपण नांवानें ‘मासिक मनोरंजन’ या त्या वेळच्या सुप्रसिद्ध मासिकांत प्रसिद्ध होऊं लागल्या. ‘गुलाबी कोडें’, ‘ स्मशानगीत’, या त्यांच्या आरंभीच्या कवितांनी रसिकांनी मोहिनी घातली, तर ‘ राजहंस माझा निजला ’ या त्यांच्या करुणरसानें थबथबलेल्या कवितेनें त्यांनीं आपलें मराठी काव्यप्रांतातील स्थान एकदम अढळ करून टाकलें; गोंडस व रेखीव रचना, अलंकारिक भाषा, नावीन्यपूर्ण कल्पना व तेजस्वी उत्प्रेक्षा हीं त्याच्या काव्याचीं ठळक वैशिष्ट्यें होत. त्यांचें काव्य हें भावनाक्षोभक नसून बुद्धिगम्य आहे असा आक्षेप त्यांच्या पश्चात् त्यांच्या टीकाकारांनी केला तो बरोबर नाहीं. बुद्धि व भावना हीं मनोव्यापारांची अभिन्न अंगे आहेत. गडकऱ्यांची पुष्कळशी कविता आत्मनिष्ठ (Subjective) नसून बाहिर्निष्ठ (Objective) असल्यानें स्वतःच्या वैयक्तिक भावनांचे उद्रेक त्यांच्या काव्यांत प्रकट झालेले नाहींत म्हणून त्यांच्या काव्याकडे वरकरणी पाहणाऱ्यांना त्यामध्यें भावनेची ओल कमी आहे असा भास होतो एवढेंच. गडकऱ्यांनीं ‘कृष्णाकाठीं कुंडल’ हें ऐतिहासिक कालांतील एका दुखान्त प्रणयकथेवर आधारलेलें खंडकाव्य लिहिण्याचा आरंभ केला होता; पण तें काव्य अपूर्णच राहिलें. ‘पानिपतचा फटका’ हें त्यांचें अगदीं आरंभीचें लिहिलेलें दीर्घकाव्य सामान्य आहे. त्यांची सगळी कविता स्फुट असून गडकऱ्यांच्या निधनानंतर ‘वाग्वैजयंती’ या काव्यग्रंथांत एकत्रित प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे. ‘मुरली’, ‘राजहंस’ व ‘प्रेम आणि मरण’ हीं गडकऱ्यांचीं उत्तमोत्तम स्फुट काव्यें होत असें थोडक्यांत सांगतां येईल. १९१४ सालीं त्यांनीं ‘पुण्यप्रभाव’ हें नाटक लिहिलें, तें ‘किर्लोस्कर नाटक मंडळीनें’ रंगभूमीवर आणलें. हें नाटक म्हणजे आर्यपतिव्रतांच्या पुण्याईच्या पराक्रमाचें एक ओजस्वी उपनिषद्च आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. अत्यंत काव्यमय आणि हृदयद्रावक प्रसंग व तेजस्वी विनोद यांचें सामर्थ्यवान् संमिश्रण या नाटकांत झालेलें आढळून येतें. या सुमारास त्यांनीं स्फुट विनोदी लेखनाला सुरुवात केली.

'रिकामपणची कामगिरी' या मथळ्याखालीं 'बाळकराम' या टोपण नांवानें त्यानी हे विनोदी निबंध मासिक मनोरंजनां'त प्रसिद्ध केले. विनोदाच्या बाबतींत त्यांचे गुरु कोल्हटकर हेच होते. कोल्हटकरांच्या सुदाम्याच्या पोह्यांचा त्यांच्या विनोदी लेखावर परिणाम झालेला दिसून येतो. कोल्हटकरांनीं ज्याप्रमाणें पांडूतात्या, बंडूनाना व सुदाम असें विनोदी त्रिकूट निर्माण केलें, तद्वतच गडकऱ्यांनीं तिंबूनाना, आबाभटजी व बाळकराम ही त्रयी तयार करून त्यांच्याकरवींच आपल्या विनोदाची सिद्धता करविली. समाजांतील अनिष्ट रूढीवर हत्यार चालविण्याच्या उदात्त हेतूनें ज्याप्रमाणें कोल्हटकरांनीं आपल्या विनोदाची साधना केली. तद्वतच हिंदु समाजांत मुलींचीं लग्नें जमविण्याच्या बाबतींत त्यांच्या पित्यांची जी अनुकंपनीय स्थिति होते, ती समाजाच्या नजरेला आणण्याच्या हेतूनेंच त्यांनीं 'ठकीच्या लग्ना'ची मोहीम' काढली. चार्ल्स् डिकन्सप्रमाणेंच गडकऱ्यांचा विनोद वरकरणीं हसवीत असला, तरी आंतून सामाजिक अन्यायाची जाणीव उत्पन्न करून देतो. या लग्नविषयक लेखमालेंतील कित्येक विनोदस्थळें इतकीं अद्भुत व मार्मिक आहेत कीं; तीं वाचतांना वाचकांच्या हसतां हसतां मुरकुंड्या वळल्याशिवाय राहणार नाहींत. विसंगती, विरोधाभास व अतिशयोक्ति यांच्या आधारावरच गडकऱ्यांच्या विनोदाची उभारणी झालेली आहे; त्याशिवाय शब्दनिष्ठ, रूपनिष्ठ कल्पनानिष्ठ, प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ अशा विनोदाच्या सर्व तऱ्हा त्यांच्या विनोदी लेखनांत आढळून येतील. 'कवींचा कारखाना' ही लेखमाला गडकऱ्यांच्या समकालीन कवींपैकीं कांहीं आचरट, तऱ्हेवाईक व क्षुद्र कवींचा उपहास करण्यासाठीं लिहिलेली आहे. या लेखांची भाषा पुष्कळशी क्लिष्ट असल्यानें त्यामधील मार्मिक विनोद सहज प्रकट होत नाहीं. तथापि त्यांतील कांहीं वर्णनें, व कोट्या फारच हृदयंगम आहेत यांत शंका नाहीं. 'स्वयंपाकघरांतील गोष्टी' हा लेख मात्र कोटीप्रचुर विनोदाचें एक निर्मळ उदाहरण आहे यांत शंका नाहीं. त्या वेळीं 'मासिक मनोरंजन' मध्यें कांहीं सुगृहिणी 'स्वयंपाकघरांतील गोष्टी' या मथळ्याखालीं निरनिराळे खाद्य पदार्थ कसे करावेत याविषयीं लेख लिहित असत. त्या लेखांचें हें अत्युत्तम विडंबन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

गडकऱ्यांचा विनोद, विशेषतः नाटकांतील विनोद, अश्लील व पावित्र्य-विडंबक आहे असा त्यांच्यावर कांहीं टीकाकारांचा आक्षेप आहे तो धादांत खोटा व अतिशयोक्त आहे. रूढीच्या दगडांना पावित्र्याचा शेंदूर फासून त्यांची पूजा करणारे जे निर्बुद्ध आंधळे भगत समाजांत आहेत, त्यांच्या हिशेबीं पावित्र्यविडंबन व्हावयाला फारसा वेळ लागत नाहीं; ज्यांची बुद्धि समाजांत फारसें न वावरल्यामुळें माणसाळलेली नसते, त्यांना विनोदाची लज्जत समजणें शक्य नसतें व खेडवळ माणसें ज्याप्रमाणें साध्या थट्टेनेंदेखील मारामारीपर्यंत येऊन ठेपतात, त्याप्रमाणें समाजांतीलही विनोदपराङ्मुख माणसें विनोद पाहिला कीं चिडून आश्लीलतेची व पावित्र्यविडंबनाची आरडाओरड करूं लागतात. गडकऱ्यांच्या विनोदाकडे अत्यंत विकृत व अधम दृष्टीनें पाहणारें एक लहानसें चोपडें ' गडकऱ्यांचा विनोद ' या नांवानें कांहीं वर्षांपूर्वी एका लेखकानें प्रसिद्ध केलेलें आहे. या पुस्तकाचा लेखक अल्पवयांतच आयुष्याला विटलेला व बुरसलेला असल्यानें त्याचें लिखाण अत्यंत बालिश झालें यांत नवल नव्हतें. गडकऱ्यांच्या विनोदानें हजारों लोकांना हसविलें असून महाराष्ट्राची विनोद-समीक्षक बुद्धि जागृत केलेली आहे यांत शंका नाहीं. गडकऱ्यांचे समग्र विनोदी लेख ' संपूर्ण बाळकराम ' या पुस्तकांत समाविष्ट करण्यांत आलेले आहेत. ' पुण्यप्रभावा ' नंतर गडकऱ्यांनीं ' एकच प्याला, ' ' भावबंधन व ' राजसंन्यास ' नाटकें लिहिलीं. ' राजसंन्यास ' हें नाटक अपुरेंच राहिलें. या नाटकांतील भाषा अस्सल ऐतिहासिक काळांतील असल्यानें तो भाषेचा नमुना मराठी साहित्यांत अपूर्व वाटतो. ' एकच प्याला ' हें शोकान्त नाटक मराठी भाषेंतच काय, पण जगांतील कोणत्याही भाषेंत भूषणभूतच ठरेल. ' गंधर्व नाटक मंडळी ' नें या नाटकाचे शेंकडों प्रयोग करून लाखों रुपये मिळविले. ' प्रेमसंन्यास ' व ' पुण्यप्रभाव ' या नाटकांत पुष्कळशी शब्दनिष्ठ असलेली गडकऱ्यांची प्रतिभा या नाटकांत अगदीं निर्भेळ नाट्यात्मक स्वरूपांत प्रकट झालेली आढळते. इतकें परिणामकारक नाटक मराठी भाषेंत दुसरें क्वाचित्च असेल. ' भावबंधन ' हें विनोदी नाटक ' बलवंत संगीत मंडळी ' नें रंगभूमीवर आणलें. या नाटकांतील विनोद अत्यंत बहारीचा असून ' कामण्णा ' ' इंदू–बिंदू ' हीं

पात्रें अजरामर झालेलीं आहेत. हीं दोन्हीही नाटकें गडकऱ्यांच्या निधनानंतर रंगभूमीवर आलीं. १९१८ च्या उत्तरार्धांत गडकरी हे मलेरियानें आजारी पडले व दिवसेंदिवस त्यांची प्रकृति खंगत गेली. शेवटीं हवा बदलण्यासाठीं ते नागपूरजवळील सावनेर या गांवीं आपल्या वडील बंधूंकडे गेले, तेथें २३ जानेवारी, १९१९ रोजीं वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षीं ते निधन पावले. मरणाच्या अर्धा तासच त्यांनीं ' भावबंधन ' नाटकाच्या शेवटचा प्रवेश पुरा करून लेखणी खालीं ठेविली होती.

गडकरी हे जसे प्रतिभाशाली लेखक होते, तसे ते मार्मिक व कोटीबाज बोलणारेही होते. त्यांच्या शब्दाशब्दांत कांहींना कांहीं तरी विनोद व कोटी ही असायचीच. म्हणून त्यांच्याभोंवतीं मित्रमंडळीचा नेहमीं गराडा असायचा. त्यांचीं हीं सर्व सुभाषितें व आठवणी श्री. क्षीरसागरकृत ' गडकऱ्यांच्या आठवणी ' व श्री. वि. स खांडेकरांच्या ' गडकरी व्यक्ति व वाङ्मय ' या ग्रंथांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. गडकऱ्यांचा सर्व जन्म दारिद्र्याशीं झगडण्यांत गेला. त्यांनीं नोकरी अशी फारशी केलीच नाहीं, त्यांचा सारा काळ वाङ्मयव्यासंगांत व लेखनांतच गेला. सरस्वतीचा इतका एकनिष्ठ भक्त मराठी साहित्यांत दुसरा होऊन गेला नाहीं. ते अधिक काळ जगते, तर त्यांनीं मराठी साहित्याच्या अंगावर अत्यंत लेणीं लेवविलीं असतीं यांत शंका नाहीं. म्हणूनच ते वारल्यानंतर डॉ. र. पु. परांजपे यांनीं एका लेखांत त्यांच्यासंबंधीं उद्गार काढले होते.

> " Gadkari was great indeed,
> but still greater in his promise ! "

प्रल्हाद केशव अत्रे

पुणें, १२ जून १९३७

# रिकामपणची कामगिरी

## वरसंशोधन

५५६८

अडला हरि गाढवाचे पाय धरी ॥

—व्यवहारकोश

वसंत ऋतूंत आपल्या या सृष्टीमध्यें केवढाले फेरफार घडून येतात हें नव्यानें कशाला सांगावयाला पाहिजे ? झाडांना पालेवी फुटते, आंब्याला मोहोर येतो, वेलींना फुलें येतात, ठिकठिकाणच्या वक्त्यांना शब्द फुटतात, पांढऱ्या सशांना पोरें होतात, मेंढ्यावरची लोंकर कातरतात, कोकिळेला कंठ फुटतो, छत्र्यांवर नवे अभ्रे चढतात, शहराबाजारांतून खेडेगांवच्या पाहुण्यांना ऊत येतो, मोराला नवा पिसारा फुटतो, कुत्र्यांना लूत लागते, तोरणां-करवंदांचें पेंव फुटतें, कलिंगडें विकावयास येतात, वगैरे हजारों घडामोडींनीं चराचरसृष्टि अगदीं गजबजून जाते. या चमत्कारसृष्टींतच आणखी एका चमत्कारमय फेरफाराची गणना करावयास पाहिजे. वसंतोत्सवाच्या सुमारास अनेक फेरफारांप्रमाणेंच नवऱ्या मुलांची व त्यांच्या आईबापांची माथीं फिरत असतात ! पिसाळलेलें कुत्रें चावलेला मनुष्य ज्याप्रमाणें आगोठीच्या मेघांचा गडगडाट ऐकतांच पुन्हां पिसाळतो, त्याप्रमाणेच मुंजीच्या वाजंत्र्यांचा कडकडाट कानीं पडतांच 'उपवधू' मुलांच्या व त्यांच्या वाडवडिलांच्या अंगीं भिनलेलें अहंपणाचें विषही तडाक्यासरशीं उचल खात असतें. क्षणार्धांत त्यांना आपल्या स्थितीचा, आपल्या किंमतीचा, आपल्या योग्यतेचा, किंबहुना आपल्या स्वतःचाही विसर पडून ते अंकगणिताचें पुस्तक रचणाऱ्या संख्या-पंडिताप्रमाणें सरसहा मोठमोठाल्या रकमा बडबडू

लागतात, आणि बिचाऱ्या मुलींच्या बापांना हीं अवघड उदाहरणें सोडवावीं लागतात. ईश्वराच्या दयेनें मला स्वतःला मुलगी नाहीं! परंतु कांहीं स्नेह्यासोबत्यांबरोबर करमणुकीखातर खेटे घालून या बाबतींत मी जो अनुभव मिळविला आहे, त्याचा फायदा मी उदार बुद्धीनें वाचकांना देण्याचें योजिलें आहे.

या सुमारास प्रत्येक 'नवरबापा'चें मन म्हणजे थोरथोर ऐतिहासिक पुरुषांच्या गुणविशेषांचे प्रदर्शनच बनून जातें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. महंमद गिजनीच्या धनलोभानें तो स्वार्थपरायण होतो, नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेनें तो आपल्या मुलाकडे पाहतो, नाना फडणीसाच्या व्यवहार-कौशल्यानें तो मुलाची किंमत ठरवितो, शिवछत्रपतींच्या धाडसानें वाटेल त्या विजापूरकरांवर तो त्या रकमेचा मारा करतो; आणि नादिरशहाच्या क्रुरपणानें ही रक्कम वसूल करून घेतो. त्याच्या एकाच हृदयांत राजपुतांचा शिपाईबाणा आणि मराठ्यांचा गनिमी कावा हे एकाच वेळीं उचंबळत असतात. अष्टवसूंच्या अंशापासून उत्पन्न झालेल्या भीष्माचार्यांप्रमाणें, अनेक ऐतिहासिक पुरुषांचा हा मानसपुत्रही, मुलाचा अव्वाच्या सव्वा हुंडा घेण्याची भीष्मप्रतिज्ञा करतो, आणि तितक्याच नेटानेंती तडीसही नेतो. स्वतः नवरामुलगा तर हरभऱ्याच्या झाडावरच रात्रंदिवस मुक्काम करून 'बापसे बेटा सवाई' ही म्हण बाजवीपेक्षां फाजील खरी करून दाखवीत असतो. आपल्या अंगच्या लोकोत्तर गुणांनी अनेक म्हणींची नायिका होऊन बसलेली वरमाई तर—परंतु 'अनिर्वर्णनीयं नाम परकलत्रम्!'

अशा प्रकारच्या मनोवृत्तींच्या लोकांशीं प्रसंग पडत असल्यामुळें एका मुलीचें लग्न जमविणें म्हणजे आपली एखादी कविता व एखाद्या प्रमुख मासिक-पुस्तकांतून छापवून आणण्याइतकेंच कठीण कार्य होऊन पडतें! कविता व कन्या या जोडीतलें हें साम्य लक्षांत आलें, म्हणजे कवितेला कवीची कन्यका म्हणणाऱ्या पहिल्या कल्पक मनुष्याची खरोखर तारीफ करावीशी वाटते!

एकदोन पिढ्यांपूर्वीं मुलीच्या बापावर मुलाची परीक्षा पाहण्याची जबाबदारी असे. साधारणतः या परीक्षेंस अक्षर काढणें, श्लोक म्हणणें, एक भलें मोठें पागोटें डोकीवर घालून व लांबलचक अंगवस्त्र उंगाभोंवतीं

लपेटून भावी सासऱ्यासमोर आपला तोल संभाळून नीट बसणें, पत्रावळी लावणें, हेच विषय असत. आमच्या आधुनिक विद्वानांना ही विषयांची यादी पाहून हसूं येईल; परंतु या विषयांच्या मुळाशीं केवढें व्यवहारज्ञान दडी मारून बसलें आहे, याची मात्र त्यांना कल्पनाहि होणार नाहीं. अक्षर काढणें व श्लोक म्हणणें या विषयांच्या आवश्यकतेबद्दल सांगावयास नकोच. सुधारलेल्या स्वरूपांत हे प्रकार हल्लीही आपल्यांत वावरत आहेत, हें थोडा विचार केल्यास पटण्यासारखें आहे. पागोट्याचा प्रश्न मात्र जरा डोक्याला शीण देण्यासारखा आहे खरा; सबब त्याचें स्पष्टीकरण देणें जरूर आहे. एवढें थोरलें बोजड पागोटें जो डोकीवर घेऊन नीट बसतो, तो नवरामुलगा पुढेंमागें बायको डोईजड झाली, तरी तिला नीटपणें वागवून घेणारच, हें या बाबतीवरून उघड होतें. पत्रावळी लावण्यांत मुलांचे व्यवहारोपयोगी ज्ञान दिसून येत असे. पूर्वीच्या चंचल वैभवाच्या काळीं वडिलोपार्जित मिळकतीवर आजन्म अवलंबून राहणें खात्रीचें नसे; तेव्हां अर्थातच अशा प्रसंगांत सांपडल्यास मुलास कांहीं रोजगारधंदा येतो किंवा नाहीं, हें पाहण्यासाठीं पत्रावळी लावण्यास सांगत असत. इंग्लंड, जर्मनी, वगैरे देशांतून राजपुत्रांना, त्यांच्या मुख्य ( राज्य करण्याच्या ) धंद्याखेरीज अडीअडचणीच्या प्रसंगासाठीं पायमोजे विणण्याचा, जोडे शिवण्याचा, किंवा असाच एखादा ( पोट भरण्याचा ) धंदा शिकविण्याची वहिवाट आहे. हें लक्षांत घेतलें, म्हणजे आमच्या पत्रावळ्या पूर्वजांना हसण्याचें कांहींच कारण उरत नाहीं. आतां येथें कोणी असा आक्षेप काढतील कीं, या एकाच धंद्याकडे सर्वांचें लक्ष कां लागावें ? आमच्या आक्षेपकांना आम्ही त्या काळच्या समाजस्थितीचा विचार करण्याची विनंती करितों. पत्रावळी लावण्याचा उपक्रम सनातन नाहीं; त्याचा जोरानें प्रचार पेशवाईत–विशेषतः पेशवाईच्या उत्तर अमदानींत–सुरू झाला असावा. पेशवाईत जेवणावळींना राजाश्रय मिळाल्यामुळें त्या सर्व देशभर प्रचलित होत्या; समाजाचा मोठा भाग त्या वेळीं जेवण व तद्विषयक भानगडींत गुंतलेला असे. अर्थात्, जेवणावळीच्या उपकरणांना नेहमीं जोराची मागणी असावयाची; त्यामुळें पत्रावळीसारख्या महत्त्वाच्या वस्तूंच्या व्यापारांत तितके लोक गुंततील तितके थोडे होते. पत्रावळींच्या व्यापाराला मी हें

फाजील महत्त्व देतों असें मात्र कोणीं अनुमान बांधूं नये. एकंदर भोजनकलेचीच त्या वेळीं चलती होती. सवाईमाधवरावसाहेबांच्या लग्नप्रसंगीं तर सामानसुमानाची यादी करतांना बारभाईंनीं जी बारकाईची मुत्सद्देगिरी दाखविली आहे, तीवरून, आणि दुसऱ्या बाजीरावसाहेबांच्या अमदानींत ताक, किंवा पापड, लोणचें चांगलें केल्याबद्दल कैकांना गांवच्या गांव इनाम मिळाल्याबद्दलच्या ज्या कर्णकथा आहेत, त्यावरून माझ्या म्हणण्याची यथार्थता सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

प्रस्तुत हें परीक्षणाचें वेड नाहींसें झालें आहे. असें होण्याचें कारण शोधून काढणें मात्र फारच कठीण आहे. एवढें मात्र खरें कीं, हल्लीं जांवयाची परीक्षा घेत बसून भागावयाचें नाहीं. पत्रावळी लावण्याच्या कसोटीचा आग्रह धरला, तर बहुशः गुरवाखेरीज कोणाची निवड होणें शक्य नाहीं; आणि आजकालच्या या टोपीच्या अमदानींत पगडबंद जांवयासाठीं हट्ट घेतला, तर तो साठी उलटून गेलेल्या पोक्त नवऱ्यामुलाच्या प्राप्तीनेंच भागवावा लागेल : हल्लीं जो माल मिळेल तो पदरांत पाडून घेण्याकडेच मुलीच्या बापाची अनिवार प्रवृत्ति दिसून येते. नवरामुलगा पुरुषजातीचा असला म्हणजे झालें. मग तो ' बायकांच्या बंडा ' तील जागरूकाच्या म्हणण्याप्रमाणें, परंतु अगदीं निराळ्या अर्थानें, ' चुकून पुरुषाच्या जन्माला ' आला असला तरीसुद्धां, न खलु तद्वाच्यं वधूबंधुभिः !

लग्नाचे मुहूर्त शुक्रोदयकाळींच सांपडत असल्यामुळें वर्षांतून लग्नाचा हंगाम दोनदां येत असतो. पहिला मोसम मार्गशीर्षादि तीन महिने चालतो, व दुसरा बार वैशाख–जेष्ठ या महिन्यांत उडत असतो. या हंगामाच्या आधीं कांहीं दिवस उपवर वधूंचे बाप वरसंशोधनाच्या मोहिमेवर निघतात. या कामगिरीप्रीत्यर्थ ज्या येरझारा घालाव्या लागतात, त्यांना ' जोडे फाडणें ' ही लाक्षणिक संज्ञा दिलेली आहे. पयःप्राप्ति होण्यासाठीं प्रथम गाईच्या सडांना लावण्यासाठीं थोडें पय ( पक्षीं पाणी ) खर्चीं घालावें लागतें. त्याप्रमाणें एक जोडा जमविण्यासाठीं आधीं एक जोडा ( पक्षी खेटर ) फाडावा लागतो, हेंच यांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अमुक एके ठिकाणीं एखादा सजातीय अविवाहित मुलगा आहे, असें

कळल्यानंतर तत्प्रांतीच्या खटपटीची जी स्थिति असते, तिला ' नाद असणें ' किंवा ' ' गळ असणें ' असें पारिभाषिक नांव आहे. लग्न जमवितांना वधूवरांकडे मुख्यतः धार्मिक, व्यावहारिक व शारीरिक अशा तीन दृष्टींनीं पाहावयाचें असतें. पत्रिका पाहणें व गोत्र जमणें या दोन गोष्टींचा धार्मिक बाबींत, आणि हुंडा, कुलशील या गोष्टींचा व्यावहारिक बाबींत समावेश होऊन मुलगी पाहण्याची गोष्ट शारीरिक बाबींत जमा होते. लग्न-निश्चयाच्या या पंचांगांत वरपक्षाची वधूपक्षानें खातरजमा करून द्यावयाची असते आणि या त्रिविध विचारामुळें मुलीची व मुलीच्या बापाची कशी त्रेधा उडते, हेंच वाचकांनीं आतां क्रमशः पाहावयाचें आहे.

ज्या गृहस्थाच्या घरीं आपल्याला जावयाचें असतें, त्याच्या आणि आपल्या सामान्य ओळखीच्या एखादा ' पित्त्या ' गांठून त्याच्यामार्फत प्रथम चंचुप्रवेश करून घ्यावयाचा असतो. ' नमन ' आणि ' प्रास्ताविक विलास ' वगैरे झाल्यावर आपला ' पित्त्या ' मूळ विषयाला सुरुवात करतो. त्या वेळीं तो मुलीच्या बापाबद्दल थोडक्यांत माहिती देऊन " आपल्या बाळासाहेबांकरितां हे आले आहेत " असें सांगतो. आपला दुभाषी वरील माहिती सांगत असतांना मुलीच्या बापानें नवरबापाच्या तोंडाकडे अगदीं गरिबीच्या, सौजन्याच्या, आशेच्या आणि कुलीनतेच्या मुद्रेनें पहावयाचें असतें.

वधूपक्षाच्या दुभाष्यामार्फत या अर्जाची सुनावणी होतांच वरपक्षाकडून त्या विनंतीच्या अकल्पितपणाबद्दल आश्चर्य दाखविण्यासाठीं पहिलेछूट " यंदा आम्हांला कर्तव्य नाहीं, " असा जबाब मिळतो. बाजारांत तिन्ही त्रिकाळीं भरपूर मागणी असल्यामुळें आणि इतर कोणत्याहि कारणानें भाव उतर-ण्याची धास्ती नसल्यामुळें आपला माल पडून राहणार नाहीं, अशी मुलाच्या बापाची खात्री असते ! पायधरणीचा पाया एकदोन अंशांनीं वर चढविण्यासाठींच ही चढेल बेपर्वाई तो दाखवीत असतो. मुलीच्या बापाला या ओढून आणलेल्या चंद्रबळाची जाणीव असते; तरीसुद्धां त्यानें हा जबाब ऐकून कमालीची केविलवाणी निराशा तोंडावर पसरून आपल्या 'पित्त्या'कडे पहावयाचें असतें. यानंतर या मध्यस्थानें व मुलीच्या बापानें हुंड्याची साधारण कल्पना देऊन व आसपासचीं उदाहरणें सांगून

'यंदा कर्तव्य असल्या'ची आवश्यकता पटवून द्यावी लागते. मात्र हुंड्याची कल्पना मुद्दाम सांगावयाची असली, तरी ती ओघाओघाच्या स्वरूपानेंच करून द्यावी लागते. अशा प्रकारें बरीचशी मिनतवारी झाली म्हणजे हे 'कर्तव्यशून्य' महात्मे अंमळ धडपणें बोलूं लागतात, आणि हें वरपांगी अवसान लक्षांत येत असतांहि मुलीच्या बापाला आर्जवाचें सोंग आणावें लागतें. 'गरजवंताला अक्कल नाहीं' म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं !

वर सांगितलेल्या म्हणीची आठवण होतांच आम्हां पौर्वात्यांच्या आणि पाश्चात्य इंग्रजांच्या आचारविचार-कल्पनांत जें दक्षिणोत्तर अंतर आहे, तें ध्यानांत आल्यावांचून राहत नाहीं. इकडे आम्ही 'गरजवंताला अक्कल नाहीं', असें म्हणतों, तर तिकडे इंग्रज लोक 'गरज ही शोधकतेची आई आहे !' असें म्हणून त्याबरहुकूम गरजेचा मारा चुकवितात. आणि उलट 'अक्कलवंताला गरज नसते !' असा आमच्या म्हणीचा व्यत्यास सिद्ध करून दाखवितात. आमच्या हाडींमासीं खिळलेला दुबळा दैववाद, आणि इंग्रजांचा पराक्रमी प्रयत्नवाद इतक्या उठावणीचें अन्यत्र कोठेंहि दिसून येणार नाहीं. त्यांच्या—आमच्या आचारधर्मांतहि हाच फरक ! सभामंडपांतून, देवळांतून आदरबुद्धि व्यक्त करण्यासाठीं आम्ही शरीराचें तळाचें टोंक उघडें टाकतों, तर ते वरचें टोंक उघडें टाकतात. फार कशाला, ज्या लग्नविषयक बाबतीबद्दल मी प्रस्तुत लिहीत आहें, तींतसुद्धां आमच्याकडे मुलीच्या बापानें मुलाकडे धांव घ्यावयाची आणि त्यांच्याकडे मुलानें मुलीच्या बापापुढें तोंड वेंगडावयाचें असतें.

'यंदा आम्हांस कर्तव्य नाहीं !' हें उत्तर वरपक्षाच्या तोंडीं इतकें बसून गेलेलें असतें कीं, तें उच्चारतांना बोलणारा त्यांतल्या शब्दांची मुळींच परवा करीत नाहीं ! अशा चढेलपणाच्या बेदरकारीपणामुळें कधीं-मधीं या वाक्यांत मौजेचे फेरफार घडून येतात. माझे मित्र तिंबूनाना यांच्या ठकीचें लग्न जुळविण्यासाठीं गेलीं दोन वर्षें मी तिंबूनानांबरोबर देशोधडीं खेटे घालीत असतां एका ठिकाणीं मला खालील चमत्कार पाहावयास सांपडला.

एका गरीब गृहस्थाच्या घरीं त्यांच्या 'उपवधू' भावाबद्दल गळ

घालण्याकरितां मी व तिंबूनाना उभयतां गेलों होतों. या गृहस्थाची व माझी साधारणतः ओळख होती; परंतु त्याच्या घरीं जाण्याइतका मोठेपणा मी त्याला त्यापूर्वी कधींच दिलेला नव्हता ! मला पाहतांच सानंद लगबगीनें उठून तो म्हणाला, " ओहोहो ! या, बाळकराम ! आज कोणीकडे पायधूळ झाडली ही ? "

आम्ही आंत शिरतांच, त्या धांदली यजमानानें एका मूळच्या चौकोनी, पण जुनेपणामुळें कोपरें फाटून जवळजवळ लंबवर्तुळ होत आलेल्या सतरंजीवरील केर एका बुरणुसानें झाडून आम्हां दोघांना लोडवजा ठेवलेल्या वळकटीजवळ मोठ्या मानानें नेऊन बसविलें. तिंबूनानांना, वळकटीशीं टेंकून बसवून मीं सतरंजीवर शक्य तितकीं भोकांचीं बेटें चुकवून बसण्याचा प्रयत्न केला. वळकटींतल्या कापसाचाही सपाट पसरटपणा जाऊन हजारों गुठळयांमुळें ठिकठिकाणीं त्यांचे संघ निर्माण झाले होते. वळकटीच्या या उंचसखल पृष्ठभागाशीं आपल्या सपाट पृष्ठभागांचा कसा तरी सलोखा संभाळून तिंबूनाना स्वस्थ बसण्यासाठीं सारखे चळवळ करीत होते. जवळच एक जुनाट आरामखुर्ची उपयोगशून्यतेमुळें स्वतःच आराम घेत पडून आपल्या नांवाची सार्थकता करीत होती. तिच्या तुटलेल्या वेताचें जाळें अजागळ मनुष्याच्या शेंडीप्रमाणें—पण—अधोमुख—लोंबकळत असून, बसावयाच्या जागीं एक पायमोडका पाट आडवा टाकलेला होता. सतरंजीच्या त्या बेटांमधून निघून, हिंदु व इंग्रजी अशा दोन्ही आसनांच्या त्या जुनाट संगमाचा फायदा घ्यावा, असेंही माझ्या मनांत एकदां येऊन गेलें; परंतु मीं स्वीकारलेल्या पोक्त कामाच्या मोठेपणाला अशी हुच्चपणाची थारेपालट शोभणार नाहीं, म्हणून तो बेत रहित केला.

नमस्कारचमत्कार होऊन हवापाणी वगैरे अनावश्यक बाबतींबद्दल बरेंच बोलणें होईपर्यंत तो गृहस्थ माझ्याशीं इतक्या अदबीनें व आर्जवानें बोलत होता कीं, मला मिळत असलेल्या या सन्मानाचा तिंबूनानांवर काय परिणाम होत आहे, हें पाहण्यासाठीं त्यांच्याकडे चारसहा वेळां नजर टाकल्यावांचून मला राहवेना ! पुढें मीं आमच्या येण्याचें कारण सांगितलें मात्र, आणि सारा मनु एकदम पालटला ! त्राटिका नाटकांत कमळेशीं लगट करणाऱ्या पुराणिकाप्रमाणें, सदरील गृहस्थानें अंगविक्षेपांच्या

११०१८

एकदोन हेलकाव्यांमध्यें गादी काबीज करून तिंबूनानांना तेथून पदच्युत केलें ! त्या गृहस्थाचा मूळचा माटीसारखा गोल चेहरा महत्त्व-निदर्शनासाठीं लागलाच नाना फडणीसाच्या चेहऱ्यासारख्या लंबोत्तर झाला. त्याची मानी दृष्टि आमच्यासारख्या क्षुद्र जीवांवरून निघून स्वतःच्या मालकीच्या त्या मोडक्या खुर्चीकडे वळली. तो विचारानें ओथंबलेले जड निःश्वास टाकूं लागला. फाटकी सतरंजी, बळकटीची बेबंदशाही, मोडकी खुर्ची, अंगठे तुटलेल्या वहाणा, स्वतःचें काळें मिचकुट धोतर, घरांत मावेनासें झालेलें दारिद्र्य, वगैरे ऐहिक गोष्टींचा क्षणैक विसर पडून तो उच्च विचारांत भराऱ्या मारूं लागला ! अखेर त्याला मृत्युलोकाच्या वस्तीची आठवण करून देण्यासाठी मी विचारलें, 'मग काय मानस आहे तुमचा ?'

फारच मोठा सुस्कारा टाकून, चिरमुटलेल्या व काळ्याकुट्ट ओठांचे वर्तुळ करून, भुंवया आडव्यातिडव्या उडवून व मान किंचित् उजवीकडे कलती करून तो प्राणी प्रत्येक शब्दानंतर विसावा घेतघेत म्हणाला, '**या जन्मीं आम्हांस कतव्य नाहीं !**'

वाचकहो ! वरपक्षाला स्वतःचें किती विस्मरण पडतें, याची तुम्हीच कल्पना करा !

देशकालपरत्वें जगाच्या पाठीवर निरनिराळ्या बाबतींबद्दल चालीरीतींचें जें विचित्र वैधर्म्य दिसून येतें, त्यांत मानवी लग्नवैचित्र्याइतकें चमत्कारिक दुसरें कांहींच सांपडणार नाहीं ! एकाच काळीं, एकाच देशांत एकीकडे एका पुरुषाला अनेक बायका करतां येतात, तर दुसरीकडे एकाच स्त्रीला अनेक पति करितां येतात ! एकीकडे श्रीकृष्ण परमात्मा सोळा सहस्र एकशें आठ तरुणींच्या अंतःपुरांत गुजगोष्टी करीत बसले आहेत, तों दुसरीकडे पांच नवऱ्यांचा संसार संभाळून सती द्रौपदी अबलाजातीला ललामभूत होऊन बसत आहे. इकडे ब्राह्मणकन्या देवयानीला क्षत्रिय ययातीच्या गळ्यांत अडकविणारें कचाचें वचन तर तिकडे 'द्वारकेचा राणा' अस्वलाच्या पोरीशीं लग्न लावून मोकळा होत आहे ! श्रीकृष्णपरमात्म्याच्या या पशुवृत्तींतसुद्धां 'बसूबिला'च्या सुधारणेची परमावधि दिसून येते, हें माझ्या धर्माभिमानी बंधूंनीं अवश्य लक्षांत ठेवावें. 'बसूबिला'च्या मसुद्याचें वाचन झालें, त्या वेळीं कौंसिलमध्यें भगवान् हजर असते, तर त्या

विलाला उचलून धरण्यासाठीं त्यांनीं आपले चारी हात वर केले असते अशी माझी खात्री आहे. एका हिंदु धर्मानेंच विवाहविधीचे आठ सामान्य प्रकार नमूद केले आहेत; याखेरीज वैयक्तिक स्वातंत्र्याची परवानगी होती ती वेगळीच !

लग्नविषयक प्रत्येक निर्बंधाची अशीच विविध रूपें चालू काळींसुद्धां दिसून येतात. हिंदुस्थानच्या तिकोनी तुकड्यावर लग्नसंबंधानें वधूवरांस सात जन्म जोडून टाकण्यांत येतें, तर आमच्या विरुद्ध भूपृष्ठावरील अमेरिकन लोकांत सातसात दिवसांच्याच करारानें लग्न लावण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. हिंदुधर्माला पिढ्या तुटलेलींसुद्धां सगोत्र वधूवरें पसंत नाहींत, तर मुसलमान, पारशी यांना चुलत बहीणभावडांचा विवाहही मान्य होतो. महाराष्ट्रांतच पहा ना, कोंकणस्थाला मामाच्या गोत्राची वधू खपत नाहीं, तर सारस्वत, कायस्थप्रभृति ज्ञातींत मामाच्या मुलीस वधूत्वाचा प्रथम मान देण्यांत येतो. पांढरपेशा ज्ञातींत मुलीचा हुंडा द्यावा लागतो, तर कुणब्यामाळ्यांत मुलाला पदरमोड करावी लागते. आमच्याकडे आठ वर्षांच्या मुलीला चोवीस वर्षांचा नवरा पहावा लागतो, आणि कांहीं गुजराती जातींत आठ वर्षांच्या मुलाच्या गळ्यांत चोवीस वर्षांच्या मुलीची घोरपड बांधण्याची वहिवाट आहे. वैवाहिक वैचित्र्याची यापुढची पायरी म्हणजे मुलामुलांची, किंवा मुली-मुलींचींच लग्नें लावणें हीच होय, असें वाटत नाहीं का ?

आमच्याकडे लग्ननिश्चयाचीं, विशिष्ट जातिपरत्वें ठळक पुसट स्वरूपाचीं पण सामान्यतः सार्वत्रिक अशीं, पांच अंगें आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. कुलशील पाहणें, गोत्र जमणें, पत्रिका जमणें, मुलगी पाहणें आणि हुंडा ठरविणें असा या पंचांगाचा सामान्य अनुक्रम देतां येईल.

कुलशीलाच्या बाबतीचा बहुतेक उल्लेख वधूपक्षीय दुभाषी आपल्या प्रास्ताविक, भाषणांतच करीत असतो. मात्र कुलशीलाच्या शाब्दिक चडबडीवरून, वरपक्ष आपल्या कुळाशीं समानगुण अशा कुळाची अपेक्षा करीत असतो, असें मात्र वाचकांनीं सुतराम् समजूं नये ! लग्नखर्चाच्या नक्की रकमेचें अंदाजपत्रक कळण्यासाठींच वरपक्षाची ही धडपड असते.

वधूपक्ष बराचसा दरिद्री दिसला, म्हणजे वरपक्ष 'यंद्वा आम्हांस कर्तव्य नाहीं' याच निश्चयाला चिकटून बसतो !

या नंतर गोत्र जमतें कीं नाहीं हें पहावयाचें असतें. सगोत्र वधूवरें असून मुळींच चालावयाचें नाहीं, हा या बाबतींत मुख्य नियम आहे. याशिवाय कांहीं गोत्रांचें परस्परांशीं पटत नाहीं. अशीं न पटणारीं गोत्रेंही अर्थात् परस्परांना वर्ज्य! कांहीं पोटजातींत तर मामाच्याही गोत्राला पटेल, असें प्रतिगोत्र पहावें लागतें. कोंकणस्थांसारख्या कमी गोत्रांच्या जातींत बापाच्या गोत्राशीं आणि मामाच्या गोत्रांशीं दुहेरी सलोखा संभाळून असणारीं गोत्रें हुडकून काढतांना फारच यातायात पडल्यास नवल नाहीं. गोत्रगोत्राचें परस्परांचे न पटण्याचें कारण माझ्या मतें, त्या त्या गोत्रांच्या कुलपति ऋषींतील प्राक्कालीन तंट्यांतच असलें पाहिजे. अर्बुद गाईच्या विनिमयालासुद्धां कबूल न होणाऱ्या वसिष्ठाची गाय ज्या विश्वामित्रानें अखेर दरोडा घालून नेली, त्याच विश्वामित्राच्या कुळांतील कन्या, मग तिच्याबरोबर एक सोडून छप्पन्न गाई आंदण मिळाल्या म्हणून, पत्करावयाला कोणता वसिष्ठगोत्रोत्पन्न तरुण तयार होईल ? आम्हां आर्यांच्या या ऋषिकालीन गोत्रजा'द' वैराच्या चिकाटीकडे पाहिलें म्हणजे 'रोमिओ अँड ज्युलिएट' मधील सरदार घराण्यांचें, शिरक्याभोंसल्यांचें, किंवा 'या अहमदशहाच्या आज्यानें माझ्या काकाचा खून केला,' म्हणून जळफळणाऱ्या राणा भीमदेवाचें द्राविडी प्राणायामाचें वैरसुद्धां कमकुवत वाटूं लागतें !

गोत्रानंतर पत्रिकेचा मान असतो. कांहीं दिवसांपूर्वीं माझें पत्रिकेचें ज्ञान इतकें मर्यादित होतें कीं, आमच्या घरच्या कार्यांतून नेहमीं पत्रिका जमविणाऱ्या आबाभटजींनासुद्धां त्या बाबतींत माझ्यापेक्षां जास्त कळत असे, असें म्हटलें तरी चालेल. पण गतवर्षीं तिंबूनानांच्या ठकीचें लग्न जमविण्याच्या खटाटोपानें, हल्लीं मी पत्रिका जमत नसल्यास तीमध्यें बेमालूम फेरफारच्या लबाड्या करण्याइतकें ज्ञान संपादन केलें आहे. गोत्र जमवितांना काळाच्या बाबतींत जी दूरवर नजर फेकावयाची असते, तीच दूरदृष्टि पत्रिका जमवितांना स्थळाच्या बाबतींत वापरावयाची असते. युगांतरींच्या वसिष्ठवामदेवांचें तंटे अद्यापि चालू ठेवण्यासाठीं जसें गोत्रभेदाकडे पाहण्याचें

आम्हीं व्रत पत्करलें आहे, तसें पत्रिकेच्या वाटाघाटींत आमच्यापासून आणि परस्परांपासूनही कोट्यावधि कोसांवर भटकणाऱ्या ग्रहगोलांचें हाडवैर चालावयाचें आहे. फरक एवढाच कीं, पहिल्या वैराची जबाबदारी साऱ्या कुळावर असते, आणि दुसरें फक्त व्यक्तिपर असतें.

पत्रिका जमविण्याचा प्रकार अंमळसा विश्वविद्यालयाच्या परीक्षांप्रमाणेंच आहे. सर्वोत्कृष्ट पत्रिका जमविण्यास एकंदर ३६ गुण जमावे लागतात; परंतु असा योग क्वचितच येतो, म्हणून कमींत कमी १८ गुण मिळाले तरी चालेल, अशी सवलत ठेवण्यांत आली आहे. मात्र हे शेंकडा पन्नास गुण मिळवितांना एखाद्या पत्रिकेच्या पोटविषयांत नापास होऊन चालत नाहीं. हे पोटविषय आठ असून त्यांच्या गुणांची आंकडेवारी ठरलेली आहे; ती येणेंप्रमाणें—वर्णगुण १, वश्यगुण २, तारागुण ३, योनिगुण ४, ग्रहगुण ५, गणगुण ६, राशिगुण ७, आणि नाडीगुण ८. यांतील प्रत्येकाच्या बारकाया सांगूं लागलों, तर आधींच आवांक्याबाहेर घसरत चाललेला हा लेख भलतीकडे वाढेल; म्हणून केवळ ग्रहापुरतेंच लक्ष देण्याचें ठरविलें आहे.

ग्रहांची आपसांत तंटे करण्याची शक्ति इतकी जबर आहे कीं, आम्हीं हिंदु लोकांनींसुद्धां त्यांच्याकडून धडे घेतले पाहिजेत! वस्तुतः त्यांना भांडण्याचें कोणतेंच कारण दिसत नाहीं. मंगळाखेरीज बाकीच्या कंगालां-जवळ आमच्या पृथ्वीप्रमाणें वातावरणाचें पांघरूणसुद्धां नाहीं! आकाशांतल्या पोलिसलोकांनीं या भटक्या मंडळींवर उडाणटप्पूचा खटला भरला, तर त्यांपैकीं एकालाहि उदरनिर्वाहाचें योग्य साधन दाखवितां येणार नाहीं. नाहीं म्हणावयाला, आम्हां हिंदूंवर कडी करण्यासाठीं आमच्याप्रमाणेंच काळ्या रंगाच्या आणि उघड्या अंगाच्या शनीनें मात्र, अन्नवस्त्राची तरतूद न करतां अडीअडचणीच्या वेळेसाठीं हातांत दोन सलकडीं ठोकून ठेविलीं आहेत!

ही ग्रहांची सांपत्तिक स्थिति झाली. परंतु अशा स्थितींतही त्यांचीं भांडणें सारखीं चाललेलींच आहेत. तसेंच, आठ परदेशी आणि नऊ चुली, या म्हणीप्रमाणें आमच्या पूर्वजांनीं ग्रहांचा तंटेखोरपणा लक्षांत घेऊन, प्रत्रिकेंत नऊ ग्रहांसाठीं बारा घरें बांधून ठेविलीं, तरी त्यांना सुखासमाधानें राहतां येत नाहीं! एखाद्या वेळीं सारे ग्रह दोनतीन घरांतच

दाटीदाटीनें वसति करून व बाकीचीं घरें ओसाड पाडून, पत्रिकेला विजापूर हंपीसारख्या उजाड पडलेल्या प्राचीन शहरांचें वैभव आणतात; तर एखाद्या वेळीं, इंग्लिशमनप्रमाणें एकेका घरांत एकेकजण राहून पत्रिकेला लोणावळें, महाबळेश्वर यांसारख्या हवाशीर ठिकाणांचा नकाशा बनवितात. पण असें दूरदूर राहिल्यामुळें ग्रहांतली भाडणें कमी होतात, असें मात्र मुळींच नाहीं! एकाच घरांत असलेले ग्रह परस्परांवर ज्याप्रमाणें सहजच पुरी नजर ठेवून असतात, त्याप्रमाणें ते दूरदूर असले तरीसुद्धां त्रिपाद, द्विपाद किंवा एकपाद अशा प्रकारच्या वांकड्या नजरेनें एकमेकांकडे पहावयास सोडीत नाहींत. ग्रहांच्या शुभमित्रभावाची कारणेंही अनादिसिद्ध असून आतां त्रिकालाबाधित अशीच आहेत. उदाहरणार्थ, चंद्रानें गुरुपत्नीशीं केलेला गर्ह्य प्रकार गुरूनें आकल्पान्त विसरणें शक्य नाहीं, ग्रहांच्या शत्रुमित्रत्वाचा जोर त्यांच्या राहत्या घराच्या परिस्थितीवरच अवलंबून असतो. तथापि कमीअधिक प्रमाणावर त्यांचें तंटे अव्याहत चालूच असतात. दहाबारा वर्षांखालीं आपल्याकडे कांहीं ठिकाणीं रक्ताचा पाऊस पडल्याची भुमका उठली होती. पुष्कळांनीं त्या गोष्टीची भाकडकथेंत जमा केली; परंतु माझी मात्र अजून अशीच समजूत आहे कीं, त्या वेळीं सप्तग्रहीसारखा ग्रहसंमीलनचा एखादा योग असावा. ग्रहांचा स्वभाव लक्षांत घेतला, म्हणजे वरील गोष्टींत अशक्य असें कांहींच वाटत नाहीं. त्यांतल्या त्यांत, मंगळाची वागणूक इतर ग्रहांहून फारच हेकडपणाची असते. आधीं त्याचा ताळमेळ पाहून मग बाकीच्या मंडळीचा सलोखा जमवावा लागतो. युरोपियन पुराणांतरीं मंगळाला वीररसाधिपति म्हटलें आहे, तें फारच अनुरूप आहे. इतर ग्रहांप्रमाणें हा शिपाईगडी भटभिक्षुकांच्या मध्यस्थीनें दानें, जप, वगैरे अटींवर तहनाम्याला कधींच तयार होत नाहीं. सर्व ग्रहांचे स्थानानुरूप परस्परसंबंध लक्षांत घेऊन, वधूवरांच्या दोन पत्रिकांवरून लग्न निश्चित करतांना बिचाऱ्या जोशीबुवांना सर्व राष्ट्रांचें हिताहितसंबंध डोळ्यांसमोर ठेवून दोन राष्ट्रांचा तह घडवून आणणाऱ्या मुत्सद्याइतकीच सावधगिरी बाळगावी लागते.

पत्रिका पहाण्याच्या व गोत्र जमविण्याच्या या धार्मिक खटाटोपाचा फोलपणा दाखविण्यासाठीं सुधारक लोक पुढील सारांशाचा युक्तिवाद करीत

असतात. युरोपियन किंवा इतर लोकांमधील वैवाहिक संबंध, गोत्रांकडे लक्ष दिल्यावांचून, आणि ग्रहांच्या गुणधर्मांऐवजीं वधूवरांचे गुणधर्म पाहून, घडवून आणलेले असतात, तरीही त्यांची वैवाहिक स्थिति आमच्याइतकी, किंबहुना आमच्याहूनही अधिक सुखावह होत असते; त्याचप्रमाणें, आमचें ज्योतिःशास्त्र स्वतःच ओरडत असतें कीं, जन्मवेळेची नोंद घेण्यांत एका क्षणाची चुकामूक झाल्यास पत्रिकेंत जमीनअस्मानाचे फरक घडून येतात, आणि आमच्याकडे तर मुलांच्या जन्मकाळासंबंधीं जन्मवर्षच काय तें साधारणतः बरोबर सांगतां येतें ! अर्थात् मुलाच्या जन्मानंतर दोनचार वर्षांतच पत्रिका करण्याचा सुयोग आला, तरच जन्मशक तरी बिनचूक हातीं लागण्याचा संभव—पुढें तोही नेमका सांपडणें दुरापास्तच ! आतां कांहीं आईबापें मुलाचा जन्ममाससुद्धां एखादे वेळीं नेमका सांगतात; परंतु हें केवळ अपवादात्मक आहे. कधीं कधीं मुलाचा जन्म दिवसाच्या कोणत्या वेळीं झाला, याचा अंदाज लागून वर्ष—वार—तिथि ही सारीं अंतरतात. पुराणांतरी श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, वगैरे पुण्यपुरुषांच्या जन्मवेळा याच सूक्ष्मपात्रदर्शक तत्त्वावर नमूद करून ठेविलेल्या आहेत. महिना, तिथि, वार, घटका, पळें, वगैरे सूक्ष्मतम कालभेद 'चारदशांश स्थळांपर्यंत' बिनचूक देऊन, पुराणमुनींनीं वर्षाच्या बाबतींत ठोकळमानानें शतकाचें तर नांवच नको, सहस्रकाचा किंवा दशसहस्रकांचासुद्धां उडता उल्लेख केलेला नाहीं ! ( मथुरेच्या कारागृहांत असतांही, श्रीकृष्णाच्या गुप्त जन्माचा बेचूक काल वसुदेवानें कसा माहीत करून घेतला, हें कोडें मात्र माझ्या मनाला सारखें डाचत असतें. ) हल्लींही खेडेगांवांतून मुलाच्या जन्मकालासंबंधीं हीच पुराणरीति प्रचलित आहे. "गाई गोठणीवर आल्या असतील" "गड्याची न्याहारी शेतावर गेली नव्हती." किंवा "मामंजी असे पोथी वाचून उठले असतील" यासारख्या वारेमाप गोष्टींच्या नियमितपणावरूनच बाबूची किंवा बगीची पत्रिका तयार करावी लागते. यामुळें अगदीं दहा वर्षांच्या मुलाचा जन्मकाळ ठरवितांनासुद्धां कालिदास, भवभूति, होमर यांसारख्या ऐतिहासिक विभूतींच्या जन्मकालाबद्दल परस्पर हवाला देण्यांत येतो. आमच्या गांवच्या म्हाळसाकाकूंच्या नान्याची जन्मवेळ विचारली, म्हणजे त्या म्हणतात कीं,

" खालच्या आळींतल्या रखमाकाकूंच्या गोंद्याची पांचवी होती, त्या दिवशीं असा पडत्या प्रहरीं माझा नाऱ्या झाला. " आणि रखमाकाकूंना विचारिलें, तर त्या म्हाळसाकाकूंच्या नाऱ्याचा हवाला देतात !

अशा रीतीनें, आमच्याकडील कुडमुड्या जोशीबुवांवर, त्रैराशिकांतील दोनच राशी हातीं पडल्यामुळें बावचळलेल्या विद्यार्थ्याप्रमाणें, येन केन प्रकारेण पत्रिका तयार करण्याचा अनेक वेळां प्रसंग येतो, आणि अशा अंदाजपत्रिकांवरूनच मुलांच्या लग्नकाळीं धुमाकूळ घालावयाचा असतो !

पत्रिका पाहण्याच्या बाबतींत कांहीं बाप इतका फाजील चौकसपणा दाखवितात, कीं, स्वतःच्या दुष्कृत्याप्रमाणें मुलाची पत्रिकाही कधीं चार-चौघांपुढें मांडीत नाहींत ! आणि ' सांगून आलेल्या मुलीची ' पत्रिका स्वतः किंवा स्वतःच्या विश्वासांतील ज्योतिषाच्या सहाय्यानें त्या गुप्त पत्रिकेशीं ताडून पाहतात. परंतु गरजवंतांच्या सोईसाठीं हें येथें सांगून ठेवितों कीं, अशा अडचणीच्या प्रसंगीं क्वचित् त्या जोशीबुवांस ' नक्कलफी ' देऊन हस्तगत करून घेतां येतें. कधीं कधीं तर, वधूपक्षाचें आणि वरपक्षीय जोशीबुवांचें अशाच ऐहिक मार्गांनीं सख्य जमून येतांच पाहिल्या मुकाबल्यास एकमेकांशीं मुळींच न पटून घेणाऱ्या उभय पत्रिकांतील ग्रहांचेंही पुढें शक्य होतें. ग्रहांचा आमच्यावर जसा परिणाम होत असतो, तसा आमचाही ग्रहांवर होत असतो, यांत मुळींच संशय नाहीं !

त्याचप्रमाणें गोत्रांच्या अडचणींतून सफै पार होण्यासाठीं आमच्या धार्मिक कामधेनूनें सवड ठेविली आहे. आपली मुलगी एखादा भिन्नगोत्रीय मुलाला दत्तक देऊन अगदीं सगोत्र वधूवरांचासुद्धां विवाह घडवून आणतां येतो. आमच्या धर्मांतल्या निर्बंधाचा कडकपणा आणि त्यांतून मोकळीक मिळविण्याचे मार्ग, हीं दोन्ही मानवी मतीला खरोखर कुंठित करून सोडणारीं आहेत !

या तीन कलमांतून पसार झाल्यानंतर मुलगी पाहण्यावर मजल येऊन ठेपते. या वधूपरीक्षेंत साधारणतः गाय, म्हैस किंवा घोडीं घेतांना दाखविण्याइतकीच व्यावहारिक अपूज्यबुद्धि दाखवावयाची असते. मात्र ही परीक्षा नवऱ्यामुलाच्या बापानें किंवा दुसऱ्या कोणी तरी करावयाची असते. स्वतः वराचा यांत कांहींएक संबंध असतां कामा नये ! आणि तें

गैर आहे, असें धर्मलंड सुधारकांखेरीज कोण म्हणेणार? उघडच आहे. गाय किंवा घोडी घेतांना ज्याप्रमाणें गड्याला किंवा मोतद्दाराला विशेष अधिकार नसतो, त्याप्रमाणें या बाबतींत मुलालाही फाजील उठाठेवी करावयाचा हक्क रूढीनें दिलेला नाहीं. या वधूपरीक्षेच्या धोरणांत आमच्या पूर्वजांची व्यवहारकुशलता ओतप्रोत दिसून येते. अशी रूढी नसती तर प्रत्येक नवऱ्यामुलानें 'मला ही बायको नको' 'मला ती आवडत नाहीं' असा पोरखेळ चालवून विवाह जमविण्याचें काम दुष्कर करून ठेविलें असतें. लग्न जमविण्याच्या साऱ्या भानगडींत हा एवढाच भाग काय तो सुकर आहे, असा माझा सार्वत्रिक अनुभव आहे. इग्लंडांतील बॅरिस्टरांच्या परीक्षेंती विद्यार्थ्यांप्रमाणेंच पाहण्यास आणलेली मुलगीही सहसा नापास होत नाहीं!

परंतु, बॅरिस्टरच्या परीक्षेस बसण्याची पात्रता येण्यासाठीं ज्याप्रमाणें आधीं चांगलाच हात सोडावा लागतो, त्याप्रमाणें वरसंशोधनाच्या बाबतींत हुंड्यासाठीं पिशवीचें तोंड अगदीं मोकळें सोडावें, तेव्हांच वरपक्षाचें इतर बाबतींत कुरकुर करणारे तोंड बंद होतें! या कार्यक्रमांत हुंडा ही अनुक्रमानें शेंवटची व महत्त्वाच्या दृष्टीनें अगदीं पहिली बाब आहे. या बाबतींत प्रतिपक्षाचें तडजोडीनें समाधान करणें शक्य नाहीं. 'करणी' ही हुंड्याची अर्धांगी असून 'पोषाख' हें या सुवर्णमय जोडप्याचें पिल्लूं होय! साधारणतः मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या मुलाची किंमत सुमारें एक हजार रुपये असून भिन्नभिन्न जातिपरत्वें ती वाढत जाते; परंतु मुलगा घरचा फारच गरीब—अगदीं अन्नास मोताद—असा असला, तर मात्र त्याच्या शिक्षणासाठीं, म्हणजे आणखी चार वर्षें दरमहा फक्त पंचवीस—तीस रुपये द्यावे लागतात. शिक्षणाच्या मानानें ही रक्कम हजार रुपयांपासून पुढें दोनतीन हजारांपर्यंत उड्या मारीत जाते. कांहीं कांहीं जातींतून या हुंड्याच्या दडपशाहीमुळें मुली आजन्म अविवाहित ठेवण्यापर्यंत पाळी येऊन ठेपली आहे. हुंडा देण्याची चाल ऋषिकालीन असून 'एक गाय' देण्यापासून तिची सुरुवात झालेली आहे. कोणी किती हुंडा द्यावा, याबद्दल सामान्य नियम कधींच घालतां येणार नाहीं; परंतु या बाबतींत पिढीजाद श्रीमंतापेक्षां सुशिक्षित गरिबांतच विशेष हावरटपणा—अगदीं निर्दय

हावरटपणा—दिसून येतो. कॉलेजांतील विद्यार्थ्यांना स्वतःची किंमत सोळाशें-सतराशेंपर्यंत सांगण्यांत कांहींच वाटत नाहीं. मग घरची स्थिति कुबेराच्या उलट टोकाशीं असली तरी हरकत नाहीं ! अबदागिरीच्या जहागीरदारापेक्षां चौपदरीच्या जहागीरदारालाच उलट जास्त आवसान येत असतें. हुंड्याची वाटाघाट चालवितांना साधारण बाजारहाटांतली ' बेपारी ' भाषाच वापरण्यांत येते. ठराविक रक्कम उकळून घेण्याचीं अनेक कारणें सांगण्यांत येतात. कोणी कुळाचाराची सबब पुढें आणिताता, तर कोणी मुलाच्या विद्वत्तेचे गोडवे गातात. कोणाला चारपांच मुलींसाठीं स्वतः दिलेल्या रकमेची स्वतःच्या एकाच मुलाच्या हुंड्यांत भरपाई करून घ्यावयाची असते, तर कोणाला मुलाच्या शिक्षणाचा सारा खर्च वसूल करावयाचा असतो. एका गृहस्थानें तर मुलाच्या शिक्षणाच्या खर्चाचें इतक्या बारकाईनें व बिनचूक टिपण ठेविलें होतें कीं, मनुष्याच्या यत्किंचित् कृत्यांचा जमाखर्च ठेवणाऱ्या चित्रगुप्तानें सुद्धां त्यापासून जमाखर्चपद्धतीचे धडे घ्यावे ! एक पैशाच्या दुध्यापेन्सिलीपासून तों कॉलेजच्या फीपर्यंत सर्व रकमांची त्यानें नोंद ठेविली होती. याशिवाय एकवीसाव्या वर्षापासून मुलाला दरमहा किती पगार मिळूं शकला असता, त्याचा अंदाज बांधून ' प्रमोशन ' सकट त्या रकमेची जमेकडे भरती केली होती. सदर रकमेला मारवाडी दृष्टीनें चक्रवाढव्याजाची जोड देऊन या सर्व आंकडेमोडीसाठीं कारकुनाच्या मेहनतीबद्दल—ती कामगिरी स्वतःच पत्करल्यामुळें व साधारण कारकुनापेक्षां आपली लायकी बरीच जास्त असल्याची त्याची दृढ समजूत असल्यामुळें पगाराचें मान वाढणें अर्थातच स्वाभाविक होतें—दरमहा पन्नास रुपयांनीं या कारभाराला मदत करण्यात येत असे. अर्थात् लग्नमितीपर्यंत या रकमेचा फुगारा वाढत राहून तत्पूर्वी पूर्ण हिशेब होणें अशक्य होतें; आणि त्यामुळें या व्यावहारीक अपूर्णांकाकडे पाहण्याचीसुद्धा एखाद्या मुलीच्या बापाची छाती होत नसे ! सरतेशेवटीं, मुलगा वयाच्या दृष्टीनें ' टाईमबार ' झाल्यामुळें, त्याचा भाव उतरून, सलंग रकमेच्या भरपाईबद्दल म्हाताऱ्याची पूर्ण निराशा झाली आणि त्याच निराशेच्या भरांत त्यानें चार आण्यांची अफू खाऊन जीव दिला. म्हाताऱ्यानें मृत्युपत्र करून ठेविलें नसल्यामुळें, मुलाप्रीत्यर्थ आपण खाल्लेल्या अफूचे चार आणे त्या रकमेंत जमा करण्यास

त्यानें सांगितलें होतें किंवा नाहीं, हें समजण्यास आतां मार्ग नाहीं !

हुंडा वसूल करून घेण्याचे वरपक्षाचे अनेक मार्ग आहेत; परंतु ते सारे सर्रहा जहाल असून, 'दाराशीं धरणें घेणें,' 'पायांशीं कपाळ फोडून घेणें,' 'उपासमारीनें ऋणकऱ्याच्या दारीं जीव देणें' यांसारखे त्राग्याचे नेभळट उपाय, या हमाखास उपायांपुढें अगदींच तुच्छ वाटतात. 'टांच,' 'जती', 'हुकूमनामा' यांसारख्या सरळ मार्गांचीसुद्धां इतकी किंमत वाटेनाशी होते. वराच्या गळ्यांत माळ पडण्यापूर्वीं हुंड्याची रक्कम हातांत पडली नाहीं, तर वरपक्ष, कधीं वधूच्या गांवापर्यंत आलेल्या आपल्या गाड्या नदीजवळ थोपवून धरून फिरविण्याची धमकी घालतो, तर कधीं, सीमांतपूजनाच्या वेळीं अडून बसतो; कधीं मुलाचा बाप ऐन वेळीं लग्न फिसकटविण्याचा दम भरतो, तर कधीं नवरामुलगा मुहूर्ताच्या वेळीं लग्नालाच उभा राहत नाहीं. अशा वेळीं अवघड माऱ्यांत सांपडलेला मुलीचा बाप आपल्या स्थावरजंगम मिळकतीची वाटेल त्या पडल्या भावानें वासलात लावून एकदांचा कसा तरी त्या विश्वासमित्राच्या जाचांतून अब्रूनिशीं बाहेर पडतो.

मुलाच्या लग्नाच्या वेळीं हवा तसा जबरदस्त हुंडा हव्या तशा अरेरावीनें वसूल करून घेतां येतो, यामुळेंच आमच्याकडे पुत्रजन्मामुळें बेचाळीस कुळांचा उद्धार होतो, असें समजण्याची वहिवाट पडली असावी. पुत्रजन्मामुळें स्वतःच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होत नसला, तरी निदान व्याहीपक्षाच्या बेचाळीस पिढ्या ठार बुडवितां तरी येतात, हें खास ! एक मुलगा झाल्याबरोबर त्याचीं आईबापें हुंड्याच्या रकमेवर काय काय गोष्टी करावयाच्या, याचा विचार करूं लागतात. हल्लींप्रमाणें प्रमाणाबाहेर हुंडा घेण्याची चाल पौराणिक काळींही प्रचलित असती, तर भारतीय युद्धासारखा प्रचंड अनर्थ बिनबोभाट टळला असता, अशी माझी खात्री आहे. कारण शंभर राजबिंड्या मुलांचा हुंडा येण्याची खात्री असल्यावर, हस्तिनापुराच्या टीचभर राज्यासाठीं, असल्या कुलक्षयकर युद्धाला धृतराष्ट्रानें कधींही संमति दिली नसती ! तेवढ्या हुंड्यावर त्यानें तसलीं छप्पन्न राज्यें परोक्ष घेतलीं असतीं. परंतु, दुर्दैवानें हुंड्यांची चाल त्या वेळीं जोरांत नव्हती. पेशवाईत मात्र हुंड्याचें मान बऱ्याच वाढत्या प्रमाणावर असावें,

असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. कारण, एरवीं, गोपिकाबाईसारखी महत्वकांक्षी स्त्री, माधवरावसाहेब लहान असतांही पानपतवर जावयास निघाले असतां, त्यांना आड आलीच नसती ! लग्न झालेल्या अर्थात् हुंड्याची भरपाई करून चुकलेल्या विश्वासरावांस गिलच्यावर चालून जाण्यास मनमोकळेपणें परवानगी देऊन, कुमार श्री. माधवरावसाहेब व नारायणरावसाहेब या 'उभयता स्वारियांनी मोहिमेवर चालोन जाणें, यासाठीं बाळहट्ट घेतालिया वरि बाईनीं पुढें होवोन, बहुतां प्रकारीं खातर-जमा केलियाहि मूलपणानें मनास आलें नाहींसें जाणोन, अखेरीस जीवेंभावें आणभाक केली जे, पोरबुद्धि न करोन श्रोमंत मुलांनीं वाडियांतच रहाणेंचें करावें.*' श्रीमती गोपिकाबाईसाहेबांना धोरणी व मुत्सद्दी म्हणतात तें उगीच नाहीं ! दुसरी एखादी बाई असती तर तो सोन्यासारखी—सारखीच कां ? अगदीं भरोभार सोन्याच्या मोलाची—दोन्ही पोरें पानपतावर तोफेच्या तोंडीं देऊन, एवढ्या थोरल्या हुंड्याला आंचवली असती ! याप्रमाणें पेशवाईत हुंड्याचें आस्तित्व सिद्ध झाल्यामुळें, तूर्त मी तत्पूर्वीं म्हणजे मराठेशाहींत हुंड्याचें मान कितपत होतें हें ठरविण्यासाठीं ऐतिहासिक कागदपत्रें चाळत आहे. श्रीशिवछत्रपतींनीं एकामागून एक पांचसहा लग्नें केलीं, याचें कारण माझ्या मतें त्यांच्या तुटपुंजा खजिन्यांतच सांपडणार आहे ! छत्रपतीसारखा जांवई मिळत असतांना ते बिजवर किंवा तिजवर आहेत अशा क्षुल्लक कारणामुळें, त्यांना भरपूर हुंडा द्यावयास मागेंपुढें कोण पहाणार ! या बाबतींत सत्यही माझ्या तर्कांबरहुकूमच असल्यास शिव-छत्रपतींच्या आधारावर मी बिजवर तिजवरांना भरहुंडा देण्याची वहिवाट पाडण्यासाठीं साऱ्या महाराष्ट्रभर जारीनें चळवळ सुरू करणार आहें.

वरील शेवटल्या शब्दावरून मी हुंड्याच्या चालीला उचलून धरणारां-पैकीं आहें हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. मीं या मताचा असण्याची

---

* ज्या ऐतिहासिक कागदपत्रांतून प्रस्तुत उतारा घेण्याचें धाडस केलें आहे, त्याची अस्सल प्रत कोरी असतानांच वाण्याच्या दुकांनीं पुडा बांध-ण्यात कामास आली. आमच्या ऐतिहासिक कागदपत्रांची कोण ही शोकदायक दुर्दशा !

अनेक कारणें आहेत. त्यापैकीं एकच येथें दिलें असतां वाचकांचे समाधान होण्यासारखें आहे. हिंदुस्थानसारख्या कमी व्यापाराच्या देशांत, लोक स्थावर मिळकतीला पिढ्यानूपिढ्या चिकटून असतात, आणि अशा प्रकारचें संपत्तीचें एकस्थायित्व अर्थशास्त्राच्या दृष्टीनें, देशाच्या समृद्धीला मोठें घातुक आहे. आतां मुलीचा हुंडा देण्यासाठीं दरसाल हजारों लोकांना घरें दारें विकून मोकळे व्हावें लागतें, ही गोष्ट महशूर आहे. आणि यामुळें आमच्या देशांतला पैसा या हातांतून त्या हातांत सारखा खेळत राहत. आतां यांत अगदीं अडल्या वेळीं सौदा केल्यामुळें व्यक्तिशः प्रत्येकाचा थोडासा तोटा होत असेल हें खरें; परंतु देशकल्याणासाठीं स्वार्थत्यागाला तयार असणें हें प्रत्येक देशभक्ताचें कर्तव्य आहे!

अशा या उपयुक्त चालीला देखील जारीनें आळा घालण्याचे कांहीं जातींतील लोकांनीं प्रयत्न केल्याचें ऐकिवांत आहे; परंतु सनातनाभिमानी पक्षाकडून अशा प्रयत्नांची चांगलीच पिछेहाट होते, ही त्यांतल्या त्यांत संतोषाची गोष्ट आहे. पांढरपेशांतील एका जातीनें तर स्वज्ञातीय परिषदेंत हुंडा न घेण्याचा ठराव करून लोकांकडून त्याबरहुकुम शपथाही घेवविल्या. या जातीचे उपरिनिर्दिष्ट कांहीं लोकांच्या हाडीं खिळलेल्या हुंडेबाजीमुळें सफै फसून अखेर सनातन रूढीचा विजय झाला, हें सांगण्यास मला अत्यंत संतोष वाटत आहे! कारण या शपथा घेणारांपैकीं एका पुढारी सभासदानें त्याच वर्षीं मुलांचा चरचरीत हुंडा घेऊन, तत्समर्थनार्थ असें कारण सांगितलें कीं, "काय करावें, व्याही ऐकेनात; ते म्हणाले, निदान पंधराशें तरी आपण घ्याच!" अरेरे, काय करणार बिचारा अशा प्रसंगांत! अगदींच *लाज नाहीं! कित्येक ग्रामकंटकांनादेखील नाटकवाल्यांच्या हट्टाच्या अत्याग्रहामुळें 'फुकट पास' पतकरावे लागतात, तो तरी अशांतलाच दुर्धर प्रसंग!

मुलीच्या पक्षानें मुलाला हुंडा द्यावयाचा सार्वत्रिक प्रघात आहे. कोठें

---

*शुद्धिपत्र—खिळे जोडणाऱ्याच्या खिळ्याएवढ्या चुकीमुळें येथें मुळांतील 'इलाज' या शब्दाबद्दल हा भलताच शब्द छापला गेला आहे, त्याला इलाज नाहीं. वाचक योग्य शब्दाची योजना करतीलच.

—बाळकराम

कोठें याच्या उलट प्रकार असल्याचेंही वर नमूद केलेंच आहे. पैकीं गुजरातेंतील 'भाटेले' नांवाच्या एका लहानशा पोटभेदाची प्रमुखत्वानें आठवण होते. या जातींत बायको मिळविण्यासाठीं इतका जबरदस्त भूदंड भरावा लागतो कीं, एखाद्या घरांत चारपांच भाऊ असले तर त्यांतील फार तर एखाददुसऱ्याचेंच लग्न होऊं शकतें. कधीं कधीं तर त्यांच्यांत 'साटीलोटीं' करण्याचे ब्रादारायण मासले आढळून येतात. एखाद्या गुलाबदासाला कानजीच्या मुलीशीं लग्न करावयाचें असलें, म्हणजे तो आपल्या मामेबहिणीची किंवा मावसभावाची मुलगी तिसऱ्याच एखाद्या भिकाभाईच्या भावास देतो, भिकाभाई मोबदल्याखातर आपली मुलगी नरोत्तमाच्या काकाला देतो, नरोत्तम मग आपली आतेमेहुणी कानजीच्या मामेभावाला देववितो, आणि कानजीचा मामेभाऊ, आपला वशिला लावून, कानजीची मुलगी गुलाबदासाला देववून हा पंचक्रोशीचा वळसा पुरा करितो ! सामान्यतः ही सर्व जात निर्धन असल्यामुळें, तिच्यांत रोखीच्या सरळ देण्याघेण्याऐवजीं, अशा प्रकारच्या, 'नातवानें–तवानें' देण्याघेण्याचीच जारीनें वहिवाट दिसून येते.

हुंडा घेण्यास तयार नसलेला असा आणखी एक सर्वजातिसामान्य वरांचा वर्ग आहे, त्याचाही येथेंच उल्लेख करावा लागेल. पन्नाशीच्या आणि साठीच्या पलीकडले नवरमुलगे या वर्गांत मोडतात. असे नवरमुलगे बहुधा हुंडा द्यायलाच तयार असतात, आणि यामुळेंच, कधीं कधीं फारच सुंदर स्त्रिया या वर्गातील उदारधींच्या वांट्यास येतात. एक सत्तर वर्षांचा कोंवळा नवरमुलगा तर हुंडा घेण्याच्या इतका विरुद्ध होता कीं त्याचा तरुण नातू हुंड्यावांचून लग्न करण्यास कबूल होईना तेव्हां आजोबांना स्वतःला जरी लग्न कर्तव्य नव्हतें, तरी केवळ हुंड्याची घातुक रूढि मोडण्याविषयीं समाजाला योग्य उदाहरण घालून द्यावें, व यथाशक्ति सामाजिक सुधारणा घडवून आणावी, या स्तुत्य हेतूनें नातवाला सांगून आलेल्या मुलीशीं आजोबानें स्वतःच लग्न केलें !

याप्रमाणें वरसंशोधनाचा साधारण कार्यक्रम आहे, आणि याच कारणामुळें कन्याजन्माची बातमी ऐकल्याबरोबर कित्येकांना मरणप्राय दुःख होत असतें.

कोहीं कांहीं जातींत मुलीला ' **सात जन्मांची वैरीण !** ' समजण्यापर्यंत पाळी येऊन ठेपली आहे. इतकेंच नाहीं, तर मुलीच्या जन्मवृत्तानें धक्का बसून बापाचें मरण झाल्याचें कोणीं सांगितल्यास मला त्यांत कांहींच आश्चर्य वाटणार नाहीं ! उलटपक्षीं, उपवर मुलींच्या आकस्मिक मरणानें बापाच्या मनास आनंद वाटल्यास तोही क्षम्यच आहे !

चारपांच वर्षांखालीं आमच्याकडे एक प्रसिद्ध ज्योतिषी आले होते. ' चेहरा पाहून कुंडली मांडण्याबद्दल ' त्यांची मोठी ख्याति असे. त्यांची भेट होण्यापूर्वीं, ' चेहरा पाहून कुंडली मांडण्याबद्दल ' माझी कल्पना अगदींच निराळी होती. त्यांना चेहऱ्यावरून बावळट मनुष्याची परीक्षा करून त्याची कुंडली मात्र बिनधोक मांडतांना, व साधारणतः चलाख चेहऱ्याचा मनुष्य दिसला, कीं अळंटळं करतांना पाहून, ' चेहरा पाहून कुंडली मांडण्याचा ' खोल अर्थ लक्षांत येऊन, माझी पहिली भ्रामक कल्पना दूर झाली. असो. सदरहू जोशीबुवांनीं आमच्या आळींतल्या एका गृहस्थाबद्दल, त्यांना त्या वर्षीं महान् लाभयोग असल्याचें भाकित केलें होतें. गृहस्थमजकुरांचा प्राक्कालीन इतिहास व वकूब आम्हांला पूर्णपणें माहीत असल्यामुळें, त्यांचा भावी लाभयोगाची आम्हांला कल्पनाच करतां येईना ! अखेर मुदतीचें वर्ष संपावयाला दोनचार दिवसच उरले होते, तोंच एके दिवशीं सदर इसम आमच्याकडे येऊन अस्पष्ट शब्दांनीं सांगूं लागले कीं, " आमच्या चिटकीला प्लेग झाला कीं हो !

अविवाहित चिटकी बाराचौदा वर्षांची होती. दोनतीन दिवसांतच, कवडीसुद्धां हुंडा घेतल्यावांचून यमानें चिटकीला पदरांत घेतलें, आणि जोशीबुवांचें भविष्य खरें झालें !

त्याचप्रमाणें तिंबूनानांच्या ठकीचें लग्न जमविण्यासाठीं, मी व तिंबूनाना पुणें मुक्कामीं कांहीं दिवस तळ देऊळ राहिलों होतों. आम्हां दोघांचे परममित्र श्रीयुत भांबुराव हे त्यांची ' मंडळी ' गरोदर असल्यामुळें गांवींच राहिले होते. त्यांच्या ' मंडळी 'चें तें पहिलेंच बाळंतपण असल्यामुळें आम्हींही भांबुरावांना घरींच राहण्याचा आग्रह केला होता. कांहीं दिवसांनंतर एकदां रात्रौ आम्ही बोलत बसलों असतां भांबुरावांकडून थाडदिशीं तार येऊन थडकली, "कीं, I am ruined, letter follows—

माझा सर्वस्वीं सत्यनाश झाला; मागाहुन सविस्तर माहितीचें पत्र येत आहे. "

अरेरे! बिचाऱ्या भांबुरावावर प्रसंग कोसळला! एकुलती एक बायको आणि तिचा असा शेवट व्हावा! आम्ही सड्या स्वारीनिशीं निघालेले असल्यामुळें असल्या महत्त्वाच्या व भयंकर तारेच्या योग्यतेप्रमाणें एकदम अट्टाहासानें रडावयास आमच्याबरोबर कोणी बायकामंडळीही नव्हती. मृताची बातमी ऐकून रडावें असें बायकांनींच! तरी मीं आपल्याकडून रडक्या सुरांत वहिनींचे गुण आठवीत दोनचारदां नाक शिंकरीत व मधूनमधून जमिनीवर हात टेंकीत, सुरेल रडण्याचा प्रयत्न केला; पण माझें रडणें किती झालें तरी मर्दानी; त्यांत जनानी थाटाची झांक कुठून येणार? अशा रडण्याचें हंसें व्हावयाचीच भीति विशेष! तिंबूनाना मात्र निर्विकार चेहऱ्यानें स्वस्थ बसून राहिले होते. शाबास त्यांची!

" विकारहेतौ सति विक्रियन्ते
येषां न चेतांसि त एव धीराः! "

शेवटीं, तो दिलदार दोस्त ताडकन् उठून उभा राहिला आणि निश्चयाच्या गंभीर वाणीनें म्हणाला, " बाळक्या! प्रसंग येऊं नये, आला! पण आतां आपणच भांबूला धीर दिला पाहिजे. उद्यांच्या उद्यां भांबूला तार ठोक. म्हणावें, 'Don't fear! Thaki is—भिऊं नको! ठकी आहे.' माझी ठकी मी त्याला देईन. मी आणि भांबू कांहीं दोन नाहींत. प्रसंगीं उपयोगी पडत नाहीं तो मैत्र कशाचा? "

सकाळीं ठरल्याप्रमाणें मी तार करावयास जाणार, तोंच डांकवाल्यानें भांबुरावाकडील पत्र हातीं दिलें. त्यांत पुढील मजकूर होताः—

" काल रात्रौ सौ. ची सुखरूप सुटका झाली. बाळंतीण खुशाल आहे; परंतु मुलगी झाली आहे. तिंबूनाना आज तीन वर्षें ज्या वनवासांत दिवस कंठीत आहेत, त्याची आठवण झाली म्हणजे धीर खचतो. झोपेंतूनसुद्धां सारखा दचकून जागा होत असतों. " वगैरे वगैरे.

आम्हां दोघांनाही फारच वाईट वाटलें. तिंबूनानांना तर विशेषच खेद झाला. उघडच आहे, कन्यादानासारख्या स्वार्थत्यागानें स्नेहाची

कसोटी दाखविण्याची आयती चालून आलेली संधि हातची जावी, यापरतें दुर्दैव तें कोणतें ? नंतर त्याच दिवशीं आम्ही भांबूरावाला दुखवस्थांचीं पत्रें, सहानुभूतिपर तारा वगैरे पाठवून कर्तव्यांतून-मोकळे-झालों.

वाचकहो ! कन्याजन्माचें दुःख इतकें जबरदस्त आहे.! अशाच कारणामुळें एकदां तिंबूनाना सर्वस्वी व मी अंशतः कसे संकटांत सांपडलें होतों, तें सांगून हा लांबलेला लेख आटोपता घेतों.

गेल्या सालीं आम्ही ठकीच्या लग्नाच्या पहिल्या मोहिमेवर असतांना एके दिवशीं सायंकाळीं बोलण्यावरून बोलणें निघून, मुलीच्या लग्नकालीन वयाबद्दल बराच वादविवाद झाला. सदरहू वादांत आम्ही दोघे अमर्याद वयोमानाची तरफदारी करीत असून, प्रतिपक्ष " अष्टवर्षा भवेत्कन्या " या सूत्राचें समर्थन करीत होता. त्याच दिवशीं रात्रौ आम्हाला आमच्या एका स्नेह्याकडे वरातीबरोबर मिरवावयाला जावें लागलें. आमच्या या स्नेहाच्या जातींत वरात घरीं आल्यावर नवीन जोडप्याच्या हातून शिष्टमंडळीस साखर देवविण्याची वहिवाट आहे. तीबरहुकूम क्रमाक्रमानें तिंबूनानांनाही वधूहस्तें साखर देवविण्यांत आली. बिचाऱ्या नानांच्या डोक्यांत संध्याकाळच्या मुद्याचे शब्द अजून सारखे घोळत होते, आणि त्या नादाच्या भरांतच त्यांनीं नववधूला ' अष्टकन्या सौभाग्यवती भव " असा आशीर्वाद दिला.

वाचकहो ! या आशीर्वादामुळें-आशीर्वाद कसला, शापच तो !-त्या ठिकाणीं तात्रडतोब केवढा गोंधळ उडाला, याची तुम्हांला कल्पना करतां येणार नाहीं ! त्या जातींत कन्याप्राप्तीमुळें आईबापांच्या घरादाराचें वाटोळें होण्याचा खात्रीचा संभव असतो, आणि तिंबूनानांच्या तोंडून ते अभद्र शब्द असल्या मंगल प्रसंगीं निघालेले ! मग काय विचारतां ! बायकामंडळींत रडारड सुरू होऊन पोक्त्यापुरवत्या बाया नवऱ्यामुलीला पोटाशीं धरून कुरवाळूं लागल्या. इकडे पुरुषमंडळी रागानें लाल होऊन आमच्याशीं लगट करून दंगल करूं लागली. तिंबूनाना एखाद्या निढावलेल्या 'डांबिसा' प्रमाणें कावऱ्याबावऱ्या नजरेनें इकडेतिकडे पाहत होते. मी मधूनमधून ओरडत होतों कीं, "अंगाला हात लावूं नका ! कायदेशीर इलाज करा !"

पण माझें म्हणणें त्या गर्दीत ऐकतो कोण? अखेर मोकळ्या मनानें मोकळ्या हातानें धक्काबुक्की सुरू होऊन माझी व तिंबूनानांची कणिक चांगलीच तिंबून निघण्याचा रंग दिसूं लागला. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट इतकीच कीं, प्रतिपक्षीय तीस-चाळीस इसमांची प्रत्येकीं आमच्यावर हात चालविण्याची अनिवार इच्छा असल्यामुळें आम्हांला कांहीं तडाखे मुखत्यारामार्फत घ्यावे लागले ! कारण गर्दीमुळें, आम्हां दोघांपर्यंत सर्वांचेच हात पुरणें शक्य नव्हतें. अर्थात् हे मुखत्यार प्रतिपक्षांतलेच होते. तिंबूनाना शक्य तितका मारा चुकवून, एखाद्या वीराप्रमाणें गर्जू लागले कीं 'बाळक्या ! पळ, धूम ठोक !' शेवटीं पागोट्याचा मांडवास अहेर करून आम्हीं मांडवपरतण्याचा समारंभ कसाबसा पार पाडला, आणि पळतां पळतां आमचें रहातें बिराड एकदांचें गांठलें. घरीं आल्यावर माझा अपराध नसतांही उगीचच्या उगीच मीं मार खाल्ल्याबद्दल तिंबूनाना माझ्यावर रागावूं लागले. शेवटीं त्यांची समजूत घालण्यासाठीं मी म्हणालों कीं, "नाना ! उगीच कां बरें संतापतां ? मी हौशीनें का मार खाल्ला इतका ?"

तिसऱ्या दिवशीं 'तिंबूनाना विरुद्ध क्ष' या खटल्यांत ज्या अर्थीं तिंबूनाना हे आरोपी नंबर एक होते, व ज्या अर्थीं मी साक्षीदार नंबर एक होतों, त्या अर्थीं दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां कोडतांत हजर होण्याविषयीं आम्हांला "समाने" लागलीं. खटल्यांतील न्यायाधीश दुर्दैवानें त्याच जातीचे असून त्यांनाही दोनचार मुली होत्या. त्यामुळें तिंबूनानांच्या तोंडच्या मुक्ताफळांची त्यांना बरोबर किंमत ठरवितां येऊन त्यांनीं पुढीलप्रमाणें शिक्षा ठोठावली—

"आरोपी तिंबूनाना, तुमच्यावर हा आरोप शाबीद झालेला आहे... म्हणून मीं तुम्हांला, **विविधज्ञानविस्तारांतील** 'क्रितो व फ़िदो' **ज्ञानप्रकाशांतील** 'स्थानिक सहकारी पतपेढ्या' संबंधीं सारे अग्रलेख, व '**ब्रह्मज्ञानप्रदीप**' हें अध्यात्मिक गद्यनाटक वाचण्यांची, '**मानापमान**' नाटकांतील प्रत्येक पदाचा अन्वयार्थ लावण्याची शिक्षा फरमावितों. हें सर्व वाचन होईपर्यंत तुम्हांला पुण्यांतल्या एखाद्या खाणावळींत जेवावें लागेल. आणि दर आठवड्यांस 'विकएंड' तिकिट काढून सदर्न मराठा

रेल्वेच्या तिसऱ्या वर्गांतून पुण्याहून मिरजेपर्यंत प्रवास करावा लागेल. यापेक्षां कमी शिक्षा तुम्हांला करतांच येत नाहीं."

विचारे तिंबूनाना खटल्याचा हा निकाल ऐकतांच डोळे पांढरे करून बेशुद्धच पडले? डी फार गयावया करून नानांची तरफदारी करूं लागलों. तेव्हां न्यायाधिशसाहेबांना थोडीशी दया येऊन त्यांनीं आम्हांला वरिष्ठ कोर्टांत अपील लावण्याची परवानगी दिली.

अपील चालते वेळीं, आम्हीं प्रतिपक्षाचें भावी नुकसान भरून देण्याचा न्यायमूर्तींसमोर कबूलजाब लिहून दिला. यदाकदाचित् नानांची बत्तिशी चढून त्या मुलीला आठ मुली झाल्याच, तर त्यांपैकीं, नानांनी चौघींचा हुंडा देण्याचें, व एकीशीं विनहुंड्यानें स्वतः लग्न करण्याचें व एकीशीं त्याच शर्तीवर मीं लग्न करण्याचें कबूल करून त्या अर्थाचा करारनामा कोर्टासमक्ष प्रतिपक्षाच्या सुपूर्द केला. तेव्हां न्यायमूर्तींनीं दयाळुपणानें पहिली भयंकर शिक्षा रद्द करून, तिच्या मानानें कांहींच नाहीं अशी म्हणजे तीन वर्षें सक्तमजुरी व एक हजार रुपये दंड एवढ्यावर नानाची मुक्तता केली. त्यासरशी आनंदाच्या भरांत येऊन नाना बेछूटपणानें नाचूं लागले. त्याच्या तशा वर्तनानें कोर्टाची बेअदबी होण्याची मला भीति वाटूं लागली, व त्याचा आनंद आटोक्यांत आणण्यासाठीं मी म्हटलें, 'नाना, ठकीचें लग्न जमलें नाहीं, तोंपर्यंत तीन वर्षें तरी तुम्हांला कैदेंत कसें रहातां येईल?"

हें ऐकतांच तिंबूनाना काळेठिक्कर पडून न्यायमूर्तींकडे पाहूं लागले. न्यायमूर्तींची मुद्रा प्रसन्नशी पाहून मी मोठ्या अदबीनें, मुलीचें लग्न जमे-पर्यंत कैदीला जामिनावर सोडण्याबद्दल तोंडीं अर्ज केला; परंतु न्यायाधीश-साहेब पांच हजारांचा जातमुचलका मागूं लागले; तेव्हां मी पुन्हां मोठ्या विनयानें म्हटलें, 'साहेब, असा भारी जातमुचलका घेण्याचें कारणच नाहीं. कैदी हें कांहीं जातेपळले नाहींत. सद्यःस्थितीत त्यांना फरारी होतां येणें शक्यच नाहीं! कारण, तिंबूनाना म्हणजे कांहीं एखादे कळकळीचे लोकसेवक, मार्मिक लेखक किंवा प्रतिभाशाली कविही नाहींत, कीं त्या-मुळें त्याचें नांव मेल्यानंतर प्रसिद्ध होईल, आणि जिवंतपणीं त्यांना लोकांच्या नजरेआड एखाद्या कोनाकोपऱ्यांतच पडून राहावें लागेल.

साहेब, प्रस्तुत कैदी हे हिंदुसमाजाचे घटक असून एका उपवर मुलीचे बाप आहेत ! आज त्यांचें नांव त्यांच्या आसपास आबालवृद्धांच्या आणि बायकापोरांच्या तोंडीं सारखें गाजत आहे. भोंवतालीं चालणाऱ्या चर्चेवरून त्यांना वाटेल त्या वेळीं हुडकून काढतां येईलच. अशा मनुष्याला गुप्त रीतीनें राहतां येणें आमच्या समाजांत तरी शक्य नाहीं ! शिवाय. मुलीचें लग्न जमलेंच, तर चर्चा कमी होऊन त्याची चारचौघांत बोलावा कमी होईल खरी; पण हुंड्याच्या रकमेचीं भरपाई करण्यासाठी दरोबस्त स्थावर-जंगम मिळकतीचें खरेदीखत लिहुन देण्यासाठीं त्यांना रजिस्टर-कचेरींत यावें लागणारच; आणि तेथेंच त्यांना त्या वेळीं गिरफदार केलें म्हणजे झालें. '

न्यायमूर्तींना माझें म्हणणें तंतोतंत पटून त्यांनीं तिंबूनानांना मोकळें सोडलें आणि आम्ही ठकीचें लग्न-जमविण्याच्या उद्योगाला लागलों.

प्रस्तुत लेखांतील वरसंशोधनाचा कार्यक्रम पाहून हें काम किती बिकट आहे, याची वाचकांस थोडी तरी अटकळ आलीच असेल. आमच्याकडे मुली खंडोबाला वाहण्याच्या, किंवा त्यांची निदान कट्यारीशीं लग्नें लावण्याच्या चाली, उपवर मुलीच्या वैतागलेल्या बापांनीं प्रथम पाडल्या असाव्यात, असा माझा समज आहे- श्रीयुत देवलांची ' वल्लरी ' म्हणते कीं. ' देवा, नको रे हा मेला पोरीचा जन्म ! ' याबद्दल मला कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं ! परंतु एवढें मात्र मी खात्रीनें सांगू शकतों कीं ' मेला ' हा शब्द वापरण्याची पुरुषांनाही सवलत दिली, तर प्रत्येक उपवर मुलीचा बाप अट्टाहासानें म्हणेल कीं.—

' देवा, नको रे हा मेला पोरीच्या बापाचा जन्म ! '

# लग्नाच्या मोहिमेची पूर्वतयारी

वर शोधाया जाण्यापूर्वीं किती तयारी लागे !!

—चाळकराम

कोणत्याही महत्कार्याला सुरुवात करण्यापूर्वीं त्याची आधीं किती तरी पूर्वतयारी करावी लागते, याचें थोडक्यांत चटकदार वर्णन शिरोभागीं दिलेल्या अर्ध्या साकींत कवीनें दिलेलेंच आहे! परीक्षेचे कागद तीन तासांत चट्दिशीं लिहून काढण्यासाठीं आलेला उमेदवार आधीं वर्षभर पूर्वतयारी करीत असतो. एखाद्या दिवशीं पेढीच्या दारावर दिवाळें फुंकून मोकळें झाल्याची नोटिस अचानक लावणाऱ्या पेढीवाल्या भागीदारांना चारचार महिने आधीं खलबतें करावीं लागतात. त्याप्रमाणें माझे मित्र तिंबूनाना यांच्या ठकीसाठीं नवरामुलगा शोधण्यासाठीं पुण्यास येऊन ठेपण्यापूर्वीं आम्हांला आधीं किती पूर्वतयारी करावी लागली, याची वाचकांना या लेखांत थोडक्यांत माहिती करून देण्याचें योजिलें आहे.

सौंदर्यपरीक्षणाच्या अनेक दृष्टींपैकीं अत्यंत तीव्र अशा स्त्रीदृष्टीनें पाहिलें तरीही ठकीचें सौंदर्य अलौकिक होतें असें प्रांजलपणानें कबूल करावें लागेल! ठकीची अंगकांति सुवर्ण रंगाची आहे; मात्र हीं सुवर्णरचना सोनेरी किंवा तांबड्या शाईनें करून भागावयाचें नाहीं. या रंगामुळें ठकीच्या बहुतांशीं गैरहजीर भोंवयांची उणीव, किंवा धांदरटपणानें डोळ्याबाहेर येऊन भोंवतालच्या प्रदेशांत बागडणाऱ्या काजळाचा फाजिलपणा, हीं दोन्हीही तिऱ्हाइताच्या चटकन् लक्षांत येत नसत. महाकवि कालिदासानें शकुंतलेच्या सौंदर्यसर्वस्वाची जी लतिकेशीं तुलना केली आहे, तीच ठकीच्या बाबतींतही सत्याला न सोडतां करून दाखवितां येईल. इतकेंच नव्हे, तर एखाद्या लतेशीं पूर्ण सदृश न व्हावयाला शकुंतलेच्या ठिकाणीं जी एक मोठी उणीव होती, तीसुद्धां ठकीच्या वर्णनांत भरून

निघाली आहे. कारण, शकुंतलेप्रमाणेंच ठकीचे 'बाहू ढापे लतिकेचे' व 'कर पल्लव साचे' असून शिवाय एखाद्या लतिकेप्रमाणें ठकीच्या एका डोळ्यांत फूलही आहे! त्याचप्रमाणें; सुंदर स्त्रीला अप्सरेची किंवा देवांगनेची उपमा देऊन तिला 'देवी' या संबोधनानें पाचारण्याचा प्रघात आहे; या दृष्टीनें पाहिलें तरी; ठकीचें सौंदर्य कसोटीस उतरण्यासारखचें होतें. तिच्या तोंडाकडे पहातांच हजारों देवांचें दर्शन घेतल्याचा साक्षात्कार होऊन शिवाय भाविक वारकऱ्याला तर आळंदीच्या वांकड्या विठोबाची आठवण होत असे. कारण, ठकीची मान स्वभावतःच उजव्या बाजूकडे जराशी कलती असल्यामुळें ती नीट उभी राहिली असतांहि समोरून पाहणारास परेड करतांना 'आइझ राइट'च्या पवित्र्यांत उभ्या असलेल्या शिपायासारखी दिसत असे. एखादे वेळीं कंबर कसून अशा लष्करी पेशांत ठाण मांडिलेल्या ठकीकडे पाहिलें, म्हणजे उजव्या सोंडेचा गणपति किंवा डाव्या तोंडाचा मारुति, यांसारख्या दुर्मीळ दैवतांप्रमाणेंच तिचें अपूर्व कौतुक करावेंसें वाटल्यावांचून राहत नसे.

सौंदर्याकडे पाहावयाच्या दृष्टि अनेक असल्यामुळें, कवितेप्रमाणेंच सौंदर्याचीही व्याख्या करतां येणें शक्य नाहीं, हें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. काशीच्या अयोध्याप्रसादाच्या अर्धांगीला आपल्या पतिराजाच्या दाढीमिशी टोपाच्या जंगलांत सृष्टिसौंदर्याचें माथेरान दिसत असतें, तर रामेश्वरच्या विजरंगय्याची बायको आपल्या पतिराजाच्या खांद्यावरील सर्वस्वी तासून काढलेल्या नारळी सागरगोट्याच्या संन्यस्त स्वरूपांतच सौंदर्याची परमावधि पाहत असते. हिंदुस्थानच्या पूर्वेकडच्या प्रदेशांत चीनांगना लिहंगचंगाच्या गजानें मोजण्याजोग्या शेंडीच्या पाशांत गुरफटून जाते; तर पश्चिमेकडे कोणी हबशीण आपल्या शिद्दी मकांड्याच्या डोक्यावरील उगवत्या जागींच मुरकुंडी मारल्यामुळें मुंगळ्यांसारख्या दिसणाऱ्या केशगुच्छावर फिदा असते. महाराष्ट्रभामिनीची कुंदकळ्यांसारख्या शुभ्र दंतपंक्ति पाहून ब्रह्मी सौंदर्य आपली रंगवून काळी केलेली बत्तिशी उपहासानें व्यक्त केल्यावांचून राहणार नाहीं! त्याचप्रमाणें पीतवर्ण चिनी लोखंडी पट्ट्यांनीं आपल्या सहधर्मचारिणीच्या पावलांची वाढ खुंटलेली पाहून खूश होतो! श्वेतवर्ण युरोपियन चामड्याच्या पट्ट्यांनीं आपल्या

अर्धांगीच्या कटिबंधाची वाढ थांबविण्यांत आनंद मानतो, तर कृष्णवर्ण हिंदु अज्ञानाच्या पट्टयांनी आपल्या गृहदेवतेच्या डोक्याची वाढ थांबविण्यांत धन्यता मानतो.

सौंदर्यनिरीक्षणाच्या पद्धति देशदृष्टीप्रमाणेंच व्यक्तिदृष्ट्याही बदलत असतात. उंटाप्रमाणें अठरा अंगांनीं वांकडेपणा दाखविणाऱ्या व विश्वसौंदर्याचें गालबोट म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुब्जेकडे पाहून करोडों गोपींवरून फिरून आलेली श्रीकृष्णाची चंचल दृष्टि जादूनें खिळल्यासारखी स्थिर झाली; रघुवीराच्या घोरपड्याच्या शाईप्रमाणें लिहितांना निळ्या रंगावरच सीतामाई बहाल होत्या; यथार्थनामा अष्टावक्राच्या स्त्रीनें किंवा सुपाएवढाल्या नखांच्या शुर्पणखेच्या पतीनें आपापल्या प्रेमपात्रांबद्दल गवगवा केल्याचा पुराणांतरी कोठेंही दाखला नाहीं! नागकन्या उलुपीनें गळ्यांत मिठी मारतांना तिच्या शेंपटाकडे पाहून; अर्जुनानें आपल्या गळ्यांत ही घोरपड कशाला हवी अशा अर्थाची कुरकूर कधींच केली नाहीं; किंवा श्रीमती सौ. हिडिंबेच्या ताडमाड लांबीच्या सुळ्या दांतांकडे व 'विक्राळ दाढांकडे' पाहूनही युवराज भीमानें तिला 'दंतव्रण करिगाला' असें म्हणतांना तसूभर माघार घेतली नाहीं. फार कशाला, आपल्या अनुगुणरूप अर्धांगीला देशोधडीं लावून, गेल्या पिढींतल्या शिळ्यापाक्या जोबनरसाची लयलूट करणारीं रंगेल नरमौक्तिकें आमच्या टीचभर महाराष्ट्रजनसमुद्राच्या चिखलांतच इतकीं सांपडतील कीं, त्यांची भली लांबलचक वैजयंती सहज करतां येईल. सारांश, सौंदर्याची व्याख्या अमर्याद व अंधुक असल्यामुळेंच काळेबेंद्रे व नकट्या नाकाचे कुब्जेचे वंशज घटकाघटका आरशासमोर उभे राहून माकडचेष्टा करतांना दृष्टीस पडतात.

याप्रमाणें सौंदर्याच्या बाबतींतही 'भिन्नरुचिर्हि लोकः' असल्यामुळें माझ्या कित्येक वाचकांना ठकीचें सौंदर्य न पटून किंबहुना हास्यास्पदही वाटून, ठकीचें लग्न इतके प्रयत्न करून सुद्धां न जमण्याचें कारण तिचें लावण्याच असावें, असा तर्कही ते करूं लागतील; परतु धर्म, हरिश्चंद्र यांसारख्या पौराणिक पुरुषांच्या सत्यप्रियतेचें स्मरण करून मी वाचकांना पूर्वींच सांगून ठेवतों कीं, यद्यपि ठकीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें येत गेलीं; तथापि तिच्या सौंदर्यामुळें तिला कोणी नाकारल्याचें माझ्या

स्मरणांत नाहीं! अडचण पडे ती नेहमीं हुंडा, पोषाख, पत्रिका यांसारख्या महत्त्वाच्या बाबतींतच! नाहीं म्हणावयास एका तरुण वयाच्या टारगट सुधारकानें मात्र पत्रिका जमत असूनही केवळ मुलगी पसंत नाहीं अशा क्षुल्लक कारणामुळें आम्हांला निरोप दिला! अर्थात् आजकाल वडीलधाऱ्या माणसांची लग्नासारख्या धार्मिक गोष्टींतसुद्धां अवज्ञा करण्याचें जें सुधारणेचें तरुण खूळ माजलें आहे, त्यावर मखलाशी करण्यासाठींच त्या पोरानें ही पोरकट सबब पुढें आणली, हें उघड उघड दिसतेंच आहे.

अरेरे! बरेंवाईट समजूं लागण्यापूर्वींच लग्नाच्या शृंखलेंत स्वतःला बांधून घेऊन मोकळे होणारे, किंवा हुंड्यापांड्याची नीट व्यवस्था लागतांच वडिलांनीं तारेनें तिथिनिश्चय कळविल्याबरोबर एखाद्या वीराप्रमाणें लग्नमंडपांत सुमुहूर्तीं येऊन थडकणारे ते आमचे पितृभक्तिपरायण आर्य नवरदेव आज कोठें गेले?

सुधारकमजकुरांना मुलगी देण्याची चूक आमच्या हातून झाली नाहीं, याबद्दल पुढें आम्हाला मोठें समाधान वाटलें; कारण कांहीं दिवसांनीं मशारनिल्हे टारगट, एका इराण्याच्या दुकानांत राजरोसपणें चहा घेतांना दृष्टीस पडले. जातीचा हिंदु, पण हाडाचा मात्र नाहीं! सदरहु दुकानांत आम्ही एका कोपऱ्यांत बसलेले असल्यामुळें स्वारीच्या मुळींच दृष्टीस पडलों नाहीं! बशींतल्या ऊन चहावर फुंकर टाकण्याच्या मिषानें तिंबूनाना त्या पापभ्रष्ट सुधारकाबद्दल निराशेचे दीर्घ निःश्वास टाकूं लागले. नानाच्या मनोभावाला शाब्दिक स्वरूप देण्यासाठीं मी म्हणालों, "नाना, बरें झालें, या कर्मनष्टाच्या गळ्यांत आपण ठकी बांधली नाहीं! मी तर सुधाकरकाला पोर देणें म्हणजे पोरीचा पुनर्विवाह लावण्यासारखेंच समजतों! मग धडधडीत एखाद्या गुत्त्यांत नेऊन पोरीला दारूच्या पिंपांत कां लोटूं नये? ('सुधारक' या शब्दानें तिंबूनानाना दारू व पुनर्विवाह यांखेरीज कसलाही बोध होत नसे!) अरे, चांगले हिंदु म्हणवतां, आणि इराण्याच्या दुकानांत! नाना, स्वारीची जरा उडवतोंच आतां! (मोठ्यानें) "अहो शिष्ट! आपले वडील हिंदुच होते ना?"

प्रश्नाचें उत्तर दिल्यावांचून स्वारी तेथून चालती झाली. प्रश्नांत थोडी खोंच होतीच; तिनें स्वारी वरमली आणि दुसरें काय? आमच्या शेजारच्या

ओंकावरचे दोनचार मुसलमान या वेळीं हंसावयास लागले. उघडउघड ते आमच्या धर्मग्लानीलाच हंसत असावेत! त्यांच्या हंसण्यानें विचारे तिंबूनाना मात्र ओशाळल्यासारखे दिसूं लागले. बरोबरच आहे, कां दिसणार नाहींत? आमच्या सनातन समजांतलीं जातिबंधनें याप्रमाणें तटातट तुटतांना पाहून कोणाचें हृदय तसेंच तुटणार नाहीं? आमच्या धर्मसंरक्षकांनीं इकडे जरूर लक्ष घालावयास पाहिजे. प्राचीन काळीं द्वैतमताचें खंडन करून अद्वैताची स्थापना करणाऱ्या आद्य शंकराचार्यांनीं आपल्या एकट्याच्या सामर्थ्यानें भगवंतांनीं निर्मिलेल्या चार वर्णांच्या एकदम अठरा जाति केल्या; आणखी आज, शेंडीस रुपया वसूल करण्यासाठीं उभ्या वर्षांतून अवघे पांचदहा तरी शंकराचार्य येत असून सर्वांना मिळून या अठरापगड जातींचे पदर उलगडून आणि अठराशें जातींच्या चिंध्यापाध्या करतां येत नाहींत तिकडे सुधारक लोक कोंकणस्थ-देशस्थांतला भेद केवळ प्रांतिक म्हणून मोडण्याच्या खटपटींत आहेत, तोंच इकडे आपण कोंकणस्थांत रत्नागिरे, कुलाबे, किंवा देशस्थांत नगरी, सोलापुरी, पुणेरी यांसारखे जिल्हेवारीनें भेद करून, किंबहुना कुटुंबागणिक जाति निर्माण करून व सर्वांमधून इथूनतिथून रोटीबेटीव्यवहाराचे कडक निर्बंध पसरून सनातन धर्माला मजबुती कां बरें आणूं नये? अशा प्रयत्नानें सुधारकांचा तेव्हांच पाडाव होईल. पण लक्षांत कोण घेतो? एका आधुनिक कवीनें म्हटलें आहे, 'धर्मगुरु ते निःसत्त्व दंडधारी' तें कांहीं खोटें नाहीं!

वरील धर्मविषयक विषयांतराबद्दल वाचकांची माफी मागून व या सुधारकी अपवादाखेरीज ठकीच्या सौंदर्याला कोणींही नांवें ठेवलीं नाहींत असें पुन्हां सांगून मी पुढच्या मार्गाला लागतों.

पहिल्या दोनतीन वर्षांतल्या आमच्या पुण्यावरच्या वैवाहिक मोहिमा हिंदुस्थानभर एकामागून एक सतरा धांवत्या स्वाऱ्या करूनही अखेरीस असंतुष्ट राहणाऱ्या गिझनीच्या महंमदाच्या उनाड धोरणावर करण्यांत आल्या होत्या. आम्ही मोठमोठाल्या शहरीं चारसहा दिवसांच्या येऊन जाऊन खेपा घालीत असूं. या खेपेस आम्हीं आमचें धोरण बदलून महंमद घोरीच्या चिरस्थायी तत्त्वाबरहुकूम पुण्यांत चारसहा महिने

कायमचा तळ देण्याचा मनसुबा केला; पावसाळ्याचे चार महिने आम्हीं आमच्या गांवीं राहून विवाहविषयक वाङ्मय वाचण्यांत घालविले. हेतु हाच कीं, गोत्र, पत्रिका, जात, कूळ वगैरे सर्व बाबींबद्दल आमचें आम्हां-लाच कळून, पुढें उगीच वेळाचा अपव्यय होऊं नये! या विचारास अनुसरून आम्हीं मनुस्मृति, विवाहविधि, नवरदेवाची जोडगोळी, पराशरस्मृति, मेन्स हिंदु लॉ, मिताक्षरटीका, जबरीचा विवाह, लग्नसंस्था वगैरे विवाहविषयावरील ठळक ठळक पुस्तकें वाचून टाकिलीं. मीं तर पुनर्विवाहावरील एकदोन पुस्तकेंसुद्धां हातावेगळीं केलीं. त्याचप्रमाणें गुदस्तां खटपटी करतांना ज्या अडचणींचा अनुभव आला होता त्याचे यंदां आधींपासून निराकरण करण्याचा निश्चय केला. विषयाला सुरुवात होण्या-पूर्वींच आडनांवांमुळें गोत्रांचा '**प्रथम ग्रासे मक्षिकापातः**' होऊं नये म्हणून आधीं आम्हीं दोघांनींही आमची मूळचीं आडनावें बदलून अनुक्रमें देशपांडे व कुळकर्णी हीं संदिग्ध स्वरूपाचीं सामान्यनांवें घेतलीं, आणि ठकीच्या गृहस्थपेशाच्या मामाला त्याच्या नकळत जोशी बनविलें. ज्येष्ठांत ज्येष्ठ मुलाचे लग्न करण्याचा प्रघात नाहीं असें कळल्यामुळें, ज्येष्ठ मुलच्या बापाला ज्येष्ठांत लग्न करण्याची गळ घालण्यांत फुकट वेळ न घालविण्याचें ठरविलें. इतकेंच नाहीं, तर एखाद्याला बाजवीपेक्षां अधिक मुलें असलीं, तर त्याच्याकडे अधिक महिन्यांत जावयाचें नाहीं, असाही निश्चय केला. एके ठिकाणीं आमचे कपडे पाहूनच आमच्या दारिद्र्यासकट हुंड्याची अटकळ बांधून एका श्रीमंतांनीं आम्हांला देवडीवरूनच निरोप दिल्यामुळें या खेपेस पुण्यास गेल्याबरोबर आम्ही दोघांसाठीं उंची पोशाख करण्याचें 'बजेट' मंजूर करून घेतलें. तिंबूनानाच्या कुटुंबाला चार वर्षांखालीं देवाज्ञा झाली होती तें व्यंगसुद्धां एके ठिकाणीं आड आलें होतें. बहुतेक बाबतींत उभयपक्षांचें चांगलें जमूनही वरपक्षानें अखेर मुलाला सासू नाहीं या कारणामुळें लग्न फिसकटविलें होतें. त्या प्रकारची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून नानांनी पहिल्या मुहूर्तालाच स्वतःला चतुर्भुज करून घेऊन 'चक्षुर्वै सत्यम्' या न्यायानें प्रतिपक्षाचें समाधान करण्यासाठीं आपल्या नूतन कुटुंबाला बरोबर घेण्याचें ठरविलें. कांहीं जुन्या मतांची माणसें मुलीचें वय जास्त असलें म्हणजे कांकूं करतात, हें लोकविश्रुत आहेच. ही अडचण

दूर करण्यासाठीं पूर्वीं चित्रगुप्ताच्या जमाखर्चावर दरोडा घालून ठकींच वय चोरण्याचा आमचा परिपाठ असे; परंतु अशी लबाडी उघडकीस आल्यामुळें एकदां आम्हांला हातीं आलेलें स्थळ दवडावें लागलें; म्हणून यंदा आम्हीं निराळीच तजवीज केली. ठकीच्या वयोवर्णनाला तिखटमीठ लावण्याऐवजीं आम्हीं सालमजकुरीं ठकीचें मीठ अजिबात तोडून व तिला एकभुक्त ठेवून तिच्या वयांत बरीच काटकसर केली. आमचे मित्र चिंतो-पंत यांच्या सूचनेप्रमाणें माजोरी बैलाप्रमाणें ठकीला ऊन पाण्याचा रतीबही सुरू केला होता.

असाच समजुतींचा घोटाळा एकदां पत्रिकेच्या बाबतींतही झाला होता. ठकीला मंगळ आहे किंवा नाहीं, याविषयीं मी सेमिरामीस राणीची पहिली मंगळागौर कोणत्या सालीं झाली, या प्रश्नाइतकाच माहितीगार होतों. एखाद्या पत्रिकेकडे पाहून मला डॉक्टरनें लिहून दिलेल्या प्रिस्क्रिप्शनकडे पाहण्यापेक्षां जास्त बोध होत नसे. मंगळवारीं जन्मलेल्या मुलालाच काय तो मंगळ असतो, अशी माझी अंधुक समजूत असे. एके ठिकाणीं सर्व गोष्टी बिनबोभाट पटून मुलगा अमंगळ असल्यामुळें मुलीलाही मंगळ नसल्याची खात्री होतांच तिथिनिश्चय करण्याचें त्याच्या बापानें कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं आम्हीं ठकीची एक बनावट जन्मपत्रिका तयार करून तिच्यातून मंगळाला अजिबात अर्धचंद्र दिला, व ती त्या ग्रहस्थाच्या स्वाधीन केली. पत्रिकेकडे बराच वेळ निरखून पाहून अखेरीस मंगळाचा उल्लेख करावयाचा चुकून राहिल्याबद्दल त्यांनीं शंका प्रदर्शित करितांच मी अजाण बालकाच्या निर्दोष हास्यमुद्रेनें म्हणालों, ' चुकून राहिला नाहीं ! मुलीलाच मुळीं मंगळ नाहीं, मग पत्रिकेंत कोठून येणार ? '

हें उत्तर ऐकतांच त्या गृहस्थानें संतापानें पत्रिका जमिनीवर फेकली. त्याच्या तांबड्यालाल डोळ्यांच्या जागीं एक सोडून दोन मंगळ दिसूं लागले. अशा मंगलदृष्टीनें तो गृहस्थ आमच्याकडे पहात असतांहि आम्हीं शनीसारखें काळेठिक्कर पडलों, व अखेरीस आम्हीं मंगळाची जी दशा केली होती तीच त्या गृहस्थानें आमची केली ! या अनुभवामुळें बनावट मृत्युपत्रा-प्रमाणें बनावट जन्मपत्रें करण्यालासुद्धां निढावलेला धंदेवालाच लागतो अशी खात्री होऊन या वर्षी आम्हीं आमच्या आबाभटजींनाच बरोबर

घेतलें होतें. यंदा लग्न पार पाडल्याखेरीज फिरावयाचें नाहीं अशी आम्हीं प्रतिज्ञा केली असल्यामुळें चातुर्मासांत सुद्धां जमल्यास कार्य उरकून घेतां यावें म्हणून, पुढीलप्रमाणें दूरदर्शीपणाची तरतूद ठेविली. व्यंकटगिरीस जाऊन चातुर्मासांत किंवा कृष्णानर्मदा यांमधील प्रदेशाखेरीज इतरत्र कोठेंहि अगदीं सिंहस्थांतसुद्धां लग्न करावयास हरकत नाहीं. अशा अर्थाचा मजकूर जुनाट जुन्नरी सुडाच्या कागदावर शिऱ्याच्या शाईनें लिहून जास्त जुनाट रंग देण्यासाठीं तो कागदाचा फळका मंदाग्नीनें तव्यावर जरासा परतून घेतला, व त्याला जुन्या धार्मिक आज्ञापत्राचें पूर्ण स्वरूप देण्यासाठीं त्याखालीं भृगुसंहितेंतहि ज्यांच्या पत्रिका नमूद केल्या नाहींत अशा काल्पनिक वेदोनारायणांचीं नांवें घालून शेवटीं माहुलीचे रामशास्त्री प्रभुणे व काशीकर गागाभट्ट यांच्याही सह्या ठोकून दिल्या.

गेल्या सालीं पुण्यांतल्या टांगेवाल्यांशीं भाडें ठरविण्याची घासाघीस करण्यांतच आमची अर्धीअधिक शक्ति खर्च होऊन जात असल्यामुळें मुलांच्या बापाशीं हुंड्याबद्दल घासाघीस करण्यापुरता जीवच आमच्यांत उरत नसे. यासाठीं यंदा आम्हीं नानांची थोरली तट्ट्याची गाडी पुण्यास नेण्याचें ठरविलें, व एक चांगलासा मुहूर्त पाहून तिंबूनाना, आमच्या नव्या वहिनी, ठकी, नानांचा चिमण्या, आन्नाभटजी, रंगू गाडीवाला, दोन बैल व मी आपआपल्या सामानासुमानासकट गाडी घेऊन निघालों. आमच्याबरोबर सामानसुमान पुष्कळच होतें. ठकीचीं व नव्या वहिनींचीं चासनें, वेणीफणीचीं बाक्सें, पेट्या, आमचीं बोचकीं, दोनचार वळकट्या, आंबाडा औषधांचा झोळणा, तंबाखूचा बटवा, भजनाचा पखवाज, बिनखुंट्यांची व तुटक्या तारांची एक सतार, चिमण्याची ‘ शिलेट-पेनसल’, रंगूची घोंगडीं, गोधड्या, आमचीं भांडींकुंडीं, चार महिन्याच्या बेगमीचा दाणागोटा वगैरे सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या वैचित्र्याचें आमच्या गाडींत एक लहानसें प्रदर्शनच झालें होतें.

पुण्यास आल्याबरोबर प्रथम आम्ही पोशाखाचें ‘एस्टिमेट’ करावयास लागलों. उद्धारक किंवा सुधारक यांपैकीं कोणच्याही घरीं प्रवेश होण्यास मज्जाव नसावा म्हणून नानांनीं जुन्या चालीचा व मी नव्या थाटाचा पोषाख करावयाचें ठरविलें. साधारणपणें दोघांचा ‘ कंप्लिट आउटफिट ’

व्हावयास अदमासें पाऊणशें रुपयांच्या घरांत जाईल असा माझा अभिप्राय ऐकतांच आम्ही मोकळ्या मैदानांत असूनही तिंबूनाना जीव गुदमरल्याचा अभिनय करूं लागले ! नानांना हंसतहंसत टोमणा देण्याच्या उद्देशानें मी म्हणालों, ‘ नाना ! आतां पाऊणशें रुपयांचा पोशाख घ्यावयाला कचरतां; मग उद्यां जांवयासाठी पोशाख करतेवेळीं काय करणार तुम्ही ? ’

नानांनीं गंभीरपणानें उत्तर दिलें, ‘ बाळकराम, वेड्या उगीच पैसे पाण्यांत घालण्यांत काय हंशील ? तुझ्या पोषाखाचा खर्च म्हणजे निव्वळ बुडीत खर्च ! जांवई पोषाखाबरोबर ठकीलाही पत्करील हें तूं विसरतोस ! तेव्हां त्याच्यासाठीं कां नाहीं हवा तसा खर्च करणार ! चल; पत्कर तूं ठकीला आणि— ’

नंतर चार दिवसांनीं मीं सावध झालों !

एका दवाखान्यांत पांढऱ्या सफेत चादरीच्या बिछान्यावर मला निजविलें होतें. माझ्या लोखंडी खाटेच्या उशालगतच तिंबूनाना बसले होते. माझ्या अंगांत फणफणलेला ताप टीचभर थर्मामिटरच्या कांबूंत येण्यासारखा नसल्यामुळें डिग्र्यांची मोजमाप करण्यासाठीं वांव-दीडवाव लांबीची तीन-च्यारोमिटरें आणून ठेविलीं होतीं. जवळच दहावीस जणांचा घोळका बसला होता. त्यांच्याकडे मीं जिज्ञासापूर्वक पाहतांच नानांनीं पुढील माहिती दिली-

ठकीच्या लग्नाच्या खटपटींत मला नानांबरोबर बरेच हेलपाटे घालणें आवश्यक असल्यामुळें, प्रस्तुत प्रसंगाप्रमाणें थट्टेच्या बोलांनींसुद्धां माझ्या हृदयाला असे धक्के बसूं लागले, तर कामांत वारंवार व्यत्यय येण्याची भीति होती. सबब माझें नाजुक हृदय (Heart) काढून टाकून त्यांच्याऐवजीं अशा प्रसंगीं टक्कर देण्याजोगें कठीण हृदय बसवून घेण्यासाठीं नानांनी चार साधे डॉक्टर, तीन देशी वैद्य, एक गुरांचा डॉक्टर, दोन वैदू, एक खाटीक व एक चांभार, एवढ्यांची एक कमिटी बसविली. कमिटी हल्लीं त्या विषयाचा खल करीत होती. कमिटी मधून मधून मजकडे पाहत होती; जो-तो आपल्या परीनें इलाज सुचवीत होता. माझें मुळचें हृदय कापून काढण्याबद्दल सर्वांचें एकमत होतें. वादविवाद फक्त बदली देण्याबद्दलचा होता. डॉक्टर लोकांनीं एखाद्या मेलेल्या माणसाचें चांगलेंसें हृदय पाहून

तें बसविण्याची सूचना पुढें आणिली. खाटकाच्या मनांतून बकऱ्याचें काळीज वापरावयाचें होतें. वैद्य मंडळानें तळहाताएवढी कुरेदाची शाळुंखा करून बसविण्याचें योजिलें. सालमिस्री आणि सफेतमिस्री यांची समभाग पुरचुंडी कोल्ह्याची कातडींत गुंडाळून माझ्या हृदयाच्या जागीं ठेवावी, असें वैदूचें म्हणणें होतें. गुरांचा डॉक्टर पिसाळलेल्या कुत्र्याच्या जिभेचा तुकडा वापरण्याची शिफारस करीत होता, आणि चांभार तर माझ्या नाजुक हृदयालाच जुन्या जोड्यांतला सुखतळ दोन्ही बाजूंनीं शिवून घेतला म्हणजे आणखी दोन वर्षें तरी पहावयास नको, असें छातीला हात लावून सांगत होता. शेवटी डॉक्टरांचा विजय झाला; कमिटीनें आपला अभिप्राय नानांना कळविला.

त्या दिवशीं दवाखान्यांत एका शास्त्र्याचें एका तरुण सुधारकाचें व एका दरोडेखोराचें अशीं तीन प्रेतें येऊन पडलीं होतीं. शास्त्रीबोवांच्या घरीं त्यांच्या तीन विधवा मुली, दोन तरुण विधवा बहिणी व उत्तरवयांत केलेल्या दोन पोरसवदा स्त्रिया, याप्रमाणें सारी बायकामंडळीच असल्या-मुळें स्मशानयात्रेची तरतूद करून ठेवण्यासाठीं दूरदर्शीपणानें ते होऊनच मरायला दवाखान्यांत आले होते; साऱ्या जन्मभर सुधारणेच्या लांबलांब बाता मारल्यावर एकाएकीं पत्नी परलोकवासी झाल्यामुळें स्वतःवर आलेला पुनर्विवाहाचा प्रसंग टाळण्यासाठीं सुधारकानें अफू खाऊन जीव दिला होता; आणि दिवसाढवळ्या एके दिवशीं दरोडा घालीत असतांना गवगवा झाल्यावर चौथ्या मजल्यावरून उडी टाकल्यामुळें दरोडेखोराला मरण आलें होतें. तिघांचींही प्रेतें फाडून पाहतां सुधारकाचें हृदय माझ्या हृदयापेक्षांही कमकुवत होतें, असें ठरलें. सूक्ष्मदर्शक यंत्रानें शोधून पाहतांही शास्त्रीबुवांच्या हृदयाचा थांग न लागल्यामुळें त्यांना हृदयच नव्हतें असें सिद्ध झालें; आणि दरोडेखोराचें हृदय काळजासकट उफराटें लोंबकळत असलेलें आढळून आलें. अखेर सर्वानुमतें त्याचीच निवड झाली. पुढें मला दोन दिवस कोकाईनच्या पिपांत भिजत घातल्यावर माझें हृदय कापून काढून त्याच्या जागीं त्या दरोडेखोराचें उरफाटें हृदय सुलट करून चिकटवून दिलें. आणि त्याची क्रिया अव्याहत चालण्यासाठीं एक रास्कोप सिस्टिम लिव्हर वॉच कायमची किल्ली देऊन त्यावर बसविलें.

याप्रमाणें हें ' ऑपरेशन ' सुखरूप पार पडलें, व आम्ही आपल्या कार्याला लागलों.

वरील हकीकतींत वाचकांना एखाददुसरा शब्द अतिशयोक्तीचा आहे असें वाटण्याचा संभव आहे; परंतु ईश्वराला स्मरून मी प्रतिज्ञा करतों कीं, वरील मजकुरांत एक अक्षर वावगें लिहिलें असल्यास, ज्या टाकानें मी लिहीत आहें त्याची बोथी झडून जावो ! *

नानांनीं स्वतःसाठीं जुन्या दक्षिणी तऱ्हेचा गुढघ्याशीं गोष्टी सांगणारा मलमलीचा अंगरखा बरोबर आणलेला होताच. त्याचे हात चुण्याचे असून त्यापैकीं एकेकाची लांबी इतकी होती कीं, दोहोंचे नेहमींच्या हाताएवढाले तुकडे पाडले असते तर हजार हातांच्या सहस्त्रार्जुनालाही त्या अंगरख्यांच्या बाहेरची तसूभर धांदोटी लावल्यावांचून उपयोग करून घेतां आला असता. नानांच्या फार तरूणपणीं त्यांनीं एकदां ' विदाउट तिकीट ' प्रवास करून पाहिला होता. त्या प्रसंगीं ' मिशारनिल्हे ' अंगरखा त्यांच्या अंगांत होता. बोरीबंदर स्टेशनवर तिकिटकलेक्टरला ' पास ' असें सांगून झटक्यासरशीं बाहेर येतांना त्यानें आपला हात धरल्याचें गिरगांवांत येई-पर्यंत नानांना कळलें नाहीं, असें ते सांगत असतात ! थोडक्या वेळांत चुण्याच्या हातावरून पत्ता काढीत येऊन तिकिटकलेक्टरानें नानाजवळून योग्य ते पैसे वसूल करून घेतले ! हा अंगरखा अंगांत असला म्हणजे इंद्रायणी, मुळामुठा या नद्यांना नाना ' हातभरे लांबीचे झरे ' असें तुच्छतापूर्वक म्हणत असत. नानांच्या आजोबांच्या लग्नप्रसंगीं त्यांना पोशाखावर मिळालेलें दडिशें हात लांबीचें व मूळच्या तांबड्या व जुनेप-णाच्या काळ्या अशा दोन्ही रंगावर सारखाच हक्क सांगणोर पागोटें मुहूर्ताचें म्हणून नानांनीं बरोबर आणलें होतें. मात्र तें पुन्हां बांधून देण्या-साठीं पुण्यांतल्या साऱ्या पगडबंदांनीं मिळून कमींत कमी एक वर्षाची मुदत मागितल्यामुळें आणि खडकवासल्याच्या धरणांत कपडे धुण्याची परवानगी नसल्याकारणानें धोबी लोकांनीं ' टाटास्कीम ' चा तलाव तयार होईपर्यंत धीर धरावयास सांगितल्यामुळें नानांनीं तें पागोटें जुन्या स्वरूपांतच वापरण्याचा निश्चय केला. या पागोट्याला मधून विसावा

* मी नवी दुसरी आणीन. बाळकराम.

देण्यासाठीं नानांनीं स्वतःचा जुना रुमालही आणला होता. वस्त्रसृष्टींतलें लागेबांधे प्राणिसृष्टींतल्या लाग्याबांध्याप्रमाणें काळाबरोबर दृढ न होतां उलट तुटत जात असतात, या न्यायाला अनुसरून, नानांच्या रुमालाचें व त्यांच्या जरीच्या कांठांचें अलीकडे नीटसें सूत जमत नसल्यामुळें, त्यांचें परस्परांशीं इतक्या तुटकपणाचें वर्तन असे कीं, तें दुरून पाहणाराच्याही दृष्टीला येई. त्याचा तात्पुरता सलोखा संभाळण्यासाठीं रुमाल बांधून झाल्यावर त्याचे लोंबकळणारे कांठ वरून गुंडाळून घ्यावे लागत असल्यामुळें तो रुमाल चापूनचोपून बांधल्यानंतर गुजराती नाटकांतल्या राजांच्या मंदिलाप्रमाणें शोभिवंत दिसे, आणि एखादे वेळीं सारे कांठ उलट्या पट्टींत बसले म्हणजे त्यांत ओतारी लोकांच्या बेडौल पागोट्यांतली साधेपणाची झांक दिसून येई. नानांच्या पोषाखांत वीतभर रुंदीच्या करवतीकांठी नागपूरी उपरण्याचा उल्लेख केला, म्हणजे त्याचें वर्णन पूर्ण होतें. विरत चाललेल्या पोतामुळें नॉटिंगहॅमच्या जाळीदार विलायती कापडांतला पारदर्शकपणाचा अपूर्व गुण या पौर्वात्य कारागिरींत अलीकडे स्वतः दिसून पलीकडचे पदार्थही स्पष्ट दाखवूं लागला होता. मळक्या जुनेपणामुळें नीळसर झालेल्या या अंबरपटाच्या भर मध्यावर अगदीं नव्या हारकचें जाड ठिगळाचें पूर्ण चंद्रबिंब चमकत होतें. ही चंद्रकळा दिवसाढवळ्या पुरुषाच्या अंगावर दिसूं नये, म्हणून नानांना उपरणें ठाकठीक उभें चुणून केवळ काठांचा कंबरपट्टा कमरेंभोवती गुंडाळावा लागे !

माझ्या पोषाखाची धाटणी सुधारलेल्या बाण्याची होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे; परंतु नवाईनें नटण्याच्या हुच्चपणानें जुन्याला अजिबात चाट देण्याइतके अनुकरणांध मात्र आम्ही झालों नव्हतों ! बुटाचे लेस व खिशांतले हातरुमाल यांखेरीज बाकीच्या दरोबस्त चिजा जुन्या असून त्यांपैकीं बहुतेक तर जुन्या बाजारांतूनच घेतल्या होत्या, हें सर्व सांगावयास मला अभिमान वाटतो ! प्रथम पगड्यांची टूम निघाली त्या वेळीं नानांच्या वडिलांनीं एक सुबक पिवळी पगडी घेतली होती. तिचा माझ्यासाठीं जीर्णोद्धार करवयाचा नानांनीं निश्चय केला. नवेपणीं शंकराच्या जटेंतून निघणाऱ्या गंगामुखाप्रमाणें वर डोकावणारी पगडीची कोकी काळपुरुषाच्या बोजड पायाखालीं चिरडून पगडीच्या घेराच्या पातळीशीं

समांतर झाली होती. तिचा जर काळाठिक्कर पडल्यामुळें नारळाच्या चोडासारखा किंवा पार करपलेल्या करंजीसारखा दिसूं लागला होता. थोर घराण्यांतल्या कुलवधूप्रमाणें तिलाही आज कैक वर्षं सूर्याचें ऊन कसें तें माहीत नव्हतें. अर्थात् अशा कुलवधूची आपल्या मालकाच्या डोक्यावर बसण्यापेक्षां त्याच्या पायाशीं लोळण घेण्याची विशेष प्रवृत्ति दिसल्यास नवल नाहीं. शेवटीं आर्य नवरदेवाचे पूर्ण हक्क घेऊन मीं कातड्याच्या लहानशा वादीनें इंग्रजी टोपीच्या धर्तीवर पगडीला डोक्यावर खिळून टाकिली. माझा तांबड्या रेघांचा कफचा सदरा आंत घालून त्याची मूळची पडती कॉलर असूनही तिला एका नव्या कॉलरीची जुलुमाची जोड दिली. जुन्या बाजारांत एका काबुल्याजवळून एक खाकी रंगाची इजार व सोजिराचा तांबडा बनातीचा कोट अगदीं सस्तांत मिळाल्यामुळें नवीन मालाच्या दगदगींत मुळींच पडावें लागलें नाहीं. कोटाची शिवण ठिकठिकाणीं उसवल्यामुळें एखाद्या मुलानें फाजील हुंड्याची मागणी करतांच खांकाबगला वर करून मोकळें होण्याची चांगलीच सोय जमून आली होती. विजारीच्या डाव्या पायाला मात्र गुडघ्यापासून खालीं जाजमाच्या जुन्या खारव्याची जोड दिली असल्यामुळें, लांबून पाहणारास माझा एक पाय लांकडाचा असावा असा भास होत असे. आम्हीं रहावयास जें बिऱ्हाड घेतलें होतें, त्या जागीं आमच्या आधीं राहणाऱ्या पलटणींतल्या एका परदेशी पेन्शनर जमादारानें, घर सोडतांना आपल्या जुन्या बुटांचा जोड टाकून दिला होता, तो अनायासेंच आमच्या उपयोगी पडला. बुटांत तळवे साफ गेलेला एक पायमोजांचा जोडही सांपडला. मोज्यांना तळवे नसल्यामुळें एकपरी बरेंच झालें होतें! कारण, जुनें धोरण न सोडतां होतां होईतों 'अप्टुडेट फॅशन'मध्यें असण्याचा माझा विचार असल्यामुळें, मी विजार मूळची थोडीशी लांडी असतांही तिला चारचार बोटें दुमडून घेत असें, व अशा रीतीनें उघड्या पडलेल्या पोटऱ्या, बूट घातल्यावरही मोजे हवे तितके अलगऽवर ओढून घेऊन झांकून न टाकतां येत असत. नानांच्या उपरण्याचेंच जुळें भावंड माझ्याही कादिखांद्यावर खेळत असे. माझ्या हृदयांतच घड्याळ असल्यामुळें बाह्यात्कारी मीं एक शेडाच खिशांत लटकावून दिला होता.

अर्थात् या घड्याळाकडे मला अध्यात्मदृष्टीनेंच पाहावें लागत असे, हें सांगणें नकोच. उपरण्याचें कांठ अस्ताव्यस्त होऊं नयेत म्हणून टांचण्यांनीं मीं त्याला लांबलचक गळपट्टयाचें स्वरूप दिलें होतें. खिशांतला हातरुमाल वारंवार धुण्याची दगदग पडूं नये म्हणून त्याची सुरेख घडी घालून एका बाजूला टिपकागदाचा एक वेताचा तुकडा टांचण्यांनीं अडकवून टाकिला. घाम पुसतेवेळीं अर्थातच मीं टिपकागदाचा उपयोग करून हातरुमाल जशाचा तसा ठेवीत असें. याप्रमाणें काळे बुट, पांढरे पायमोजे. खाकी तुमान, तांबडा कोट आणि पिंवळी पगडी, अशा विविध रंगांचा साज घातल्यावर मी अक्षरशः पंचरंगी पोपटाप्रमाणें दिसत असें, व कधींकधीं तर उपरणें गळ्याभोंवतीं गुंडाळून ऐटीनें दोन्ही सोगे टाकून कंठ फुटल्याची खूणही पटवून देत असें.

"एक नूर अदमी और दस नूर कपडा" असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं! कारण, एकच तिंबूनाना, पण कपड्यांत जराजरा फेर केला, कीं निरानिराळे दिसूं लागत! पांढरा स्वच्छ पायघोळ अंगरखा न कमरे-भोंवतालचा उपरण्याचा कंबरपट्टा चढवून वर मोठें पागोटें ठेवलें, म्हणजे त्यांच्याकेड पाहतांच कृष्णशास्त्री चिपळूणकर, सर दिनकररावराजे राजवाडे, केरूनाना छत्रे वगैरे गेल्या शतकांतल्या त्या मध्यान्हीच्या तेजोभास्करांची आठवण होई; पगडी काढून पांढरा फेटा नीटनेटका बांधतांच तेच तिंबूनाना रेल्वेस्टेशनावरील रिफ्रेशमेन्ट रूमच्या दरवाज्यावरच्या 'वेटर'-सारखे दिसूं लागत; आणि रुमाल काढून बोडके उभे राहतांत देशी मिशनऱ्यांसारखे दिसत; रुमाल जरासा अस्ताव्यस्त बांधून गादीवर बसतांच अयोध्येच्या नबाबासारखे किंवा मशीर उल्मुल्कासारखे शोभूं लागत. मीसुद्धां कमरेला उपरणें गुंडाळून व बूट काढून उभा राहतांच गाडीमागें उभ्या राहणाऱ्या 'सइसा' सारखा दिसत असें.

माझें ऑपरेशन व आमचे पोषाख होईपर्यंत गेलेला वेळ आम्ही पूर्व-तयारीच्या किरकोळ बाबती उरकून घेण्यांत घालविला. पूर्वतयारींत कोणतेंही न्यून म्हणून राहूं द्यावयाचें नाहीं, अशी आमची भीष्मप्रतिज्ञा होती. हुंड्यापांड्यांचें जमून ऐन वेळीं रक्कम उभी करावयास अडचण पडूं नये म्हणून आबाभटजींना गांवीं पाठवून नानांच्या स्थावरजंगम

मिळकतीचें तपशीलावार टांचण व खातेपत्रें आणविलीं होतीं. खानेसुमारीच्या ऑफिसांत जाऊन हिंदुस्थानांतील लहानमोठ्या अविवाहित हिंदु लोकांचा नक्की आंकडा आणविला. भद्रेश्वर दीक्षितांचा पुण्यांतला सारा गोतावळा जमवून वरसंशोधनार्थ दाही दिशांकडे उधळून दिला. तमाम न्हावी लोकांना हजामती करतांना आपापल्या यजमानांजवळ आमच्याबद्दल गोष्टी काढण्याची पगारी कामगिरी सांगून टाकिली; ठळक अक्षरांत काढिलेल्या चार शिळांच्या मोठमोठ्या जाहिराती झाडून साऱ्या भिताडांवरून व बुरुजांवरून फडकवून दिल्या, जाहिरातींतील मजकूरः—

"येणार! येणार!! येणार!!!

गेल्यावर्षींचीच मंडळी पुन्हा येणार

**नवीन पोषाख!! नवीन मंडळी!!**

## ठकीच्या लग्नासाठीं!

पुढील महिन्यांत!

ठकीसह तिंबूनाना!

आबाभटजींसह चिमण्या!

जांवयास पोषाखासह नानाचें मुहूर्ताचें—

**पागोटें बक्षीस.**

वि. मा. ह. प. पाहा.

मॅनेजर, बाळकेराम."

या जाहिरातीनें पुणें शहरभर आमचें नांव ज्याच्या-त्याच्या तोंडीं झालें. लागलीच आम्हीं त्यांच्याही पुढें जाऊन ठिकठिकाणच्या वृत्तपत्रांतून व मासिक पुस्तकांतूनही पुढील आशयाची जाहिरात झळकावयास लाविली.

'लग्नास तयार!

वर पाहिजे! वधूपक्षाची कसलीही अट नाहीं!! मुलगी उत्तम, सुरेख, नाकींडोळीं नीटस. वयानें तिच्या पाठच्या भावांपेक्षां थोडी मोठी. शरीरानें सुदृढ बाळबोध वळणाची, हुंडा भरपूर, पत्रिका हव्या तितक्या, मुलीच्या सौंदर्याची आम्हींच तारीफ करण्यांत अर्थ नाहीं. अगदीं जन्मांधानेंसुद्धां तिच्या रूपानें चकित होऊन शून्यदृष्टीनें तिजकडे पाहात रहावें. दोन मुली

एकदम करणारास एक मुलगी इनाम ! ही सवलत तिंबूनानांच्या धाकट्या चारी मुलींचीं लग्नें होईपर्यंत देण्यांत येईल ! त्वरा करा ! तीन दिवसांत हटकून लग्न.

गरजूंनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावें, अगर बाजूस दिलेल्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. टपालहंशील माफ.

| | |
|---|---|
| तारेचा पत्ता;—'बाळक्या' | बाळकराम गणेश |
| टेलिफोन नंबर:—११॥ | पत्ता–घर नंबर १०९, |
| ग्रामोफोन नंबर:—२०३४२१७ | गुरुवार पेठ, पुणें, |

जाहिरातीचा मसुदा पाहून नाना निहायत खूष झाले; परंतु मुलींच्या सौंदर्याच्या उल्लेखाबद्दल मात्र ते जरा कच खाऊं लागले. तेव्हा मी त्यांची समजूत केली कीं, "नाना, हा जाहिरातींचा काळ आहे ! आजकाल जाहिरातींतून अचुक गुणकारी औषधांची भपकेदार वर्णनें येतात, त्यांच्यांत औषधापुरतें तरी सत्य सापडण्यासारखें असतें काय ? मग आपल्यालाच लोकाच्या भोळेपणाचा फायदा घ्यावयाला कोणती हरकत आहे ?"

याप्रमाणें सर्वतोपरी तयारी झाल्यावर आमची गाडी दररोज सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत पुणें शहराच्या पेठांपेठांतून, आळीआळींतून आणि गल्लीगल्लींतून फिरूं लागली, पुणें शहरच्या या दिग्विजयांत आम्हाला काय काय अनुभव आले त्याची माहिती पुढील खेपेस देण्याचें (कोणी न मागतांच) अभिवचन देऊन तूर्त वाचकाची रजा घेतों.

---

# लग्न मोडण्याचीं कारणें

" आतां एक विचार, कोणी नवरा; त्याशीं समर्पू म्हणें । "

मानवी बुद्धीच्या आटोक्यांत येणाऱ्या कोणत्याही विषयाच्या ज्ञानाचीं, सामान्यतः तात्त्विक (Theoretical) व व्यावहारिक (Practical) अशीं दोन अंगें असतात. यांपैकीं कोणत्याही एकाचाच परिचय होऊन भागत नाहीं. त्यांपैकीं कोणतेंही एक दुसऱ्यावांचून भटकतांना दिसलें, म्हणजे विरहावस्थेंतील प्रणयीजनाप्रमाणें बेवकूब ठरून तें उपासाहाला पात्र होतें. पहिल्याला ' पुस्तकी विद्या ' हें नांव मिळून दुसऱ्याची आडमुठेपणांत जमा होते. ' बारीक तांदूळ तितके चांगले, ' हें पुस्तकी सूत्र पाठ म्हणणारा पक्कपंडित व्यावहारिक ज्ञानाच्या अभावीं, बारकांतले बारीक तांदूळ म्हणून कण्याच घेऊन घरीं येतो ! पोहण्याच्या पुस्तकांतील नियम हृदयांत सांठवून, समोर मोठ्या मेजावर ठेवलेल्या बशीभर पाण्यांतल्या बेडकाबरहुकूम हातपाय पाखडणारा तितीर्षु बारा वर्षें असें अध्ययन करूनही शेवटीं स्नान करितांना झोंक जाऊन बालडीभर पाण्यांत बुडून मेल्यास नवल नाहीं ! चोवीस वर्षांच्या एका नवरदेवाऐवजीं बाराबारा वर्षांचे दोन बिचवे चालतील किंवा नाहीं, ही शंका काढणारें डोकेंही केवळ एकांगी ज्ञानानेंच एकीकडे कलतें झालें असलें पाहिजे. उलटपक्षीं, संथपणें चाकूनें पोट चिरून, वाढलेली पानथरी बेताची कापून पुन्हां जागच्या जागीं चिकटवून चांगल्याँ लडीच्या दोऱ्यानें पोट शिवून जसेंच्या तसें आगबंद केलें असतांही रोगी मेल्याबद्दल आश्चर्यचकित होणारा नाकाडोळ्याचा वैदू तात्त्विक ज्ञानाचें अज्ञान दाखवितो. तात्पर्य, ज्ञानाच्या या दोन्ही बाजू मनुष्याला अवगत असल्याखेरीज कोणत्याही बाबतींत त्याची खरी वाहवा होत नाहीं; आणि याच कारणामुळें, पहिल्या लेखांकांत वरसंशोधनाचें तात्त्विक ज्ञान वाचकांपुढें ठेवून, मागील खेपेला कबूल केल्याप्रमाणें प्रस्तुत ज्ञानाची व्यवहारांत अंमलबजावणी कशी होते, हें सांगण्याचा मनसुबा आहे.

गांवांत नवीन दिसूं लागणाऱ्या कोणत्याही गोष्टीची गांवगुंडांकडून पहिली हजेरी होते, व पुढें शिष्ट लोक तिची संभावना करितात, हा सार्वत्रिक नियमच आहे. आमची गाडीही या नियमाला अपवादभूत झाली नाहीं. गाडीरस्त्यानें पुणें शहराच्या सरहद्दीजवळ येऊन ठेपतांच आम्हां हिंदु लोकांच्या उपजत व्यवहारबुद्धीला अनुसरून, आमच्या भरल्या गाडीची जकात चुकवून टोलनाक्यावरून राजरोस कसें जावें याचा आम्ही विचार करूं लागलों. हमरस्ता सोडून गाडी टोलनाक्याच्या पाठीकडून नेऊन थोड्या अंतरावर गेल्यावर रस्त्याला मिळवून घ्यावी, असें माझें मत होतें; सर्वजनांनीं शक्य तितका बोजा खांद्यावर घेऊन चालत गेल्यानें रिकाम्या गाडीला जकात पडणार नाहीं, असें नानांचें म्हणणें पडलें; आणि एखाद्यानें पुढें जाऊन नाकेदाराला पानतंबाखूच्या नादांत गुंतवून गाडी मुकाट्यानें हाकून न्यावी, असा गनिमी कावा आबाभटजी सुचवीत होते. या गनिमी काव्यांत पुढाकार घेऊन नाकेदाराशीं जाऊन भिडण्यांत आबाचा एक तलफ भागविण्यापुरता आपलपोटेपणाचाच हेतु होता, हें सांगणें नकोच ! बराच वेळ भवति न भवति होऊनही आमचें एकमत होईना. अखेर या तिरंगी सामान्याच्या भरांत वादविषयक लबाडीचाही विसर पडून आम्ही मोठमोठ्यानें वादविवाद करावयाला लागतांच हळुहळू आमच्याभोंवतीं गांवगुंडांचें एक भरीव कडें जमूं लागलें, आणि त्यांच्यांत आमच्याबद्दल हमरीतुमरीची कुजबुज सुरू झाली. गाडींतल्या सामानाच्या विविधतेमुळें आमच्याबद्दल त्या लोकांची भलतीच समजूत झाल्यास तींत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यांतील अगदीं मागासलेला वर्ग, आम्हांला '**खजिनदार संगीत मंडळी**' च्या जामदारखान्यांतील रत्नें ठरविण्याचा प्रयत्न करीत असून, दुसरा पक्ष एका स्त्री संगीत नाटकमंडळींतून फुटून नवीन मंडळी काढल्याचें श्रेय आमच्या पदरीं बांधीत होता. खोबरेल तेलानें चबचबलेल्या आणि बऱ्याच वाढलेल्या केंसांचा ठकीच्या मानेपेक्षांही तिर्कस भांग काढणाऱ्या, आणि घरीं धुतल्यामुळें म्हाताऱ्या माणसाच्या चेहऱ्याप्रमाणें सुरकुतलेल्या खमिसावर बिनगुंड्यांचा मळकट पांढरा अंगरखा घालणाऱ्या एका मुलानें तर स्त्री-संगीतवाल्या पक्षाला जोराचा दुजोरा देऊन, गेल्या महिन्यांत मुंबई

मुक्कामीं, तिंबूनाना ‘ मृच्छकटिकां ’ त मांगाचें, मला ‘ सत्यविजयां ’ त भुताचें आणि आबाभटजींना ‘ रामराज्यावियोगां ’ त मंथरेचें काम करतांना पाहिल्याचें प्रतिज्ञेवर सांगितलें ! शेवटीं, त्यानें स्वतः आबांवर वर्षाव केल्याचें सांगतांच सर्वांची खात्री होऊन आम्ही एकमतानें एका नाटकमंडळीचे चालक व मालक ठरलों. जातां जातां एका धाडशी इसमानें पुण्यास आमचा पहिला खेळ कोणता व कधीं होणार, एवढें विचारण्यापलीकडे यानंतर कांहीं विशेष घडलें नाहीं. डाव्या मिशीला चाई लागल्यामुळें आलेला तोंडाचा विद्रूपणा घालविण्यासाठीं आबाभटजींसाठीं क्षौरकर्माच्या धार्मिक सवलतींचा फायदा घेत असल्यामुळें त्यांना मंथरेचें सोंग करण्याचें प्रायश्चित्त मिळालें असावें, असें आम्ही तेव्हांच तरकलों. प्रायश्चित्तामुळें क्षौर करण्याऐवजीं क्षौरामुळें प्रायश्चित भोगण्याचा हा प्रसंग आबाभटजींना मात्र फारसा रुचला नाहीं, असें त्यांनीं मंथरेच्या सवाई हावभावांनीं आमच्या निदर्शनाला आणून दिलें. अखेर अशा प्रकारच्या चिकित्सेला भिऊन जकातीचा लकडा चुकविण्यापेक्षां आधीं या गांवगुंडांचा लकडा चुकविलेला बरा, अशा विचारानें आम्हीं जकातीची भरपाई करून गाडी एकदांची गांवांत आणली.

आमच्या आगमनाची कारणासकट प्रसिद्धि साऱ्या शहरभर होण्यासाठीं आम्हीं काय काय प्रयत्न केले, त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन गेल्या खेपेला केलेलेंच आहे. कांहीं दिवस पुण्यास घालविल्यानंतर प्रसिद्धीचे एकदोन ठळक मार्ग राहिले होते, त्यांचाहि उपयोग करून घेतला. रस्त्यांत दोन माणसें एकमेकांशीं भांडतांना दृष्टीस पडलीं, म्हणजे रिकामटेकड्या चौकसांची त्यांच्याभोंवतीं केवढी गर्दी जमते, याचा अंदाज होतांच, नाना आबाभटजी व मी आपसांत जोड्या ठरवून वेळीं–अवेळीं भरचवाठ्यावर लटकीं भांडणें निकरानें भांडून मधून मधून आमच्या नांवांचा भरपूर उल्लेख करूं लागलों. मात्र, या सर्व भांडणांतून ‘ **ठकीचें लग्न** ’ हें एकच कारण ठेवण्याबद्दल आम्ही कांटेतोल सावधगिरी ठेवीत होतों ! या मार्गानें साऱ्या शहराची आमच्याशीं तोंडओळख झाली.

याप्रमाणें जय्यत तयारी झाल्यावर आम्हीं प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आमची ही फेरणी सारखी चालू असे.

शाळा, कॉलेजें, ऑफिसें, कचेऱ्या, हॉटेलें, दवाखाने, फिरावयाला जाण्याच्या जागा, नदीकांठ, तालमी, आखाडें, देवळें, बाजारचौक, गिरण्या, कारखाने, व्याख्यानस्थलें, नाटकगृहें, खाणावळी—सारांश, जेथें जेथें तरुण मंडळी येण्याचा संभव असतो, तेथें तेथें जाऊन वराचा तपास करण्याचा धुमधडाका मांडला. आमची विशेष मदार शाळांवर असल्यामुळें सर्व प्रकारच्या शाळांची हजिरी घेण्याची आम्हीं शिकस्त केली. मराठी शाळा, इंग्रजी शाळा यांपासून तहत वेदशाळा, वेधशाळां-पर्यंत झाडून साऱ्या शाळा पालथ्या घातल्या; धर्मशाळासुद्धां आम्हीं सोडल्या नाहींत. येरवड्याच्या बेकार मुलांच्या शाळेंतूनसुद्धां एक चक्कर घेऊन येण्यास चुकलों नाहीं. इतकेंच नव्हे, तर एका आदितवारीं इतर शाळांना सुट्टी असल्यामुळें शेवटीं पांजरपोळांतील गोशाळासुद्धां आम्हीं नजरेखालीं घातली. या शेवटच्या शाळेंत एक विशेष आढळून आला तो नमूद केल्यावांचून राहवत नाहीं. इतर प्रकारच्या शाळांतील विद्यार्थी बुद्धिबळाच्या बाबतींत बहुतेक या शाळेंतल्या रहिवाशांच्या लायकीचे असूनही त्यांची हुंड्याची धांव हजारपांचशांच्या पैकीं असावयाची, आणि या शाळेंत मात्र हुंड्याची हुंडी पांचपन्नासापलीकडे जातांना दिसली नाहीं; तथापि होतां होईतों दोन पायांचें जनावरच गांठण्याचा आमचा संकल्प असल्यामुळें, गोशाळेंतल्या स्वस्ताईचा फायदा आम्हांला घेतां येईना. दवाखान्यांचीही अशीच शिरगणती करण्याचा ठराव केल्यामुळें आम्हांला शेवटीं वेड्यांच्या दवाखान्यांतही मुलांची चौकशी करण्यासाठीं शिरकाव करण्याचा प्रयत्न करावा लागला. आमच्या येण्याचें कारण ऐकतांच आमच्या इच्छेबरहुकूम त्या दवाखान्यावरच्या अधिकारी लोकांनीं आम्हांला आंत शिरण्याची परवानगी दिली; परंतु त्यांच्या एकंदर झोंकावरून त्या दवा-खान्याशीं आमचा निराळ्याच प्रकारचा संबंध जोडण्याचा त्यांचा मानस आमच्या तावडतोब लक्षांत आला. मुलीचें लग्न जमविण्याच्या नादानें आमचीं माथीं फिरल्याचा आरोप आमच्या माथीं मारून, आम्हीं त्यांच्या त्या समाजाविरुद्ध गडबड करतांच विशेष खात्री झाल्यामुळें आमचे मेंदू तपासण्यासाठीं त्यांनीं आमची थोरल्या दवाखान्यांत रवानगी केली. तेथें सुद्धां नानांच्या चेहऱ्यावरील फाजील आविर्भावांमुळें व आबाभटजींच्या

चेहऱ्यावरील सर्व विकारशून्यतेमुळें थोरल्या डॉक्टरसाहेबांचीही आमच्या-बद्दल नजर फिरलेली दिसूं लागली. तरी बरें झालें, मला ऐन वेळीं बुद्धि सुचली ! नाहीं तर नानांनीं आणखी एक घोंटाळा करून ठेवला असता. डॉक्टरमजकूर नानांचा मेंदू तपाशीत असतां त्यांचें डोकें एका तरुण हिंदु विद्यार्थ्यानें धरून ठेवलें होतें, तेवढ्यांत नानांनीं त्याचे पाय धरून पोरीला पदरांत घेण्याची विनंती करावयास सुरवात केली; परंतु या विनंतीचा चालू तपासणीवर फारच अनिष्ट परिणाम होईल, हें लक्षांत येतांच मीं नानांना दटाविलें. अखेर डॉक्टरसाहेबांनीं आमचा मेंदू शाबूत आहे, असें ठरवून आम्हांला सोडून दिलें, आणि सतत तीन वर्षे मुलीच्या लग्नाच्या विवंचनेंत असूनही आम्ही खरे खरे वेडे कसे ठरलों नाहीं, याबद्दल आश्चर्य करीत आम्ही घराकडे वळलों. विचारांतीं डॉक्टरी विद्येवरचा माझा विश्वास पार उडाला.

या सुमाराला पुणें शहरांत आमच्यासारखे अनेक तेलंग भिक्षुक अनेक ठिकाणांहून येऊन वरसंशोधनाचा खटाटोप करीत होते. वऱ्हाडांतून आलेले एक गृहस्थ कोणाशीं ओळखपाळख नसल्यामुळें एखाद्या चुकलेल्या वाटसराप्रमाणें रोज वाचनालयांत जाऊन बसत, व आल्यागेल्याजवळ मुलाची चौकशी करीत. एक कुलीन मराठे गृहस्थ कॉलेजांतल्या एका स्थळाच्या नादीं भरून सारखे हेलपाटे घालीत होते. सदर स्थळाच्या व त्यांच्या दरम्यान झालेल्या सहामाहीभाराच्या पत्रव्यवहाराचें भलें मोठें बाड तें बरोबर बाळगीत असत. या स्थाळानें प्रथम मामूल हुंडा घेण्याचें कबूल करून पुढें सहा महिने सारखी चाळवाचाळव केली, व अखेर बेसुमार हुंडाच्याच अटीमुळें गृहस्थमजकुरांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या. या बिचाऱ्या थोर गृहस्थांनीं तो सारा पत्रव्यवहार मला वाचून दाखविला त्यावरून मागासलेल्या जातींनींसुद्धां हुंड्यापांड्यासारख्या बाबतींत तरी आम्हां उच्च म्हणविणाऱ्या जातींच्या बरोबरीनें चालीस चाल ठेविली आहे, हें पाहून मला साभिमान कौतुक वाटलें ! एक म्हातारी देशस्थ विधवा इतर कोणीं जबाबदार आप्तसंबंधी नसल्यामुळें आपल्या बाराचौदा वर्षांच्या दोन उपवर नातींना बरोबर घेऊन साऱ्या गांवभर भटकत होती, पोरी अगदीं नक्षत्रांसारख्या सुंदर—पण बाई पडली गरीब ! ज्याच्यात्याच्या-

जवळ तोंडवेंगाडगी करून शेवटीं दोन महिन्यांच्या रिकाम्या रखडपट्टीनें कंटाळून त्या हतभागी जीवानें परत आपल्या गांवचा रस्ता धरला. दाखविण्यासाठीं म्हणून आणलेल्या त्या दोन सुंदर बालिकांसह त्या म्हातारीला उन्हातान्हांतून दारोदार उंबरठे झिजवितांना पाहिलें, म्हणजे आमच्या वैवाहिक चालीरातींबद्दल मला मोठा अभिमान वाटे! आम्हीं आमच्या बायकांना घरांतच कोंडून ठेवतों, त्यांच्या शहाणपणाला चुलखंडांतच होमून टाकतों, वगैरे वाष्कळ बडबड करणाऱ्या चारगट सुधारकांनीं या गोष्टीकडे जरूर लक्ष द्यावें. त्या आईच्या शहाणपणाला गांवगन्ना मोकळें सोडून व त्रिखंड धुंडाळायला लावून सारी गंमत निर्विकार मनानें पाहणाऱ्या समाजानें बायकांवर आणखी कोणती जबाबदारींचीं कामें टाकावयाला पाहिजेत?

मुली दाखवायला नेण्याची वहिवाटही विविध रूपाची आहे. कोठें बापाच्या मित्राच्या कारकुनानें वधूपक्षाच्या उपाध्यायाची टापशी पाहूनही मुलगी पाहण्याचा कार्यभाग उरकतो, तर कोठें स्वतः मुलगा आपल्या इष्टमित्रांच्या उपदेशमंडळा ( Board of advisers ) सह मुलीची मानसिक व शारीरिक व्यंगांबद्दल कसून खातरी करून घेतो. मुलीची परीक्षा हलक्या आवाजांत एखादें काम सांगून घेण्यांत येतें. डोळ्यांची परीक्षा घेण्यासाठीं भातकुणांतून दोरा ओवायला सांगण्याची वहिवाट आहे. अलीकडे सुधारलेल्या रीतीप्रमाणें हे मार्ग मागें पडून वाचन, संभाषण आणि विशेषतः रूपनिरीक्षण या गोष्टींवरच विशेष भिस्त ठेवण्यांत येते. कधीं मुलगी पहावयाला मुलीच्या घरीं येतात, तर कधीं मुलीला घेऊन गांवपरगांव करावें लागतात. आमच्याप्रमाणें कित्येक गरजवंत कोणी खिशांत मुलीचा फोटो घेऊन तर कोणी मुलगीच खांकोटीला मारून फिरत असलेले आम्हाला ठिकठिकाणीं आढळून येत. स्वतः मुलानेंच—त्यांतल्यात्यांत जरा शिकलेल्या मुलानें—मुलगी पाहण्याचा प्रसंग आला म्हणजे एखाद्या वेळीं मोठें मासलेवाईक प्रकार नजरेला पडतात. आपल्यापुढें गुडघ्यांत मान घालून बसलेल्या त्या हतभागी प्राण्याची जी हेटाळणी चालते आणि जें अनादरपूर्वक फिदिफिदी हांसणें उकळतें, तें पाहून त्या चढेल चटोराचा व त्याच्या सल्लागारमंडळाचा तिट्कार आल्यावांचून राहत नाहीं. त्यावेळीं

स्वतःची बुद्धिमत्ता व चाणाक्षपणा दाखविण्यासाठीं त्या गरीब जनावरावर वाटेल त्या प्रश्नांचा मारा होतो. या बाबतींतील कांहीं कांहीं आचरट व अत्यंत निंद्य प्रकार वेळोवेळीं पाहिल्यावरहि त्यांबद्दल दोन शब्द लिहिल्यावांचून कसें राहावेल? अशा अवघड परीक्षेंत सांपडलेल्या त्या मुक्या अर्भकाच्या मनाची काय दशा होत असेल बरें! '**अडकली गाय आणि फटके खाय!**' अशा वृत्तीनें धरणीमातेला दुभंग व्हावयाला—आपल्या हृदयाप्रमाणेंच दुभंग व्हावयाला—ती विनवीत नसेल काय? बाजारांत आठबारा आण्याची निर्जीव बाहुली विकत घेण्यापूर्वीं ती पाहतांना तिच्या कपड्यांना मळके हात न लावण्याची आम्ही जपून सावधगिरी घेतों आणि जन्माची सोबतीण पाहतांना तिच्या हृदयाच्याही चिंध्यापांध्या करतांना आम्हीं मागेंपुढें पहात नाहीं! माझ्या दयाशील वाचकभगिनींनो! स्त्रीजातीचा अभिमान धरा! अगदीं नाइलाजामुळें कां होईना—पण अशा रीतीनें आपल्या पोटच्या गोळ्याचें प्रदर्शन करण्वयाला तयार होणाऱ्या 'घर'च्या मंडळीच्या आड या, आणि दुसऱ्याच्या आंतड्यांची अशी हेटाळणी करावयास सरसावणाऱ्या आपल्या उच्छृंखल मुलांभावांना आळा घाला! वर जे दोन शब्द लिहिले, ते तुमच्या पवित्र नावांचा उपमर्द करण्यासाठीं नाहींत; तर त्याच्यांशीं दांडगाई करणाऱ्या हुच्चपणाला हाणून पाडण्यासाठींच! ज्या मंगलमयी मूर्तीला 'गृहदेवता' म्हणून घरांत आणावयाची, तिला पाहतांना भांबुर्ड्यांच्या गुरांच्या बाजारांत गाई-म्हशींची खरेदी करतांना दाखविण्यांत येणारी आस्था व पूज्यबुद्धिही ज्या कांहीं नरपशूंच्या ठायीं दिसून येत नाहीं, त्यांचा उल्लेख चांगल्या रीतीनें करावयाचा तरी कसा? त्याचप्रमाणें वधूवरांच्या जाहिराती लावण्याची अपमानास्पद व हलकेपणाची चाल प्रचारांत येण्याचा उपजता आरंभ होत आहे, तोंच तिची पीछेहाट करण्यासाठीं जर अंमळ कडक थट्टा केली, तर तीमुळें फाजील सभ्य नाकांनीं मुरडीवर मुरडी पलटाविल्या तरी हरकत नाहीं; पण भगिनींनों! तुम्ही तरी बिचाऱ्या बाळकरामाच्या हेतूचा विपर्यासानें अर्थ करणार नाहीं, असा भरंवसा आहे. जीवाभावाच्या मोलाच्या पोटच्या गोळ्याच्या नांवाच्या दीडदमडीच्या औषधांच्या गोळ्याप्रमाणें, खरेदीविक्रीसाठीं जाहिराती लागलेल्या तुम्हांला तरी आवडतील काय?

युनिव्हर्सिटीच्या मंडपांतून अवघड 'पेपर'मुळें अर्धमुर्धी गचांडी खाऊन बाहेर निघालेले विद्यार्थी ज्याप्रमाणें आशावादीपणानें आपल्या सजातीयांशीं आपापल्या प्रश्नांचीं उत्तरें ताडून पाहतात, त्याप्रमाणें आमच्यांत व वरील मंडळींतही वरसंशोधनाबद्दल विचारपूस व वाटाघाट होत असे. आमच्या मानानें त्या लोकांनीं स्वतःच्या प्रसिद्धीसाठीं केलेले प्रयत्न आम्हांला अगदीं कमकुवतपणाचे वाटत. आमचा खाक्या अगदींच निराळा! आपल्या हेतूच्या प्रसिद्धीसाठीं कोणतीही गोष्ट करावयाला कसूर म्हणून करावयाची नाहीं, हा आमचा बाणा होता. दुकानदाराच्या दारावरील पाट्या पाहतांच आमच्याही दरवाज्यावर आम्हीं 'बाळकराम आणि मंडळी'ची एक पाटी लटकावून दिली. नागरमंडळा–(Municipal committee) च्या निवडणुकींच्या वेळीं निरनिराळे उमेदवार आपापल्या मतदारांची नेआण करण्यासाठीं गुंतविलेल्या टांग्यांवर व व्हिक्टोरियांवर आपापल्या नांवांच्या पाट्या लावतात; हें पाहतांच आमच्या गाडीच्या टाट्यालाही आम्हीं आमची पाटी लोंबकळवून दिली. फार काय सांगावें, एका ठिकाणीं ओळख पटविण्यासाठीं भाऊराव आमच्या गांवाहून पुण्याला आला असतां आम्हीं त्याला आणण्यासाठीं आमची गाडी स्टेशनावर नेली, व येते वेळीं गाडीचे बैल सोडून आम्हीच ती ओढावयास लागलों. जरासा गाजावाजा करतांच आमच्याभोंवतीं चांगली गर्दी जमली. अशा प्रकारच्या माझ्या कल्पकतेमुळें पुणें शहरांत 'बाळकराम' हें नांव ज्याच्यात्याच्या तोंडीं झालें!

मुलांची चौकशी करितांना आम्हीं पंक्तिप्रपंच मुळींच केला नाहीं व कसला संकोचही ठेवला नाहीं. केव्हांही, कोठेंही, कोणताही तरुण दृष्टीस पडला, कीं आम्ही "यंदां कर्तव्य आहे का?" "हुंड्याचा काय मानस आहे?" "पत्रिका पाहणार काय?" वगैरे प्रश्नांचा मारा सुरू करून थेट मुलगी दाखविण्यापर्यंत मजल नेऊन ठेपवीत होतों. पुण्यांतल्या यच्चयावत् तरुण सृष्टीला आम्ही याप्रकारें प्रश्नचिन्हांकित करीत चाललों होतों. विद्यादेवीला डोक्याकर घेऊन नाचणाऱ्या कॉलेजकर तरुणांपासून तों तिला पायांखालीं तुडविणाऱ्या तालीमबाजांपर्यंत, तक्क्याशीं टेकून बसलेल्या शेठजींपासून तों हॉटेलांतील कपबशा धुणाऱ्या हरकाम्यापर्यंत,

झाकीचा पोषाख करणाऱ्या पालखीपदस्थापासून तों तहत खाकीचा युनिफॉर्म घालणाऱ्या टांगेवाल्यापर्यंत जो जो म्हणून ' लग्नाला योग्य ' असा तरुण दृष्टीला पडे, त्याला त्याला आम्ही आमच्या प्रश्नांच्या जाळ्यांत गुरफटून टाकीत होतों. कितीही नकार मिळाले तरी तिळमात्र हिय्या न खचूं देतां, सारख्या नेटानें नित्य नव्या किंवा त्याच त्याच वृत्तपत्रांवर व मासिकपुस्तकांवर आपल्या लेखांचा भडिमार करणाऱ्या नवीन लेखकाच्या ताज्या दमानें आम्हीं वाटेल त्यावर हल्ला करण्याची चिकाटी सोडिली नाहीं. अल्पावकाशांतच आमची गाडी सर्वांच्या नीट लक्षांत ठसून ती समोर दिसूं लागतांच जो तो तरुण तोंड चुकवावयाला लागला. प्रत्येकाला आमची भीति वाटूं लागली. पुढें पुढें तर तरुण मंडळी आमच्या वाऱ्या-लाही उभी राहीनाशी झाली. रानांत पारध्याची चाहूल ऐकतांच झुडुपांखालीं दबा धरून बसणाऱ्या सशाप्रमाणें, स्वैर भटकणारे तरुण आमच्या गाडीची घंटा कानीं पडतांच जागच्या जागींच दडी मारून बसत. कोणत्याही तरुणाच्या अंगीं कसलाही दांडगा सैतान संचारला असला, तरी आमच्यापुढें त्याची क्षणमात्रही मात्रा चालत नसे. मामूल वहिवाटीप्रमाणें पोरासोरी खच्चून भरलेलीं पुण्यांतलीं सभास्थानें आम्हीं आंत पाऊल टाकतांच ओसाड पडून जिकडेतिकडे शुक्क होऊन जात असत. एखाद्या शाळेच्या दाराशीं आमची गाडी उभी राहतांच सर्व शाळाभर एकदम शुकशुकाट होऊन इन्स्पेक्टरची तपासणी आल्याप्रमाणें शाळेंत शांतता होत असे. कित्येक कच्च्या दिलाचे तरुण तर रात्रींअपरात्रीं दडपल्यासारखे होऊन आमच्या नांवानें बरळत दचकून उठत. आमच्या तोंडाला तोंड देण्यापेक्षां वाटेल त्या संकटाला तोंड देण्याची तरुणांची तयारी दिसूं लागली. एकदां तर नदींत डुंबत असलेल्या एका तरुणानें आम्हांला घांटावर पाहतांच तोंड चुकविण्यासाठीं तळाशीं बुडी मारून कायमची जलसमाधि घेतली. खेडेगांवांतून काळीजकाढे आल्याची बातमी पसरली, म्हणजे पोरांची जी पळापळ होते, तीच ' बाळक्या आला रे आला ! ' या आरोळीनें होऊं लागली.

या रीतीनें तिन्हीत्रिकाळ सारखी टेहळणी चालू असतांना, आमचे प्रयत्न सर्वस्वींच फसत असत, असें नाहीं. कधींकधीं आमचे प्रयत्न

मोहरण्याच्या सुमाराला त्यांच्यावर आभाळ येई, तर कधीं आमच्या प्रयत्नांचें फळ ऐन पाडाला येऊन डागळावयाला लागे. एखादें लग्न जमवितांना विघ्नांचें बाहुल्य किती असतें, या गोष्टीची आम्हांला या वेळीं चांगली जाणीव पडली. पत्रिकांच्या भानगडींत एखाद्या वेळीं मंगळ आडवा पडे, आणि एखाद्या वेळीं शनीची साडेसाती भोंवे. कधीं एकनाड येई ! तर कधीं एक रास जमून येई. या ठिकाणीं ग्रहांचें षडाष्टक निघावें तो त्या ठिकाणीं माणसांचें खडाष्टक व्हावें ! कोठें देवगणाचा राक्षसगणाशीं सामना जुंपे, तर कोठें राक्षणगण मनुष्याला गिळावयाला तयार होई. कोठें गोत्राशीं बस्तान बसावें, तों मामाचें गोत्र अडून बसे ! कोठें पत्रिका जमल्या, तर हुंड्याची उडी अजीबात आमच्या डोक्यावरून जाई ! एक ठिकाणीं काय तर म्हणे, वरणभात होतो, तर दुसरीकडे बादरायणसंबंधानें परतवेल होते. एका मुलानें हुंडा घेण्याचें उदार मनानें नाकारलें; पण तो विलायतेला जाऊन दोन वर्षें राहण्याचा खर्च मागूं लागला. हा खर्च दिला असता तर त्याची विलायतेंत राहण्याची उत्तम सोय झाली असती; पण मग तिंबूनानांना मात्र हिंदुस्थानांत राहावयाची सोय उरली नसली. हुंड्यावर असेंच पाणी सोडणारा दुसरा एक महात्मा मोटरसाठीं हटून बसला. त्याला मोटर घेऊन दिल्यावर सर्वसंगपरित्याग करून नानांना त्याच मोटरीखालीं सांपडून मरण्याखेरीज गत्यंतर नव्हतें ! तिसऱ्या एका उदारधीनें हुंड्यापांड्याबद्दल अवाक्षर न काढतां दोन्हीकडून नानांनीं कार्य करून घेतल्यास लग्नाची कबूलजबाबी दिली. दोन्हीकडून लग्न करावयाच्या प्रसंगीं पोरीला दूधभात घालून पिवळी केली व मणिमंगळसूत्र बांधलें म्हणजे आटोपलें, अशा समजुतीनें या कराराला नाना तेव्हांच तयार झाले. परंतु सदर नवरदेव उच्चकुलीन असल्यामुळें लग्नसमारंभ मात्र त्यांच्या इभ्रतीला साजेसा झाला पाहिजे, अशी त्यांनीं अट घातली होती. त्यांच्या मानापनाबरहुकूम खर्चाचा कच्चा खर्डा पाहतांच नानांच्या पोटांत धस्स होऊन त्यांनीं तो नाद सोडून दिला. कारण, त्या बेतानें खर्च केल्यानंतर मिरवणुकीच्या प्रसंगीं नानांना निराळा बेंडबाजा आणण्याचें प्रयोजनच राहिलें नसतें ! त्याचप्रमाणें एका मुनिमानें हुंड्याबद्दल अगदीं विरूद्ध बोलून करणीपोषाखासाठीं मात्र एवढ्या जबर रकमेची

मागणी केली, कीं, ' करणी कसाबाची व बोलणीं मानभावाचीं ' ही म्हण थोडीशी बदलून ' करणी जांवयाची व बोलणीं मानपानाचीं ' या स्वरूपानें लग्नकार्यांतून तिचा उपयोग करावा, असें मला वाटूं लागलें. स्वतःला पोषाख चढविण्यांत नानांना साफ नागविण्याचा त्याचा निर्धार झालेला दिसत होता. याप्रमाणें बेसुमार मागण्या मागतांना भावी बायकोच्या बापाचा माल म्हणजे आपल्याच बापाचा माल, अशी या चढेल उदार कर्णाची समजूत झालेली दिसून येते. एका ठिकाणीं सर्व गोष्टी यथासांग जुळून शेवटीं मुलानें आपलें लग्न पूर्वींच झाल्याचें सांगून टाकलें. दुसऱ्या एका आचरटानें सारें ठरवून अखेर आपली भलतीच जात असल्याचें सांगितलें. तिसऱ्या एका फारच जुन्या—अगदीं बुरसलेल्या वळणाच्या मनुष्यानें ठकीची अत्यंत धार्मिक रीतीनें परीक्षा घेऊन लग्नाला प्रथम रुकार दिला. अगदीं मनूच्या वचनाप्रमाणें मुलीला तारांपैकीं, नद्यांपैकीं, किंवा फुलांपैकीं, नांव ठेवलेलें नाहीं, हें सुद्धां या धर्ममूर्तींनें चौकस रीतीनें पाहून घेतलें. हें स्थळ जवळजवळ कायमचें ठरल्यासारखें झाल्यामुळें ठकीचें अगदीं जाडेंभरडें रासवट नांव ठेवल्याबद्दल आम्ही आपल्याला धन्यवाद देऊं लागलों; परंतु अखेर, मुलगी बसली म्हणजे तिचे मोकळे केंस जमिनीला लागतात. आणि हें लक्षण माहेरकरांना वाईट असतें, अशा रूढ कारणामुळें त्याच्या घरच्या बायकांनीं लग्न मोडून काढिलें ! माहेरकरांना वाईट असलेल्या लक्षणामुळें भावी सासरकरांनीं पोर नाकारणें, आणि जमिनीवर लोंबणाऱ्या केंसामुळें माहेरकरांचा सत्यानाश होणें, या दोन कार्यकारणभावांत बलवत्तर कोणता, हें ठरविण्याचें काम मी माझ्या वाचकांवरचा सोंपवून मोकळा होतों. मुलीची जीभ नाकाला लागते किंवा मधलें बोट मागें वांकविलें तर मनगटाला लागतें, यासाठींसुद्धां लग्नें फिसकटल्याचीं उदाहरणें एक दोन जागीं आढळून आलीं. एका माउलीनें तर ठकीला जेवावयाला बसवून जेवतांना मुलगी एक बोट वळवते, एवढ्यावरच आम्हाला निरोप दिला. आणखी एका ठिकाणीं असाच बायकांनीं मोडता घातला. आम्हीं सारी इमारत अगदीं कळसापर्यंत चढवीत नेल्यावर ऐन गृहप्रवेशाच्या वेळींच बायकांनीं इमारतीचा पायाच खचवून टाकला. ठकीच्या मामीच्या सावत्र सख्ख्या

भावजयीच्या आतेबहिणीची चुलतनणंद पहिलीं एकदोन वर्षे सासरीं नांदत नव्हती, अशी विनतारायंत्राची बातमी कोठून मिळाल्यामुळें मुलीच्या माहेरकरांचें वळण वाईट असल्याबद्दल सर्रास शेरा मारून त्यांनीं लग्न फिसकटून टाकलें! एकदां मुलाच्या मामाच्या मोलकरणीच्या मुलाची व आमच्या गाडीवाल्याच्या दत्तक बापाची एक नाड जमल्यामुळें लग्न जमेना व दुसऱ्यांदां तर प्रत्यक्ष मुलाच्या बापाची आणि आमच्या गाडीच्या पवळ्या बैलाचीच एक रास जमल्यामुळें हातचें स्थळ दवडावें लागलें! अशा रीतीनें लग्नें मोडावयास वाटेल तीं कारणें पुरतात, असें आमच्या अनुभवाला पूर्णपणें येऊन चुकलें! अखेरअखेर तर, आबाभटजींच्या कानांत अतिशय केंस असल्यामुळें, माझ्या एका बुटाला धोतराच्या कांठाचा लेस लावलेला असल्यामुळें, आणि चिमण्याच्या कुरळ्या केंसांच्या योगानें त्याचें डोकें उफराट्या पिसांच्या कोंबडीप्रमाणें दिसत असल्यामुळें मुद्धां एखाद्या जवळजवळ कायम होत आलेल्या स्थळाखालीं धरणीकंप होतो कीं काय, अशीही आम्हांला भीति वाटूं लागली. आतां आणखी एका ठिकाणचा अनुभव देऊन लग्न फिसकटण्याच्या कारणांची ही यादी पुरी करितों.

या ठिकाणीं आम्हीं आमच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें कुटुंबकबिल्यासह जाऊन तळ घातला. सर्व प्रकारच्या तडजोडी होऊन अखेर मुलगी पाहण्याचा समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. मुलीला आई असल्याची साक्ष पटविण्यासाठीं आमच्या नूतनपरिणित नव्या वहिनीही हजर होत्याच! सर्वतोपरी पटल्यावर उभयपक्षांकडील तयारी होऊन 'सीमांतपूजना'चा समारंभही पार उरकला. मात्र सदर समारंभाच्या वेळीं विहीणबाईच्या नात्यानें तेथें आलेल्या नव्या वहिनींकडे पाहून व्याह्यांनीं जरा संशययुक्त मुद्रेनें त्यांच्या तेथें येण्याबद्दल कारणाची पृच्छा केली. आम्हींही द्विगुणीत आश्चर्यानें 'चहूंकडे अशीच चाल आहे, त्यांत नवल तें कशाचें?' असें उत्तर देऊन मोकळे झालों. व्याही यानंतर कांहीं विशेष बोलले नाहींत; परंतु शेवटीं 'वाङ्‌निश्चया'च्या समारंभासाठीं ती मंडळी आमच्याकडे येतांच सारें कोडें उलगडलें. ठकीला वधूच्या जागीं व नव्या वहिनींना विहीणीच्या जागीं बसलेल्या पहातांच व्याही ताड्कन् उठून उभे राहिले

व विचारूं लागले कीं, " या दोहोंतली तुमची मुलगी ती कोणती ?" आम्हीं ठकीकडे बोट केलें आणि नव्या वहिनींची नीट माहिती दिली. " असें काय ! मग आम्ही यांनाचा वधू समजलों. मुलगी पहावयाच्याच वेळीं तुम्हीं हें स्पष्ट सांगावयाला हवें होतें. तिंबूनानांच्या कुटुंबालाच नवरीमुलगी समजून आम्ही रुकार दिला. आतां या मुलीशीं आम्हांला लग्न कर्तव्य नाहीं." असें सणसणीत उत्तर देऊन व्याहीमंडळीनें घरचा रस्ता धरला.

लग्न फिसकटण्याचीं कारणें आणखी देत बसलों तर एक महाभारत रचून काढावें लागेल ! दिलेल्या उदाहरणांवरून हें काम किती बिकट आहे, याची वाचकांना कल्पना होईलच. अशा प्रकार बहुतेक स्थळें हातचीं गेल्यामुळें तूर्त स्थलसंकोचास्तव येथेंच मुक्काम करणें भाग पडत आहे. पुढील खेपेला ठकीच्या लग्नासाठीं केलेल्या मोहिमेंतील. ठळक स्वाऱ्यांची सविस्तर माहिती देऊन अखेर ठकीचें लग्न एका आकस्मिक कारणामुळें कसें अचानक जमून आलें, तें सांगण्याचा संकल्प आहे. सत्यसंकल्पाचा दाता भगवान् !

# स्वयंपाकघरांतील गोष्टी

" राष्ट्राचें खरें जीवन स्वयंपाकघरावरच अवलंबून आहे. "

—स्वामी विवेकानंद

" फ्रान्संच्या सिंहासनावरून पदच्युत झाल्याबरोबर माझ्या मुलानें भटारखाना उघडावा; म्हणजे त्याला अन्नाचा तुटवडा पडणार नाहीं. "

—नेपोलियन बोनापार्टचा आपल्या मुलाला उपदेश

" प्रत्येक पुरुषानें जेवण्याच्या गोष्टीकडे प्रथम लक्ष पुरविलें पाहिजे. मला जर कधींच पोटभर जेवावयास मिळालें नसतें, तर माझ्या हातून इतकीं पुस्तकें लिहून होण्याचा सुतराम् संभव नव्हता. "

—हर्बर्ट स्पेन्सर

" अन्नाद्भवन्ति भूतानि । ( असतील शितें तर जमतील भुतें. ) "

—श्रीमद्भगवद्गीता ।

प्रस्तुत लेखाचा मथळा वाचून लगेच लेखकाच्या नांवावर नजर टाकतांच माझ्या साऱ्या वाचकभगिनी एकदम थबकतील, आणि मला स्वयंपाकघरांतून हांकलून लावण्याचा ठराव करूं लागतील ! माझ्या भगिनीवर्गानें आपल्या या गरीब भावंडावर अशी आग पाखडण्यापूर्वी पुढील चार शब्द वाचून पाहण्याची कृपा करावी. माझ्या सुशिक्षित भगिनीजनांच्या विचारशीलतेची मला खात्री असल्यामुळें, या शब्दांकडे त्यांचें रागावलोकन होणार नाहीं, अशी मला पूर्ण उमेद आहे. बाकी एकाद्या निरक्षर बाईनें मात्र हे चार शब्द वाचण्याची तसदी घेतली असती किंवा नाहीं, याची शंकाच आहे ! बहुधा पहिल्या दोन

ओळींवरच नजर फेंकून तिनें माझा लेख चुलींत टाकला असता, आणि तापलेल्या कलथ्याच्या किंवा जळत्या कोलिताच्या साहाय्यानें मला स्वयंपाकघरांतून पिटाळून लावलें असतें.

यद्यपि प्रत्येक समाजानें आपापल्या परीनें स्त्री–पुरुषांसाठीं भिन्नभिन्न कामें नेमून दिली आहेत; तथापि प्रसंगविशेषीं एका मनुष्यभेदाच्या प्राण्याला दुसऱ्याचे हक्क घेण्यापुरती सवलत देण्यांत येते. स्त्री–पुरुषांमध्यें खरोखर म्हटलें असतां, 'जो भेद विधीनें केला' आहे, त्याचें बाजवीपेक्षां फाजील स्पष्टीकरण एक सुप्रसिद्ध मराठी नाटककारानें एकाच पद्यांत केलेलें वाचकांच्या माहितींत असेलच. त्याव्यतिरिक्त स्त्री-पुरुषांच्या हक्कांचें वर्गीकरण निव्वळ मनुष्यानिर्मित असून पुष्कळ वेळां त्यांत अतिव्याप्ति झालेली दिसून येते. सर्कशीच्या रंगणांत वाघाच्या तोंडांत मर्दानी हिंमतीनें मान देऊन बायका धीट पुरुषांनाही थक्क करून सोडतात. तर नाटकगृहांतल्या रंगस्थलावरचे स्त्री-नट आपल्या हावभावयुक्त मुरक्यांनीं वारांगनांनाही लज्जेनें पहावयास लावतात. एकीकडे विश्वविद्यालयीन उच्चतम परीक्षांतल्या यशस्वी उमेदवारांच्या नाममालिकेला आपल्या नांवांनीं नटविणारी अभिमाननीय रमणीरत्नें आहेत, तर दुसरीकडे आपल्या नांवाच्या चार अक्षरांसाठींसुद्धां दुसऱ्याचा दस्तुर ठोकून, आर्यसंस्कृतीनें स्त्रियांसाठींच आंखलेल्या अज्ञानवर्तुळाच्या अगदीं मध्ये-स्थानीं चमकण्याजोगीं उच्च जातीचीं नररत्नेंही आहेत! लग्नप्रसंगीं, अक्षतीसारख्या मिरवणुकींत, पुरुषांचा नेहमींचा पुढारीपणाचा मान आपल्याकडे घेऊन महिलासमाज घराबाहेर पडत असतो, त्या वेळीं रिकाम्या झालेल्या स्वयंपाकघरांत पुरुषवर्गांतल्या स्वयंसेवकांचें पथक काम उरकीत असतें. कधीं कधीं तर निसर्गाच्या कृतींतसुद्धां स्त्री-पुरुषभेदाबद्दल ढिलाई दिसून येते! दाढीमिशीला मुकलेले आजन्म संन्यासी कितीतरी वेळां दृष्टीला पडतात; आणि शारीरशास्त्रविषयक पुस्तकांतून दाढीमिशीच्या झुपक्यांनीं कलंकित झालेल्या स्त्री-मुखचंद्रांचीं चित्रेंही बहुश्रुत वाचकांनीं पहिलीं असतील. याप्रमाणें स्त्री-पुरुषांनीं परस्परांना आपापल्या कार्यक्षेत्राचें एखाद्या वेळीं सीमोल्लंघन करितांना पाहिलें, तर उगाच हकाटी करीत बसण्याचें कारण नाहीं.

इतक्याउपरही इंग्लंडांतील चालू बायकांच्या बंडाचे प्रवेश रोज वाचल्यामुळें आपल्या हक्कांना विशेष जपणाऱ्या एखाद्या करारी भगिनीनें मला स्वयंपाकघरांत शिरण्यास मज्जाव केला, तर तिचेंही पुढील युक्तिवादानें समाधान करतां येण्यासारखें आहे. स्त्रियांना पुरुषाप्रमाणें शिक्षण देवविण्यासाठीं अट्टाहास करितांना, प्राचीन आर्यावर्तातल्या स्त्री-शिक्षणाची उदाहरणें देण्यासाठीं सुधारकांनीं गार्गी, मैत्रेयी यांच्याकडे धांव घेतली, त्याप्रमाणें माझ्या या विधानाच्या प्राचीनतेलाही विराटराजाच्या घरीं बल्लवाचें काम बारा मांने करणाऱ्या भीमाचा बळकट पाठिंबा आहे. स्त्री-शिक्षणापासून सुपरिणामांचीच निष्पत्ति होते, हें दाखविण्यासाठीं सुधारकांना युरोपांतल्या स्त्रियांकडे बोट दाखवावें लागलें; परंतु पुरुषांच्या हातून पाकनिष्पत्ति चांगली होते, याची साक्ष मी देशांतल्या देशांत देशांत पटवून देईन ! आज प्रत्येक श्रीमंताच्या घरीं चाललेल्या अन्नयज्ञांतून हौतृपदाचा मान आम्हां पुरुषांनाच मिळत नाहीं काय ? '**पंचाग्निसाधन करूं धूम्रपान**' अशा बाण्यानें ठिकठिकाणीं बसलेले आचाऱ्यांचे अड्डे आजच ओस पडले आहेत काय ? पेशवाईत पर्वतीवरचे वरणाचे व भाज्यांचे हौद ज्यांच्या कृतींनीं भरून निघाले, त्या वीरांच्या हातातले झारे पळे आज गंजत पडले आहेत असें आम्हांला वाटतें काय ? नाहीं भगिनींनो, नाहीं ! त्यांच्या वंशजांच्या हातांत ते झारे पळे आज तींच कामें करीत आहेत ! अशा प्रकारें झऱ्यापळ्यांच्या शस्त्रास्त्रांनीं सायुध झालेली आचारी पाणके, वाढपी आणि खटपटी यांची चतुरंग सेना भांगेनें धुंद होऊन, खोकल्याच्या किंकाळ्या मारीत व चिलमीच्या धुरांचे लोट सोडीत, स्वयंपाकघराच्या किल्ल्यावर आपल्या सोधन्यांचे यशोध्वज फडकाविण्यासाठीं सज्ज झाले असतां, तुम्हीं स्वयंपाकघराचें रक्षण कसें करणार ? तो पाहा, तो खटपटी वीर, आपल्या वज्रमुष्टींनीं कणिक तिंबून काढीत आहे ! खांद्यावर घागर घेऊन धांव ठोकणाऱ्या त्या पाणीदार वीरानें तर अंगणांत नुसता चिखल माजवून दिला आहे ! तसाच तो तिसरा वीर केळींच्या आगोतल्या सारखा कापीत चालला आहे ! आणि सर्वांच्याही पुढें आघाडी मारून आगींत तोंड घालण्यासाठीं थेट चुलीपर्यंत जाऊन भिडलेला तो जवानमर्द ब्राह्मणभाई तर आवेशाच्या

एका फुंकरानें उडालेलेल्या राखेच्या लोटांत पार दिसेनासा झाला आहे! भगिनींनो! अजून तरी ऐका आणि आम्हां पुरुषांनाही स्वयंपाकाचे समान हक्क द्या!

याप्रमाणें साऱ्या पुरुषजातीसाठीं स्वयंपाकघराचीं दारें मोकळीं करून घेतल्यावर, मीं आंत पाऊल टाकण्यापूर्वी स्वतःच्या लायकीबद्दल येथें थोडीशी प्रस्तावना करणें जरुर आहे, म्हणून अगोदर तिकडे वळतों.

पाकशास्त्रांतील नैपुण्याबद्दल आमच्या घराण्याचा पूर्वापार लौकिक चालत आलेला आहे. आमच्या पंचक्रोशींत होणारीं प्रयोजनें, सहस्रभोजनें श्राद्धकर्में, गांवजेवणें वगैरे लहानमोठ्या प्रमाणांचीं सार्वजनिक भोजनकार्यें आमच्या घरचा एक तरी पुरुष स्वयंपाकाला असल्याखेरीज सहसा तडीला जात नसत. गेल्या सात पिढ्यांत आमच्या घरांत बायकांना स्वयंपाक करण्याची सक्त मनाई होती. माझ्या ऑजोबांच्या अमदानीपर्यंत हा लौकिक अव्याहतपणें कायम होता. माझ्या वडिलांनीं मात्र पूर्वपरंपरा सोडून विद्याभ्यास, नोकरी यांसारखे नसत धंदे करण्यांत साऱ्या माती केली! माझ्या आजानें पुण्याला एक नमुनेदार खाणावळ घातली होती. तिजबद्दल लोकप्रियता इतकी जबरदस्त वाढली होती कीं, कांहीं विशेष कारणाकरितां, खाणावळींचा दरवाजा कायमचा बंद करून एकाएकीं माझे आजोबा निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं जेवणाच्या वेळीं पंक्तिबारगिरांचा एक तांडाच्या तांडा खाणावळीला गराडा झालून आपापल्या परीनें हळहळूं लागला! अर्थात्, लोकांचा लकडा चुकविण्यासाठीं, आजोबांना कोणाला कळवि-ल्यावांचून रातोरात जावें लागलें होतें! आपली लोकप्रियता खरी आहे, कीं लोक नुसत्या नांवावरच जातात हें नीट अजमावून पाहण्यासाठीं, आजोबांनीं पुढें एका अगदीं अनोखळी शहरांत नांव बदलून दुसरी खाणावळ काढली व तिच्यांतही अखेरीला पहिल्यासारखें नांव मिळविलें! माझ्या वडिलांनीं यद्यपि आपला पिढीजाद धंदा सोडून दिला होता, तरी माझ्याबरोबर आमच्या घराण्याच्या स्वयंपाकनैपुण्यानें पुन्हा जन्म घेतला. मला स्वयंपाकाचें उपजत वेड होतें. तिसऱ्या–चौथ्या वर्षींच माझ्या बहिणीशीं चूलबोळक्यांसाठीं भांडावयास लागून मीं आजोबांची प्रीति

संपादन केली. आजोबांनीं मला लहान लहान भांड्याकुंड्यांचा संबंध 'सट' आणून दिला होता. खेळांतल्या चूलबोळक्यांचा आमच्या घराइतका मोठा संग्रह साऱ्या आळींत मिळून नव्हता ! पांचव्या सहाव्या वर्षी तर माझ्यावांचून आमच्या आळींत भातुकलीचा एकही समारंभ पार पडत नसे. या वयांत मी समवयस्क सवंगड्यांबरोबर उनाडण्यांत दिवस न घालवितां, आईजवळ स्वयंपाकघरांत बसून तिच्या भाकरी करण्याकडें, किंवा भाजी फोडणीला टाकण्याकडे, घटकाघटका लक्षपूर्वक पाहत असें. तिखटमिठाच्या डब्यांतून ते ते पदार्थ वेळोवेळीं आईला काढून देण्याच्या सरावामुळें तद्विषयक बारीकसारीक माहिती मला त्या वेळींच झाली होती. अशा एखाद्या प्रसंगीं माझ्याकडे पाहून आजोबांना गहिंवर दाटून येई व मला पोटाशीं धरून ते म्हणत कीं, " वडिलानें कुलाचार सोडला; पण हा मात्र कुलदीपक होणार खास ! बाळक्या, बेट्या, तूं मोठमोठ्या लोकांच्या घरीं दिवस काढ ! "

आजोबांच्या अशा उत्तेजनपर शब्दांनीं मला स्फुरण चढून, मी थोडेंसें पीठ घेऊन भाकरी करावयाला, किंवा उरापोटीं वरवंटा उचलून कांहींतरी वांटावयाला मोठ्या आवेशानें सरसावत असें. लौकरच मला स्वयंपाक करण्यांत बरेंच कळूं लागलें. एकदां तर आईनें संध्याकाळचा स्वयंपाक माझ्या हातून करवून घेतला ! आजोबांनीं तर त्या दिवशीं खाण्याचा असा सपाटा सुरू केला, कीं माझ्या पाककौशल्याची बातमी ऐकून बाबांनीं संतापानें न जेवण्याचा निश्चय जर केला नसता तर आई-साठीं मागें घांसभरसुद्धां अन्न उरलें नसतें ! दुसऱ्या दिवशीं या खाण्यानें आजोबाची पोटदुखीची व्यथा उपटून अखेर त्या प्रेमळ म्हाताऱ्याचा त्यांतच अंत झाला ! जातांजातां येथें एवढें सांगणें योग्य वाटतें कीं, मी केलेल्या भाताचा पिंड देईपर्यंत म्हाताऱ्याच्या पिंडाकडे कावळ्यांनीं ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं ! असो.

आज मला माझ्या या आवडत्या विषयासंबंधीं दोन शब्द लिहिण्याची स्फूर्ति माझ्या भगिनींचे एतद्विषयक लेख वाचून झालेली आहे, हें कबूल केलें पाहिजे. सदर लेखांतून दिलेलीं पक्वान्नांचीं कांहींकांहीं नांवें पाहून प्रथम माझें लक्ष या विषयाकडे वळलें. या नांवांकडे लक्ष देतांच काव्यशा-

त्याप्रमाणेंच पाकशास्त्रांतही काव्यालंकारांना बराच वाव मिळालेला आहे, असें वरवर पाहणारालाही दिसून येईल. ' स्वयंपाकघरांत ' त्या बऱ्याचशा गोष्टींतून, ' मोहन ' हा नायक असावा असें वाटतें ! माझ्या पाकशास्त्रांतून मी याला असूयेनें हद्दपार केल्याचें पुढें वाचकांना दिसून येईलच. ' दुधाचा रस्सा ' ' दह्याची भाजी ' ' कांद्याच्या करंज्या ' किंवा ' तिखटमिठाच्या मेसूरवड्या ' हीं स्वयंपाकघरांतल्या काव्याशास्त्रांतील विरोधाभास अलंकाराचीं उदाहरणें असून ' भोपळ्याच्या बियांचे अनारसे ' अद्भुतरसाच्या कोटींत जमा होतात. ' आलिजाबहादुर ' हें पक्वान्न वीररसाचें एकलकोंडें उदाहरण असून, फाजिता ' हें हास्यरसाचें अपत्य असावें. ' मुरक्की, ' ' सुरळी होरळगी ' हीं पात्रें परभाषावाचक असून संगीत ' मृच्छकटिकां 'तल्या बौद्ध भिक्षूप्रमाणें किंवा ' शारदें ' तल्या मुसलमान शिपायाप्रमाणें हास्यरसाचाच उठाव करणारीं आहेत. अशा प्रकारची नामावलि पाहून माझ्या माहितींत असलेलीं आमच्या घराण्यांतलीं पिढिजाद पाकरहस्यें वाचकांच्या फायद्यासाठीं पुढें दिलेलीं आहेत. हीं पक्वान्नें कित्येक वाचकांना कदाचित् माहीत असण्याचाही संभव आहे; परंतु असे वाचक फार थोडेच सांपडतील अशी मला आशा आहे. ' स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्थे 'विषयीं प्रथम ' चार शब्द ' लिहिल्यानंतर कांहीं पक्वान्नांची माहिती देऊन वाचकांची सप्रेम रजा घेण्याचा माझा संकल्प आहे.

## स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्था

माझ्या एका भगिनीनें म्हटलें आहे कीं, " स्वयंपाकघरांत आधीं चांगला उजेड पाहिजे. " ही गोष्ट अगदीं बरोबर आहे; परंतु या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्याची तिची सूचना मात्र कबूल नाहीं ! स्वयंपाकघरांतल्या कोणत्याच गोष्टीकडे आजिबात लक्ष न दिलें, म्हणजे अनायासेंच कामाचा चांगलाच उजेड पडतो, हें उघड आहे. दुसऱ्या एका भगिनीनें स्वयंपाकघर अगदीं आरशासारखें स्वच्छ ठेवण्याविषयीं सूचना केली आहे, तीसुद्धां जराशी चुकीचीच आहे. माझ्या मतें आठपंधरा दिवसांनीं घरांतला केर काढणें फार उत्तम ! अशानें वेणीफणी करतांना उघडेंच टाकून दिलेलें ' बाकस ' वेळींअवेळीं लाथाडल्यामुळें त्यांतून

चोहींकडे उधळलेले मणी, ठिकल्या, घुंगऱ्या किंवा यात्र प्रकारचें किडूक-मिडूक आठपंधरा दिवसांत एखाद्या वेळीं पायदळीं सांपडून पुन्हा मिळण्याचा संभव असतो. झालेला केर कोंपऱ्यांत गोळा करण्यापूर्वी तिकडच्या धोतराच्या ओलवतीचा बोळा एकीकडे ठेवलेला बरा; नाहींतर केराचा लेप बसून धोतराला लुगड्याची कळा येते आणि मग धुणीं धुवावयाच्या वेळीं आपल्याला धोतर शोधून काढण्यासाठीं उगीच घरभर येरझारा घालाव्या लागतात. एका बाईला तर अशा रीतीनें गडप झालेला बोळा शोधून काढण्यासाठीं 'तिकड'च्या खिशांतलें पैशाचें पाकिटसुद्धां उघडून पहाण्याची तकलीफ घ्यावी लागली ! त्याचप्रमाणें लोटे, गडवे, पाट वगैरे इकडे तिकडे पडलेल्या चिजा केराबरोबर न जाऊं देण्याची खबरदारी घ्यावी. कारण केर भरून टाकतांना मग उगाच जिवापाड ओझें उचलावें लागतें. मी तर म्हणतों, कीं रांगतींपांगतीं मुलेंसुद्धां केरांत जाऊं नयेत. कोपऱ्यांतून बाहेर गडबडतांना तीं पुन्हा केर करून ठेवतास. मुलांच्या बाबतींत एकंदरीनेंच जास्त लक्ष दिलेलें कांहीं वाईट नाहीं. गतवर्षी आमच्या गांवीं एका बाईनें गडबडींत आपलें चारपांच वर्षांचें निजलेलें मूलसुद्धां बिछान्यांत गुंडाळलें आणि अखेर बिछान्याच्या वळकट्यांच्या उतरंडीखालीं तें पोर अक्षरशः चेंगरून मेलें ! सकाळीं झालेली ही गोष्ट अकरा वाजतां जेवतेवेळीं तिच्या लक्षांत आली. झालेल्या प्रकरणांत जरासा हलगर्जीपणा झाला, असें म्हणण्याचें मीं धाडस कारितों. कारण, नऊ–साडेनऊ वाजतांच मुलाची एकदां चौकशी केली असती, म्हणजे मग त्याच्यासाठीं केलेलें सपाट वाटीभर कण्यांचें खिमंट फुकट गेलें नसतें ! एवढ्यासाठींच मुलांकडे जरा विशेष लक्ष पुरविण्याची मी सूचना करीत आहें. ऐन घाईच्या वेळीं पोळी लाटतांना किंवा वरण घाटतांना सकाळपासून भुकेलेला बाळ्या सारखा रडत आला, तर त्रासिकपणानें 'मर मेल्या' म्हणून त्याच्याकडे हातांतलें लाटणें किंवा पळी फेंकून मारूं नये. संतापाच्या भरांत बाळ्यावरचा नेम चुकून त्याचीं हाडें मोडण्याऐवजीं पाट्यावर आपटल्यामुळें लाटणें किंवा पळी मोडून चार आण्यांचें नुकसान झाल्याचीं अनेक उदाहरणें घडलेलीं आहेत, तसेंच घाईघाईनें भाजी चिरून झाल्यावर, रांगतें मूल जवळपास असल्यास विळीचें पातें उघडें

ठेवूनच दुसऱ्या कामाला लागूं नये. पोराच्या जातीनें सहजगत्या हातपाय कापून घेतल्यामुळें पुन्हां विळीचें काम लागल्यास धुवून घेण्याची यातायात करावी लागते. गडबडीच्या वेळीं होतांहोईतों 'जळलं मेलं कारटं' 'तिकड'च्या समोर आदळून बसवावें, हें उत्तम. तिकडून ऑफिसचें काम घरीं पाहत बसण्याचें सोंग चाललेलें असतें, तिकडे लक्ष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आंघोळीला पाणी उपसून देतांना गंगाळाच्या तळाशीं भाताच्या शितांत शर बसाविण्याची काळजी घ्यावी. पेंढ्याच्या काड्या, कोळसे, भाजीचीं डेंखें वगैरे योग्य मिश्रण असल्यानें घरांतली काडीसुद्धां फुकट जात नाहीं, अशी 'तिकड'ची खात्री होते. जमल्यास आंघोळीचें पाणी उपसल्यावर प्रथम केर काढावा व नंतर आंघोळीला 'खालीं' बोलवावें. अशा रंगीबेरंगी पाण्यामुळें, आपण लुगडेंबिगडेंसुद्धां धुवून घेतल्याचा 'तिकडे' संशय येऊन उलट आपल्या कामाचा उरक लक्षांत येतो आणि तळचा शितांचा थर पाहिल्याबरोबर भांत झाल्याची खूण पटून 'तिकडे' ऑफिसांत वेळेवर जेवायाला मिळण्याची खात्री वाटूं लागते. वेणीफणी स्वयंपाकघरांतच करण्याचा सराव, म्हणजे मग भाकरी करतांना पिठांत केंस गेल्यावांचून राहत नाहींत आणि अशी 'केशाकर्षणा'नें बनलेली भाकर उभ्याओणव्यानें ताटांत टाकिली, तरी सहसा तिचे तुकडे होत नाहींत. एका भगिनीनें सुचविल्याप्रमाणें 'वाढतांना ताटांत गर्दी करूं नये, पदार्थ थोडथोड्या प्रमाणानें वाढावे, म्हणजे तांट पाहूनच जेवणाराचें समाधान होतें.' विशेषतः पाव्हणेरावळे असल्यास ही सूचना जरूर अमलांत आणावी. मागून घेण्याची सोय नसल्यामुळें पाहुण्यांना 'ताटाकडे पाहूनच समाधान' मानण्यावांचून अशा प्रसंगीं गत्यंतर नसतें !

यावांचून स्वयंपाकघरांतल्या साधारण व्यवस्थेखेरीज पुष्कळ गोष्टी सांगण्यासारख्या आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव येथेंच आटोपतें घेऊन मला माहित असलेल्या मुख्य मुख्य पदार्थांच्या कृति देऊं लागतों:—

## चापटपोळ्या

स्वतःच्या खेरीज दुसरी चांगलीशी पाठ घ्यावी. आपल्या हाताची चोटें नीट पसरून हात खूब जोरानें त्या उघड्या पाठीवर आपटावा. असेंच चारसहा वेळां करावें. चांगल्या चापटपोळ्या होतात.

वरच्याप्रमाणेंच, फक्त हाताची चांगली भक्कम मूठ करावी. याच पदार्थाला कोठेंकोठें 'मुष्टिमोदक' असेंहि म्हणतात. हे दोन्ही पदार्थ वेळीअवेळीं मुलांना द्यावयाला चांगले असतात.

५४

## काणिक तिंबणें

हव्या तशा हातानें दुसऱ्यावर माराचा वर्षाव केला, म्हणजे त्याची काणिक तिंबून निघते. हें फार आटाआटीचें पक्वान्न आहे.

## विहिणीची रेवडी

मोठ्या मानापानानें विहिणबाईंना बसावयास बोलवावें. शेजारच्या पाजारच्या बायकांना बोलावणें असावेंच. मग वेळ पाहून उखाळ्यापाखाळ्या काढाव्या व घालूनपाडून बोलावयास सुरुवात करावी. विहीण चांगली तापून निघेपर्यंत उणींपाणीं काढावयाचें सोडूं नये. लौकरच साऱ्या बाया हंसावयास लागतात व विहिणीची शोभा होऊन चांगली रेवडी होते. मात्र यांत आपल्याकडे वरमाईपणाचें नातें असलें पाहिजे.

## पोळ्या लाटणें

माझ्या भगिनींनीं या कामांत फारच मर्यादशील वृत्ति ठेवल्यासारखी दिसते. पोळ्या, कधीं कधीं पुऱ्या व सटींसामासीं पापड लाटण्यापलीकडे त्यांच्या मनाची धांव जात नाहीं. खरें म्हटलें असतां, सवड सांपडल्यास कोणताही पदार्थ लाटावयास मागेंपुढें पाहूं नये ! अर्थात्, संकोचवृत्तीच्या सासुरवाशिणींना या बाबतींत थोडें जपून वागलें पाहिजे. त्यांनीं माझ्या एका भगिनीच्याच शब्दांत म्हणावयाचें असल्यास, "पोळी फार मोठी लाटूं नये, पुरीसारखी लाटावी," व इकडे तिकडे कोणी नाहींसें पाहून "हलक्या हातानें तव्यावरून काढून घ्यावी." ताजी मिळते, दुसरें काय ! बाकी भाजून ठेवलेली पोळी लाटावयासुद्धां हरकत नाहीं. या कामीं तरतरीतपणा विशेष लागतो.

## वर्फीची चटणी

चांगली शेर, दीडशेर सुरती वर्फी घ्यावी व सहज हाताला लागेल अशी उघडी ठेवावी. स्वयंपाक करतांना अगर येतांजातां तिचा एकेक बकाणा भरीत जावें. घटकेच्या आंत सगळ्या बर्फीची चटणी होते. माझ्या एका भगिनीनें कुरकूर केली आहे कीं, " दररोज नवीन चटणी करण्यास फार अडचण होते. " माझ्या मतें कोणत्याही आवडत्या पदार्थाची तेव्हांच चटणी करून टाकतां येते.

## थंडा फराळ

दुपारचीं जेवणें झालीं म्हणजे खुशाल तणावून द्यावें व चुलीला चाटाण्याच्या अक्षता द्याव्या. संध्याकाळीं ' तिकडून ' कामकाज करून कंटाळून घरीं येणें झाल्यावर आजाराची सबब सांगावी. ' तिकडे ' बहुतकरून चुलीची आराधना करण्याचा कंटाळा असतोच ! अशा वेळीं हजार हिश्शांनीं ' थंडा फराळ ' करून वेळ भागवावी लागते; हा पदार्थ- उपवासालासुद्धां चालतो.

## अंगाचा तिळपापड

बहुतेक प्रकार वरच्यासारखाच; मात्र 'तिकडून' ज्या दिवशीं दोनचार स्नेहीसोबती संध्याकाळीं फराळाला बोलवायचें झालें असेल, त्याच दिवशीं हा पदार्थ करतां येतो. ऐन वेळीं चुलखंडांत जिकडेतिकडे सामसूम पाहून तिकडच्या अंगाचा तिळपापड होतो. पण चारचौघांदेखत बोलावयाचें मात्र नाहीं. कदाचित् दुसऱ्या दिवशीं हा तिळपापड आपल्या अंगावर शेकून घ्यावा लागतो.

## पाठीचें धिरडें

सारी तयारी पुन्हां वरच्यासारखीच. पाहुणा मात्र एकच असावा आणि ' तिकडून ' विचारणें झालें, म्हणजे आपण जळफळूं लागावें. ' तिकडून ' एखाददुसरा शब्द तोंडांतून काढतांच आपण तोंडाला तोंड द्यावें. ' तिकडून ' हातघाईवर येणें होतें आणि लौकरच आपल्या पाठीचें चांगलें धिरडें होतें. हें पोटाला बाधत नाहीं.

## हाडांची पूड

नेहमीं कैदाशिणीप्रमाणें वागणें ठेवावें. वेळ–अवेळ पाहिल्यावांचून तोंडाला येईल तें भकावें. 'तिकड' च्या माणसांना शिव्यागाळी कराव्या. कांहीं म्हणतां कांहीं ऐकूं नये. साऱ्या घराला सळो कीं पळोसें करावें. एखाद्या दिवशीं तरी आपल्या हाडांची चांगली पूड होते ! हें पक्वान्न नेहमीं करावयाला सोपें नाहीं.

## मनांतले मांडे

आपल्याला जन्मजन्मांतरीं मिळणार नाहींत असे दागिने अंगाखांद्या-वर घालून आपण मिरवत असल्याची नेहमीं कल्पना करीत बसावें. यालाच ' मनांतले मांडे खाणें ' असें म्हणतात. गरिबीच्या संसाराला हा पदार्थ वाटेल तेव्हां करतां येण्यासारखा आहे.

## माणसांचें मेतकूट

घरची चांगली श्रीमंती असल्याखेरीज हा पदार्थ होत नाहीं. घरांत चाकरमाणसें पुष्कळशीं असलीं म्हणजे आपण त्यांच्यावर मुळींच लक्ष ठेवूं नये. दळण, बाजारहाट, शिधा वगैरे गोष्टी होतील तशा होऊं द्याव्या. लौकरच साऱ्या माणसांचें छान मेतकूट जमतें. अर्थात् हें उघड्यावर येईपर्यंत टिकतें.

## घरादाराचें खोबरें

' तिकडे ' वाटलाबाईच्यासारखें एखादें व्यसन लागलेलें पाहतांच आपण वैतागानें चाकरमाणसांवर घर टाकून माहेरची वाट धरावी. वर्षसहा महिन्यांत साऱ्या घरादाराचें खोबरें होतें. हा पदार्थ जन्मांत एखाद्या वेळेला करतां येतो.

## अकलेचा कांदा

आपलें चांगलें आठदहा वर्षांचें पोर घ्यावें. त्याची तिन्हीत्रिकाळ सारखी वाखाणणी करावी. तो बोलेल तें त्याला बोलूं द्यावें. ' तिकडून ' त्याच्यावर जरा रागवायचें झालें, कीं पोराला पोटाशीं धरून दिवसभर

रडत बसावें. त्याचे भलभलते लाड मनापासून पुरवावेत. वर्षा दोन वर्षांत पोराचा चांगला अकलेचा कांदा तयार होतो. पुढें याला बाहेरच्या लोकांनीं चांगला फोडून काढतांना पाहिलें म्हणजे मात्र खरोखरीच डोळ्यांना पाणी येतें !

## गुळाचा गणपति

आपलेंच तीनचार वर्षांचें पोर घ्यावें. त्याला नेहमीं स्वयंपाकघरांत बसवून ठेवावें. नेहमीं त्याच्या हातावर गोडधोडाचें कांहींतरी ठेवीत जावें. त्याला इकडची काडी तिकडे करूं देऊं नये. शाळेंतसुद्धां जाऊं देऊं नये. खायला हवें तसें घालावें; पण जागचा हलूं देऊं नये. लौकरच बसल्या जागीं मुलगा अगदीं गुळाचा गणपति होतो. हा पुष्कळ वर्षें टिकतो.

यांशिवाय,' डाळ शिजविणें,' 'नाकाला मिरच्या लावणें,' 'वाटाण्याच्या आक्षता,' 'पुराणांतील वांगीं,' 'वाटेल त्या कामाचा खिचडा,' वगैरे पुष्कळ पुष्कळ लहानसहान पदार्थ सहज करतां येण्याजोगे आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव त्यांची माहिती देत बसणें शक्य नाहीं. तूर्त दिले आहेत, तेवढ्या पदार्थांचेंच माझ्या भगिनींनी मोकळ्या मनानें चीज केलें म्हणजे स्वतःला धन्य समजेन. त्यांनीं माझ्या या गुणाचें सहृदयपणानें कौतुक करावें, एवढेंच या भोळ्याभाबड्या व गरीब भावंडाचें मागणें आहे.

---

# कवींचा कारखाना

उत्तिष्ठोत्तिष्ठ राजेंद्र मुखं प्रक्षालयस्व टः :
प्रभाते रोदिती कुक्कु--चवैतुहि चवैतुहि ॥ १ ॥

—सुभाषित

ऐशीं काव्यें कराया
इकडुन तिकडुन आणलेली बुद्धि दे चक्रपाणी ।

--स्मरणांतून

या जगतीतलावर अखिल मानवजातीच्या सुखसमाधानाचीं जीं जीं साधनें आहेत, त्या सर्वांत काव्याला सर्व राष्ट्रांनीं, सर्व धर्मांनीं आणि सर्व जातींनीं एकमतानें अग्रस्थान दिलेलें आहे. काव्यांत राष्ट्राचें बुद्धिवैभव आणि कर्तृत्वशक्ति इतिहास आणि संस्कृति, विकारोत्कर्ष आणि नीतिमत्ता, अशीं जोडपीं एकाच वेळीं विहरत असल्यामुळें राष्ट्राचें सर्वस्व त्याच्या काव्यांत प्रतिबिंबित होत असतें. ज्यांना लिपी नाहीं, अशीं राष्ट्रें थोडींबहुत सांपडतील; परंतु लौकिककाव्याविरहित राष्ट्र कधींही सांपडणार नाहीं. लेखनकलेच्या अभावीं इलियडसारखीं महाकाव्यें कैक पिढ्यांपर्यंत नुसतीं जिभेच्या शेंड्यावरच नाचत आलीं होतीं. कवितेचा व राष्ट्रोत्कर्षाचा परस्परांशीं निकट संबंध आहे. कवितेनें वीरांना आणि प्रणयीजनांना उत्साह दिला आहे, आणि वीरांनीं व प्रणयी जनांनीं कवितेला विषयांचा पुरवठा केला आहे; सुंदर स्त्रियांनीं कवितेला वरच्या दर्जाला चढविलें आहे, तसेंच कवितेनें सुंदर स्त्रियांना चढवून ठेविलें आहे. कवितेनें किती तरी लोकांना शुद्ध वेडें केलें आहे, तर शुद्ध

वेड्यांनीं किती तरी कविता केली आहे ! आणि म्हणूनच या महत्त्वाच्या विषयावर चार शब्द लिहिण्याचा आज मी प्रयत्न करून पाहणार आहे.

कविता ! हा एकच शब्द उच्चारल्याबरोबर किती तरी गोष्टी एकदम डोळ्यांसमोर येऊन उभ्या राहतात ! तें समासप्राचुर्य, ती रचना, ती प्रतिभा, त्या भराऱ्या, ती वैदर्भी रीति, तें हृदयंगम, त्या डोळ्यांतून अश्रूधारा, तें मार्दव, तो रसपोष, ते अरसिकेषु कवित्वनिवेदनम्, तें शब्दसौष्ठव, तें कवीला अगम्य, ती प्रियतमा, तीं कमलें, ते लाटानुप्रास, ते निरंकुशाः कवयः, तें ओज, ते प्रवाह, तीं स्वर्गापर्यंतें, तीं तादात्म्यें त्या स्फूर्त्या, तीं वेडें-वस्स ! एकस्यादुकट्या माणसाला खरोखरीच या हलकल्लोळांत वेड लागावयाचें !

कविता ! कविता ! ! कविता करणें जितकें सोपें आहे, तितकेंच कवितेची व्याख्या करणें अवघड आहे ! विषयव्यापकतेचा पसारा डोळ्यांपुढें ठेवून कवितेची व्याख्या करणेंही भिन्नभिन्न पदार्थांशीं संलग्न होणाऱ्या पाण्याचा रंग ओळखण्याप्रमाणें, किंवा चारी खंडांतून पसरलेल्या इंग्रजी राज्याच्या सरहद्दी सांगण्याप्रमाणेंच मानवी मतीच्या आटोक्याबाहेरचें आहे. कवितेच्या विषयांची यादी विराट्स्वरूपवर्णनालाही लाजविण्यासारखी आहे. मेरुमांदारापासून मृच्छकटिकांतील जोड्यांतल्या खड्यापर्यंत यच्चयावत् पाषाणसृष्टीला कवितेच्या प्रांतात जागा मिळालेली आहे. ज्वालामुखीच्या तेजस्वी रसगंगेंत उजळलेली तिची अंगकांति चिलमीच्या धुरानें धुरकटलेली आहे. स्वर्गलोकांतून पाताळाकडे अमृतकुंभ नेणाऱ्या गरुडाबरोबर हिनें भरारी मारली आहे, 'तशी लालबागेच्या सगुण पोपटां' बरोबर बेवड्याची बाटली घेऊन भटकण्यांतही हिनें मागेंपुढें पाहिलें नाहीं. राधाकृष्णाच्या रासक्रीडेप्रमाणें राघुमैनेचे रागरंगही कवितेनें आळविलेले आहेत. शिखंडीप्रमाणें रणांगणांत व बृहन्नडेप्रमाणें बायाबापड्यांत हिचा केरवा नाच झालेला आहे. रामरावण, अकिलिसपॅरिस किंवा कर्णार्जुन यांच्यामधील महायुद्धांत थैमान करून ही थकली, तशी नाऱ्यासुभाऱ्या चिंगीरंगी किंवा सोम्यागोम्या यांच्यातले अटीतटीचे सामानेही हिनें साजरे केले आहेत. त्रिकालदर्शी व सर्वतोगामी ऋषीच्या गंभीरतेनें जिनें दिक्कालाच्या अनंत ब्रह्मांडांत भराऱ्या मारल्या आहेत, तीच लहान मुलाच्या

उत्सुकतेनें सनावळी किंवा मुंबई इलाख्यांतील तालुक्यांची यादी गात बसली आहे. एकीकडे संसारांतल्या अनुरूप वधूवरांच्या विवाहासाठीं मंगलाष्टकें म्हणत आहे, तर दुसरीकडे खेळांतल्या ब्रिझिकर्ची गुलाम–राण्यांची विजोड जोडपीं जमविण्यासाठीं ' फुलवर–राणी पहा वदामाला ' असे नियम ठरवून देत आहे. घटकेंत एकान्तांतल्या योगाभ्यासी जनाला अचल समाधीचें रहस्य सांगते आहे, तर घटकेंत बडोद्याच्या जुम्मादादाच्या तालमींतल्या बाळगोपाळांना ' जंपिंग म्हणजे उडि मारावी जोडि मुद्गलाची फिरवा । सेक्शन सहा मोजुनी पहा, । असा कसरतीचा उपदेश करीत आहे. सर्कशींतल्या नायिकेप्रमाणें वाघसिंहांशीं लगट केल्यानंतर ही मागीलदारच्या मोलकरणीप्रमाणें कुत्र्यामांजराबरोबर खरकट्यांत वावरूं लागते. हिमालयवर्णनानंतर तिनें चव बदलण्यासाठीं ग्रांटरोडवर्णन केलें आहे. सहस्रदल कमलापासून दगडफुलापर्यंत, सीतेसारख्या साध्वीपासून साळूसारख्या गांवगौरीपर्यंत, क्षीरसागरांतील परिजातपुष्पासून डबक्यांतल्या फुलापर्यंत, चवरीपासून केरसुणीपर्यंत, सहस्राक्ष इंद्रापासून आंधळ्या मुलापर्यंत, सनदीपांच्या नामावळीपासून जी. आय्. पी स्टेशनच्या शिरगणतीपर्यंत, भास्कराचार्यांच्या लीलावतीपासून तात्यापंतोजीच्या तोंडच्या हिशेबांच्या चालीपर्यंत, पुराणपुरुषाच्या सहस्रनामापासून आधुनिक कवींच्या खानेसुमारीपर्यंत, फार काय सांगावें, तुळशीच्या बुंधापासून रामाच्या शेंडीपर्यंत, सर्वत्र कवितेनें आपलें एकछत्री साम्राज्य पसरून ठेवलें आहे. सर्वांभूतीं, सर्वांघटीं पसरलेल्या परमात्म्यापेक्षांही कवितेची व्यापकता मोठी आहें. पुरुषसूक्तांतल्या नायकाची सत्ता जें अस्तित्वांत आहे तेवढ्यावरच काय ती असते; पण कवितेनें जें आहे तें तर आपलेंसें केलेंच आहे, पण जें नाहीं तेंही आपलेंसें केलें आहे–अगदीं जें नाहीं नाहीं तेंही करून ठेवलें आहे.

याप्रमाणें कवितेचें स्वरूप यद्यपि रंग उडालेल्या तसबिरीप्रमाणें पुसट असलें, तथापि तिनें कार्य मात्र लहानसहान केलेलें नाहीं ! कवितेच्या कर्तृत्वाचा थोडासा उल्लेख प्रारंभीं केलेला आहे. तिच्या उपकारांचें साकल्यानें वर्णन करावयाचें असल्यास आजपासून काळाच्या शेवटापर्यंत सर्व भावी काव्यें या एकाच विषयावर करावीं लागतील. कवितेनें जगावर

उपकारांचें ब्रह्मांडच्या ब्रह्मांड करून ठेवलेलें आहे. गद्याच्या गबाळ अमर्यादपणाला कवितेनें आटोपशीर आकारांत आणून मनुष्य जातीच्या स्थळकाळाची विलक्षण बचत केली आहे. एका समग्र गद्य ग्रंथाच्या मोकाट मैदानांत एखाद्याला आपल्या एका घटकेचा मूर्खपणासुद्धां नीटसा फिरवून दाखवितां येणार नाहीं, तेंच कवितेंत एका श्लोकाच्या बंदिस्त चौकांत तो आपल्या आजन्म मूर्खपणाचें प्रदर्शन करून मोकळा होईल ! तसेंच, गद्यांतल्या लेखांतून भल्याबुऱ्याची सेळभेळ असल्यामुळें बरे वाईटपणाबद्दल खात्री करून घेण्यासाठीं प्रत्येक लेख आपल्याला बहुधा निम्माअधिक तरी वाचावाच लागतो; आणि बराच वेळ गेल्यावर त्यांतील फोलपणा आपल्या लक्षांत येत जातो. मासिक पुस्तकें वाचतांना कित्येकदां तरी आपली अशी फसगत होऊन उगाच वेळ फुकट जातो. कवितेच्या बाबतींत अशी फसवणूक बहुतेक होत नाहीं ! कविता दिसली, कीं आपण तिकडेच मुळीं पाहतच नाहीं ! त्याचप्रमाणें गद्याच्या नियम-शून्यतेमुळें ‘ आव जाव घर तुमारा ’ अशांतल्या त्याचा प्रकार होऊन बसला आहे. गद्यलेखकाच्या मनांत आलें कीं, तें कसेंबसें तरी कागदावर उतरतेंच; आणि त्यामुळेंच गद्याचें गांठोडें मर्यादेबाहेर फुगत जात असतें. परंतु गणमात्रायमकांसारख्या अडचणींमुळें आज किती तरी लोकांच्या कविता करण्याच्या कल्पना वाऱ्यावर विरून जगाच्या मागचा जंजाळ चुकलेला आहे. तात्पर्य, गद्यापेक्षां काव्याचा मनुष्यजातीला अतोनात जास्त फायदा होत आलेला आहे.

वस्तुतः पाहतां प्रस्तुत लेखकासारख्या सामान्य मनुष्याला सदरहू विषयावर अधिकारयुक्त वाणीनें बोलतां येणें अशक्य कोटीच्याहीपलीकडचें कार्य झालें असतें; परंतु अलीकडे कवितादेवीच्या शिखरावर—नव्हे, कवितामंदिराची लागवड तसेंही नाहीं,—काव्यामृताची स्वैरलकेरी—छेः, नाहीं साधत !—कवितेची रचना व टीकांचा भडिमार हीं दोन्हींही इतक्या अमर्याद प्रमाणावर वाढत चाल्लीं आहेत कीं, नियतकालीन वाङ्मयाकडे नुसते धांवतांधांवतां पाहणारालाही तद्विषयक बरीचशी माहिती झाल्या-वांचून राहणार नाहीं. त्यांतून मला तर मित्रत्वाच्या नात्यानें उभयपक्षींच्या

वाग्भटांच्या जिवंत वाणीचाही लाभ होत असल्यामुळें 'अधिकस्याधिकं फलम्' होऊन बसलें आहे. आणि म्हणूनच आप—

*त्या तावडींत सांपडलेल्या हरिणाला जसा चित्ता ।
बघतो तशा प्रकारें तत्परतेनें व पूर्ण समचित्ता ॥ १ ॥
तें वाचक जर माझा प्रस्तुतचा लेख नीट बघतील ।
तर त्यांना कवितेचें पुष्कळसें ज्ञान खास होईल ! ॥ २ ॥

जगांतील एकंदर काव्यसंपदेकडे निरखून पाहणाराला तिचे दोन अगदीं ठळक भाग करतां येण्यासारखे आहेत. एक जगांतील लहानमोठ्या घडामोडींमुळें सुचलेली कविता व दुसरी अशा प्रकारची कविता वाचल्यामुळें किंवा एखाद्या कवीशीं बराच परिचय झाल्यामुळें केलेली कविता. पहिल्या प्रकारची कविता व्हावयाला एखाद्या 'कवी' खेरीज दुसरें कांहीं लागत नाहीं. दुसऱ्या प्रकारच्या एखाद्या कवितेचे सोळा सोपस्कार व्हावयाला मात्र, पहिल्या प्रकारची एखादी चांगलीशी कविता, तिचा अर्थ न समजणारा आणि स्वतःला 'कवि' समजणारा एखादा ब्रह्मदेव, त्या काळीं एखादी लोकप्रिय झालेली चाल, कवितेंत नेहमीं दिसून येणारे कांहीं संस्कृत शब्द कांहीं 'जनिं' 'जगीं' 'खचितचि' 'ग' 'या काळीं' यांसारखे कांहीं उडाणटप्पू शब्द, कांहीं बेकार शुद्धशब्दयोगी अव्ययें, हव्या त्या ठिकाणीं सांपडणाऱ्या थोड्याशा उज्ज्वल उपमा, या सर्वांचा अचूक उपयोग करण्याची हातोटी, धाडस व अज्ञान, असल्या काव्यनिष्पत्तीच्या परिणामाबद्दल बेफिकीरपणा, वाटेल त्या ढोबळ चुकीला दुर्बोध गुणांच्या कोटींत

---

* गद्य व पद्य यांचे परस्परभिन्न रचनानियम बहुतेक कांटेतोल सावधगिरीनें संभाळून हें 'काव्यगद्य' निर्माण केलेलें आहे. गद्य व कविता—अतएव निसर्ग व कला—यांच्या एकजीव तादात्म्याचें हें पहिलें उदाहरण आहे अशी उमेद आहे. लांबलांब संस्कृत समास व कोवळें कोवळें शब्द यांच्या जाळ्यांतील शाब्दिक उपमांची जी एक गुंतावळ अलीकडे 'एक गद्यकाव्य' म्हणून लोकांसमोर मांडण्यांत येते, तिच्यावरून या काव्य-गद्याची कल्पना सुचलेली आहे.

—बाळकराम

टकलण्याइतका निस्सीम आत्मविश्वास, हा एकंदर खटाटोप उरकण्याला पुरेसें रिकामपण, प्रसिद्ध मासिक पुस्तकांतील परतवाणाला मतभेदाच्या गंभीर स्वरूपाखालीं ऐसपैस जागा देणारें एखादें मासिक पुस्तक, या कर्त्याचें नुसतें नांव किंवा फार तर दोन ओळीचा मासला पाहिल्याबरोबर तें पान बदलणारे थोडेसे वाचक, पुढें कांहीं कारणामुळें जुन्याच्या अभिमानाचें सोंग घेऊन कुठल्या तरी वृत्तपत्रांत तिच्यावर खरमरीत थोबाडसुख घेणारा त्याच किंमतीचा एखादा टीकाकार, त्या टीकेवर कविराजांच्या तोंडच्या असंबद्ध शिव्यागाळींचा भडिमार, भाविक अजागळपणानें ऐकणारे त्याचे सलगीतले सोबती, त्याच मुक्ताफळांतल्या तुटपुंज्या तयारीनें प्रतिटीका करणारा एखादा जानीदोस्त आणि अखेरीला बारा महिन्यांतून केव्हां तरी एखाद्या सभेंत या कवीचा त्याच्या जातगोतासकट वर्षश्राद्ध करणारा त्याच्याच देशांतला दुसरा उपटसुंभ इतकी सामुग्री असावी लागते !

याप्रमाणें दुसऱ्या प्रकारच्या कवितेसाठीं साधनबाहुल्याची गरज असल्यामुळें तिची निष्पत्ति मर्यादित प्रमाणावर होते, असें मात्र मुळींच नाहीं. भरण्याच्या ( Quantity ) दृष्टीनें पाहिलें असतां मिठाईच्या पुड्यांत पेढ्यांचें बताशांशीं, मोरीसाठीं केलेल्या मिश्रणांत फेनाइलचें शुद्ध पाण्याशीं, माळ्याच्या पुड्यांत गुलाबांचें कण्हेर फुलांशीं, पूना मेलच्या प्रवासांत थांबावयाच्या स्टेशनांचें न थांबावयाच्या स्टेशनांशीं, मोठमोठ्या ऑफिसांतून वरिष्ठ अधिकाऱ्यांचें कारकुनांशीं, क्लबांच्या बैठकींतून त्या बाटल्यांचें सोडालिमलेटच्या बाटल्यांशीं, प्रेमायाचनेच्या संवादांतून रमणीच्या शब्दांचें वल्लभाच्या शब्दांशीं, किंवा एकंदर समाजांत शहाण्यांचें मूर्खांशीं जें प्रमाण असतें, तेंच पहिल्या प्रकारच्या कवितेचें दुसऱ्या प्रकारच्या कवितेशीं असतें.

आतांच केलेल्या उत्पत्तिविवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल, कीं जन्यजनकसंबंधामुळें दुसरीचें सामान्यस्वरूप अगदीं पहिल्यासारखेंच असतें. वरवर पाहणारांना या दोन प्रकारच्या कवितांचा भेद चांगलासा लक्षांतसुद्धां येत नाहीं. उलट दुसऱ्या प्रकारांत रागरंगाची रेलचेल आणि अलंकाराचा अमर्याद भरणा जास्तच दिसून येत असल्यामुळें सामान्य वाचक पुष्कळदां बुचकळ्यांत पडल्यावांचूनही राहत नाहीं.

नैसर्गिक फलस्वरूपापेक्षां गोकाकची लांकडी करामत रंगेलपणांत फाजील भडक व खऱ्या राजापेक्षां त्याच्या नाटकी प्रतिनिधीच्या उरावर पाहणाराचा ऊर दडपून टाकणारी मोत्यांची कंठाल बेसुमार प्रमाणाची असावयाची हा रोजच्या पाहण्यांतला खेळ आहे ! दुसऱ्या प्रकारच्या कवितेचा फारपणा याप्रमाणें अवाढव्य असल्यामुळें, प्रस्तुत लेखांत आपणाला तिच्याबद्दलच ऊहापोह करावयाचा आहे. पहिल्या प्रकारच्या कवितेशीं आपणाला मुळींच प्रयोजन नाहीं, असें म्हटल्यास चालेल; आणि म्हणूनच सदरहू लेखांतून पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या लेखकांसाठीं अनुक्रमें ' सत्कवि ' व 'कवि' असे तात्पुरते पारिभाषिक शब्द वापरण्याचें योजिलें आहे, एवढें लक्षांत ठेवण्याची वाचकांनीं खटपट करावी. मराठी भाषेच्या सुदैवानें व दुर्दैवानें सध्यांचे सारेच काव्यलेखक दुसऱ्या प्रकारचे नाहींत.* कांहीं सत्कवि आपल्या मातृभाषेची वंदनीय सेवा करीत आहेत; अर्थात् प्रस्तुत लेखांत त्यांच्याबद्दल कांहींएक लिहिण्याचें कारण नाहीं.

मात्र जातां जातां यांच्याबद्दल एवढें म्हणून ठेवल्यावांचून राहवत नाहीं कीं, यांच्या काव्यरचनेपासून सुदैवानें जसा आनंद होतो, तसाच दुर्दैवानें त्याच्या शतपट त्रासही होतो; कारण, यांच्या एकेक कवितेपासूनच एकाचे एकवीस आणि पांचांचे पंचवीस याप्रमाणें कवितेची कमअस्सल पैदास होत असते. त्यांच्या कविता व्हावयाच्या बंद झाल्या, तर आपल्या नकली नाण्याच्या टांकसाळीही खडाखड बंद होतील. मोराचा नाच डोळ्यांसमोर नसला म्हणजे लांडोरीच्या अंगांत उसनें अवसान येत नाहीं आणि गंगेला पूर आला नाहीं म्हणजे ' गांवगंगा नाहीं तुंबा ' बसण्याचें कारण उरत नाहीं. एखाद्या सत्कवीच्या कवितेची पालखी छबिन्यासाठीं बाहेर पडल्याबरोबर तिच्या पाठोपाठ तिचीं जुनेरीं नेसणाऱ्या जाफराबादी

*माझ्या कविवाचका ! तुझ्या छोट्या मनाच्या समाधानासाठीं मीं मुद्दाम या मोघम शब्दाची योजना केलेली आहे. गोड फसवणीच्या भरांत माझ्या योजलेल्या अंदाजाबाहेर आणखी एक वळकटी तूं या बेदाद धर्मशाळेंत हळूच आणून टाकणार आहेस हें मला आतां उघड उघड दिसत आहे. —बाळकराम

छवेल्यांच्या धिंडकांची धांदल पाहणाराला; आकाशांतल्या मेघांची गंभीर गर्जना होतांच त्यांच्या कृपाजलाचे चार थेंब न पचविण्याइतक्या हलक्या पोटाच्या बेडकांच्या आरोळ्यांची, हुबळी–धारवाडाकडे पोळ्याच्या दिवशीं वर्खानें शिंगें शोभाविणाऱ्या मोठमोठ्या बैलांच्या मागून आपल्या टीचभर शिंगांवरही तिचीच बेगडी मखलाशी करून निघालेल्या बोकडांच्या तांड्याची, किंवा पुण्यासाताऱ्याकडे दसऱ्याच्या दिवशीं झेंडूच्या माळा घालून मिरविणाऱ्या जातिवंत घोड्यांच्या बिनीला लागून रंगीबेरंगी पट्ट्यांनीं नटून चालणाऱ्या कुंभारी गा–धौतेश्वर! अशा प्रसंगीं मात्र या सत्कवींच्या काव्यानंदाचाही क्षणभर विसर पडून त्रासलेल्या मनाला हल्लीं मोठमोठ्या शहरांतून 'तीन वर्षांच्या आंतील मुलें' हातोहात नाहींशीं करण्याची युक्ति परमेश्वराला या सत्कवींच्या लहानपणीं न सांपडल्याबद्दल एक प्रकारची हळहळ वाटूं लागते! एखादुसरा मोरही नको आणि त्याच्या मागचा लाखों लांडोरींना तो कळपही नको, असें होऊन जातें!

या दोन प्रकारच्या कवींच्या कृति सकृद्दर्शनीं सारख्या स्वरूपाच्या भासल्या तरी त्यांत सूज–बाळशाइतकें अंतर असतें. सत्कवीच्या कवितेंत नवनव्या कल्पना विहरत असतात व आपल्या दोस्त कवीच्या बेसूर बडबडींत, येथून तेथून त्याची स्वतःची आपण कवी असल्याची एकच कल्पना दिसून येते. पहिल्याला रसिकांच्या झुंडीच्या झुंडी शोधीत असत, दुसरा रसिकांच्या तपासांत फिरत असतो; एकाला त्याचे वाचक तो कवि असल्याचें वारंवार सांगत असतात, दुसरा आपल्या वाचकांना आपण महाकवि असल्याचें सांगत असतो; एकाच्या कवितेंत परस्पर असंबद्ध गोष्टींतून सुसंबद्ध तत्त्व काढलेलें दिसून येतें, तर सुसंबद्ध गोष्टींना असंबद्ध रूपानें दाखविण्यांत दुसऱ्याची कविता पटाईत असते; एकाची कविता वाचतांच तिला मस्तकीं धारण करावी असें वाटतें, तर दुसऱ्याची कविता पाहतांच माथें फिरावयास लागतें; पहिल्या प्रकारच्या कवितेंत कधींकधीं उघड दिसणाऱ्या अर्थाच्या आड गमतीचा गूढार्थही दृग्गोचर होतो. तर दुसऱ्या कवितेंत कांहींच अर्थ नसतो; एक गरिबाच्या झोंपडींतसुद्धां स्वर्गसुख तुच्छ वाटावयास लावितो, तर दुसऱ्याच्या कवितेंतलीं स्वर्गसुखाचीं वर्णनें ऐकतांना नरकयातना भोगण्याइतका त्रास होतो; थोडक्यांत आणि

स्पष्ट सांगावयाचें झाल्यास एक खराखुरा कवि असतो आणि दुसरा शुद्ध नंदी ! शिव–शिव ! बोलण्याच्या भरांत केवढें वाईट काम करीत होतों मी ! परनिंदा ! अतिशयोक्तीच्या नादानें या यमकीमित्रांची किती नालस्ती केली ही ! क्षमा करा, गणदासांनो, क्षमा करा ! महाकवींत आणि तुमच्यांत मी म्हणतों तितकें विशेष अंतर नसून खरें पाहतां तें अगदीं दुर्लक्ष करण्याइतकें थोडें, केवळ दोन बोटांइतकें आहे ! महाकवि अगदीं स्वर्गांत भराऱ्या मारीत असतात, आणि प्रासपुत्रांनो ! तुम्हांला स्वर्ग केवळ दोन बोटें उरलेला असतो, एवढेंच !

प्रयोजानाची आणि मातुलकीची परिभाषा बहुतांशीं एकरूप असते. त्याचप्रमाणें गोरगरिबांच्या गौरीपुढील मांडणावळींत ज्याप्रमाणें त्या त्या आळींतील श्रीमंतांच्या घरची आरासच त्याच्या पतीप्रमाणें दिसून येते, त्याप्रमाणें चालू काळच्या सत्कवींच्या कवितेच्या अलंकारांनींच बहुतेक कवींच्या कविता नटतथटत असतात; कारण पहिल्या प्रकारच्या कवितेंत योग्य कारणामुळें आलेल्या बहुतेक गोष्टी पहिलींत त्या आल्या एवढ्याच कारणामुळें दुसरींत उतरत असतात. भूतकालचा सबंध जामदारखाना याप्रमाणें आपल्या संमोर उघडा सांपडल्यामुळें कवीला काव्यसाधनाची मुळींच वाण पडत नाहीं, परंतु या वडिलोपार्जित मिळकतीची मांडणी मात्र फारच अस्ताव्यस्त स्वरूपाची असते. आणि त्यामुळें आकाशांत फिरणाऱ्या ढगाप्रमाणें पहिलींत खरोखरीच पाणी खेळत असतें; आणि एखाद्या जलाशयांतील त्याच्या प्रतिबिंबाप्रमाणें दुसरीची सारी करामत पाण्यांत पडलेली असते. अल्लीबाबानें पाहिलेल्या चाळीस चोरांच्या गुहेंत अगणित अलंकारांची जिन्नसवार जुळणी तरी केलेली असेल, बारा घरच्या तुकड्यांनी भरलेल्या मधुकरीच्या ताटांतसुद्धां ठोकळ मानाची कांहींतरी शिस्त सांपडेल, चौकीपडून राहिलेल्या बेवारशी सामानाची व्यवस्थाही अगदींच आडमाप नसेल; पण कवितेच्या या रचनेंत मात्र जुन्यानव्या काळचा सारा चांगुलपणा चोरबाजारांतल्या लिलांववाल्यांच्या दुकानांतील सामानाप्रमाणें अगदींच गैरशिस्तपणें कोंबून भरण्यांत येत असतो. खऱ्या कवितेपासून नकली कवितेचा भेद स्पष्टपणें दाखविणें अद्यापि अगदी दुष्कर असलें, तरी त्याचीं

कांहीं ठळक लक्षणें देतां येण्यासारखीं आहेत. तयार साठ्यांतून मनोसोक्त उचल व्हावयाची असल्यामुळें असल्या कवीच्या कवितेंत रूढ शब्द, कल्पना किंवा अलंकार या सर्वांचा विलक्षण भरणा झालेला असतो; मात्र यांचा उपयोग करण्यांत मालकीच्या सरावातील मनमोकळेपणाच्या ऐवजीं पाहुण्याच्या स्वागतसमारंभासाठीं शेजारच्या श्रीमंतांकडून आणलेल्या रुप्याचांदीच्या भांड्यांचा व्यापार करतांना अपलेपणाचा छाप वठविण्याच्या हेतूनें हलक्या मानाचा मनुष्य जो फाजील बेफिकिरपणा दाखवित असतो तोच या कवितांतून येथून तेथून दिसून येत असतो. ठिकठिकाणीं क्षुल्लक वर्णनासाठीं निर्वाणीच्या, व उत्कट रसपोषणासाठीं अगदींच निर्जीव शब्दांचा उपयोग झालेला असतो. यामुळें या कविता तयार कपडे विकावयाच्या मोठमोठ्या इंग्रजी दुकानांतून दाराशीं नखशिखान्त सजवून ठेवलेल्या पुतळ्याच्या खड्या थाटांत असलेल्या दिसतात.

आहे, वाचकहो ! उपमादृष्टांताच्या या फाजीलपणामुळें त्रासलेल्या तुमच्या मनाची स्थिति माझ्या लक्षांत आहे ! त्याचप्रमाणें प्रस्तुत लेखाचें लांबलचक चऱ्हाट कवितेइतकेंच कंटाळवाणें होत चाललें आहे, हेंही मी पुरेपूर जाणून आहे; पण इलाज नाहीं. लेखाचा विषय कविता असल्यामुळें माझ्या अंगांत या वेळीं ती गद्यरूपानें संचरली आहे; तेव्हां उपमा वगैरे अलंकारांची गर्दी ही व्हावयाचीच ! तसेंच तुमच्या दृष्टीला दिसणारें हें चऱ्हाट विश्वव्यापि कवितादेवीच्या गंगावनांतील गोफालासुद्धां पुरावयाचें नाहीं.

भिन्नभिन्न उपमा, कल्पना किंवा शब्दप्रयोग यांचें एका वाक्यांत मिश्रण हें या भेदाचें दुसरें स्पष्ट लक्षण होय. उदाहरणांनीं हें लक्षण सुबोध करावयासाठीं वैयक्तिक टीकादोषाला प्राप्त होणें अपरिहार्य असल्यामुळें प्रस्तुत लेखांतील ‘ कवितादेवीचें शिखर ’ वगैरे प्रारंभींची वाक्यरचना वाचकांना पुन्हा पाहण्याची शिफारस करून मी मोकळा होतों. एकीचें पूर्वार्ध दुसरीच्या उत्तरार्धाशीं सांधून सजलेली मिश्र कल्पना पाहतांच अर्धमीनाकृति सागरसुंदरी पाहाणाऱ्या ग्रीक खलाशाप्रमाणें, किंवा कमरेपर्यंत फत्तराच्या व वर मानवी देह धारण करणाऱ्या बकावलीपरील पाहणाऱ्या ताजुलमुलकाप्रमाणें बिचाऱ्या वाचकाला गोंधळून गेल्यासारखें होत

असतें. तिसरी खूण रचनेच्या स्वरूपाबद्दलची असते. कोणत्याही विषयावर कविता करावयाला बसतांच आपल्या कवीला प्रथम स्वाभाविकपणेंच इतरांच्या त्या विषयावरील उत्तमोत्तम कल्पना आठवतात. यांचा उपयोग झाल्यानंतर दुसऱ्या प्रतीच्या कल्पनांच्या पलटणीची हाजिरी होते. याप्रमाणें उतरत उतरत शेवटीं स्वतःच्या रद्दड कल्पकतेची पुरवणी जोडण्यांत येते. यामुळें सहजच रसपरिपोष, कल्पनासौंदर्य वगैरे बाबतींत आपल्या कवीची कविता नेहमीं उतरत्या भाजणींत केलेली दिसून येते. प्रारंभींच्या दोनचार ओळींशीं शेवटल्या ओळींची तुलना करून पाहतांच ही गंमत वाचकांच्या चट्कन् लक्षांत आल्यांवाचून राहत नाहीं. अशी कविता पाहणाराला पहिल्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांना जोडवूनच मालाचे डबे ओढणाऱ्या सदर्न मराठा रेल्वेच्या गाडीची, किंवा कॉलर नेक्टायपर्यंत सुधारलेल्या पोषाखानंतर कमरेभोंवतीं पिढीजाद रुमालाचा फडकाच लावून काल्यांच्या जत्रेंत मिरविणाऱ्या कोळीदादाच्या मूर्तीची आठवण होत असते. अलीकडे कांहीं मासिक पुस्तकांतून कवितेच्या प्रारंभींच कवीचें नांव देण्याची वहिवाट पडत आहे; ती या दृष्टीनें पाहतां अस्थानीं आहेशी वाटूं लागते. कारण शेवटच्या भागावर कवीची खरीखुरी मालकी असल्यामुळें त्यांचें नांव शेवटीं येणेंच रास्त आहे. याशिवाय विशेषणाचा दुरुपयोग, कल्पनेची चोरी छपविण्यासाठीं मूळच्या साध्या शब्दांऐवजीं संस्कृतांतल्या आडरस्त्यावरच्या शब्दांची योजना, इत्यादि बारीकसारीक लक्षणेंही सांगतां येण्यासारखीं आहेत. सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास लांबलांब संस्कृत समास वापरण्याच्या रीतीचा उगमही असल्या छपवाछपवीच्या इच्छेपासूनच झालेला आहे, असें दिसून येईल.

कोणत्याही काळीं कवींचा एक भला मोठा कळप समकालीन सत्कवींची री ओढून अशा प्रकारची कविता करण्यासाठीं सारखा झटत असतो. नवे नवे सत्कवि उदयाला येतील, तसतशी यांच्या काव्यरचनेची पद्धति बदलत जात असते. मोठमोठ्या कचेऱ्यांतून वरचा अधिकारी वेळोवेळीं बदलला जाऊन कारकूनपेशाचे कारागीर मात्र अगदीं बुड्ढेपणांतही आपल्या जागीं तितक्याच आज्ञाधारक लघुवृत्तीनें काम करीत असतात, तद्वत् या कवीच्या मेळ्यांची स्थिति असते. कोणी कोणी कवि उभ्या आयुष्यांत एखाददुसरी

कविता नीटशी समजतांच तिच्या भिन्नभिन्न शिळ्या आवृत्ति काढण्याचा उपक्रम सुरू ठेवीत असतात. जगाच्या अमुद्रित काव्यसंग्रहांत अशा शिळाछापाचें कामच विशेष असल्याचा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. अष्टौप्रहर चालू करून ठराविक वर्तुळांतच गिरक्या खाणाऱ्या घड्याळांतील कांट्यांप्रमाणें यांची कटकट अखंड चालू असते. मात्र घोडकेंसांच्या झाडणीचे केंस जसे कितीही काळ गेला तरी पांढरें होण्याचा संभव नसतो, तसा वाढत्या कालमानाप्रमाणें यांच्या पोरकटपणाचेंही ज्ञानवृद्धत्वांत कधीं पर्यवसान होण्यासारखें नसतें. आतां आपल्या चालू काळच्या कवीचा साधारण नकाशा कसा काय असतो, हें पाहण्याचा थोडाबहुत प्रयत्न करून पाहूं.

प्राणिसृष्टींतील इतर घटकांप्रमाणेंच 'कवि हा जन्मावा लागतो.' मडकें, वस्तरा, गुडधानी वगैरे पदार्थांसारखा तो 'करून होत नाहीं.' सर्व जगाशीं याचें बंधुत्वाचें नातें असल्यामुळें जातिभेदाच्या अभावीं हा अगदींच विजातीय असतो. याचें आयुष्य बाल्यावस्था, तारुण्यावस्था व विरहावस्था या तिहींनीं विभागलेलें असतें. कवि म्हातारा मात्र असल्याचें अजून ऐकिवांत नाहीं. याचें बाळपण मोठ्या सुखांत गेलेलें असतें; परंतु तारुण्य मात्र तितकेंच दुःखपूर्ण असतें. याच्या जीविताची श्वसनक्रिया आजन्म दीर्घ निःश्वासांनींच होत असते. याच्या अंतरीं कसली तरी आग भडकलेली असते. हा रानावनांतून, डोंगरांवरून, जलाशयाच्या तटांवरून किंवा बागबगीच्यांतून नेहमीं फिरत असतो. आनंदांत निमग्न असणें, रडणें, तंद्रींत पडणें, किंकाळ्या मारणें, अलोचन जागरणें करणें, स्वप्नें पाहणें, भ्रान्तिष्टासारखें भटकणें, अश्रूंच्या पुरांत वाहून जाणें, फुलपांखरांच्या मागें लागणें, जगावर लाथ मारणें यांसारख्या करमणुकीच्या प्रकारांत हा आपला फावला वेळ घालवीत असतो. याला फुलांची दांडगी आवड असते. मात्र हा लहरी स्वभावाचा असल्यामुळें कधीं फुलांचा वास घेत असतो, तर कधीं त्यांना चुरगळून टाकीत असतो. गाण्याबजावण्याचाही याला बराच शोक असतो. याचा मुख्य आहार म्हणजे अमृत होय. तें आणण्यासाठीं हा हरघडी स्वर्गापर्यंत येरझारा घालीत असतो. वर्णनावरून पाहतां अमृताचा रंग ताडीसारखा पांढरा असावा. या अमृतपानामुळें

हा जिवंतपणीं मेल्यासारखा असतो, तरी मरणोत्तर चिरंजीव होण्याची याला खात्री असते. आपली कविता पुढल्या पिढीला आवडण्याबद्दल हा वाटेल तशी हमी देत असतो. याची एकंदर वृत्ति एखाद्या बालकासारखी असते. कवीच्या वस्त्रप्रावरणाबद्दल बहुतेक कोठेंही उल्लेख केलेला नाहीं. ' अरसिकेषु कवित्वनिवेदनम् ' ' निरंकुशा : कवय :' ' तान्प्रति नैष यत्न:' आणि 'कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर' या चार बुरजांच्या किल्ल्यांत याचें वास्तव्य असतें. जगाच्या कल्याणाची जबाबदारी यानें आपल्या टाळक्यावर घेतलेली असते. व्यवहाराच्या सोईसाठीं यानें गुणविभागश: मनुष्याच्या दोन जाती पाडिलेल्या असतात. आपली कविता वाखाणणारी शेलकी मंडळी ' रसिक ' वर्गांत बसवून हा बाकीच्या सर्वांना जात्या ' अरसिक ' कोटींत ढकलून देतो. ( ही विभागणी वैयक्तिक तत्त्वावर होत असल्यामुळें एका कवीचा रसिक दुसऱ्याच्या हिशेबी अरसिकांत जमा व्हावयाला कांहीं हरकत नसते. ) पैकीं रसिकांशीं याची जिवाभावाची दोस्ती असून अरसिकांशीं मात्र याचें हाडवैर असतें. कवीचें व्याकरणाशींही असेंच दांडगें शत्रुत्व असतें. काहीं कांहीं कवि तर जवळ जवळ अक्षरशत्रुही असतात. याशिवाय गंधर्व, अप्सरा इत्यादि परलोकच्या रहिवाशांशींही कवीची थोडीबहुत पैछान असते. याचें सर्व जगभर प्रेम असतें. हा विलक्षण मत्सरी असतो. आपल्या कवितेविषयीं बोलतांना तो पंढरपुरच्या वारकऱ्यांच्या विंगाण्यानें गर्जत असतो; तसेंच दुसऱ्याच्या कवितेविषयीं बोलणें निघतांच त्याच्या तोंडावर समाजिष्टाची स्वब्ध गंभीरता पसरते. कवि स्थल-कालाविषयीं बिलकुल पर्वा करीत नाहीं; नाहीं म्हणावयाला मासिक पुस्तकाच्या संपादकाजवळ मात्र ' पुढच्याच महिन्यांत ' ' आपल्या कविते'ला स्थळ देण्याविषयीं तो कधींमधीं अजीजी करीत असतो. कीर्तिविषयींहि तो असाच बेफिकीर असतो. एखाद्यानें आपली कविता वाचल्यावर हा आतुरतेनें ती कशी काय असल्याबद्दल चौकशी करितो, ती केवळ वाचकाची रसिकता पाहण्यासाठीं. हा घरचा अतिशय दरिद्री असतो. मात्र अस्सल गर्भश्रीमंतांना आपल्या गजान्तलक्ष्मीबद्दल वाटत नसेल इतका कवीला आपल्या दारिद्र्याचा अभिमान असतो. आकाशांत गिरक्या घेणाऱ्या गिरकेबाज कबुतराला गरिबीच्या गिलोलानें कोलमडून तडफडतांना

पाहिलें, म्हणजे जगाची काळजी वाहणाऱ्या या जिवाचे असे हाल करणारा परमेश्वर मोठा निर्बुज असला पाहिजे, असें तिऱ्हाइतालासुद्धां कधींकधीं वाटण्याचा संभव असतो; परंतु प्रत्येक कवीच्या घरीं मासिक पुस्तकांकडून परतलेल्या कवितांचें द्रव्याभावामुळें न छापलेलें बाड पाहणाराला मात्र कवीपेक्षां परमेश्वरालाच जगाची जास्त काळजी वाटते, असें प्रांजलपणें कबूल करावें लागतें. कवीचें अंतःकरण आरशासारखें असतें! अर्थात् अशा हृदयांत समोर असेल त्या काव्याचें जसेंच्या तसें प्रतिबिंब वठत असल्यास तें रास्तच आहे. अगदीं लहानपणापासूनच याला कविता करण्याचा रोग जडलेला असतो. हा रोग कोणत्याही उपायानें हटण्यासारखा नसतो. एकदां हलूं लागलेला दांत सोन्याच्या तारेनें कांहीं काळ तरी बांधून स्थिर ठेवितां येतो, पांढरा झालेला केंस कलपानें तात्पुरता तरी काळा होतो, परंतु कवि मात्र सोन्याची रास पुढें ठेविली, किंवा टीकांमुळें ठिकठिकाणीं काळाठिक्कर पडला, तरी कविता करावयाचा थांबत नाहीं, कवीचें नांव बहुधा त्याच्या आप्तेष्टांच्या नांवांशीं संलग्न असतें. नांव मिळविण्याइतकी अक्कल नसल्यामुळेंच कवीला सग्यासोयऱ्यांच्या नांवावर भिस्त ठेवावी लागत असेल, अशी क्षुद्र कल्पना लढवून कोणी कोणी या प्रघाताला नांवें ठेवण्याचा प्रयत्न करितात; परंतु त्यांत नांवापुरतेंसुद्धां तथ्य नसतें. पुढेंमागें कवितेमुळें आपलें नांव घालविण्याची भीति असल्यामुळें आप्तेष्टांना दूरदृष्टीनें पुढें लोटणाऱ्या कवीला अक्कल नाहीं, असें कोण म्हणेल? शिवाय दांतांवरून जाणत्यांना घोड्यांचें वय ओळखतां येतें, त्याप्रमाणें दरदी मनुष्याला कवीच्या या नांवावरून त्याचें काव्यारंभाच्या काळचें वय हुडकून काढतां येण्याचीही या पद्धतीनें थोडीशीं सोय होते. पुत्र किंवा बंधु या अर्थाच्या शब्दांनीं नांवाचा शेवट करणारा कवि बहुधा बाळपणींच कविता करण्याला शिकलेला असतो, असा अंदाज करणें फारसें चुकीचें होणार नाहीं. कारण प्रणयाची लज्जत कोवळ्या वयांत समजण्याजोगी नसल्यामुळें मुलाच्या प्रेमाची मर्यादा आईबाप, बहिणभाऊ यांच्यापुरतीच पसरलेली असते. 'भ्रमर', 'मयूर' वगैरे काव्यसृष्टींतल्या परक्या मंडळीच्या नांवावर विकावयाला तयार झालेल्या उमेदवाराला बाल्य व तारुण्य यांच्या सीमारेषेवर उभा करतां येईल. या

वयांतील प्राणी जन्मदत्त नातेवाइकांच्या प्रेमाला तृप्तीमुळें कंटाळलेला, स्त्रीविषयक प्रेम न जाणणारा; परंतु त्याची अंधुक कल्पना असल्यामुळें तें शोधावयाच्या मार्गाला लागलेला असा असतो; आणि म्हणून या भटकण्यांतच त्याची वरील मंडळीशीं ओळख घडून येत असते. रमणाच्या नात्यानें सरसावणारा प्रणयी वीर तरुण वयाचा असतो, हें सांगावयाला नकोच. यापुढील वयांत कविता-प्रसिद्ध करायला लागलेला कवि स्वतःच्या संपूर्ण नांवानें, किमान पक्षीं 'यशवंत,' 'सदाशिव' याप्रमाणें एकतृतीयांश नांवानें तरी पुढें येऊं लागतो. कवीचें सर्वच जीवन जगाविरहित असल्यामुळें नात्याच्या बाबतींत त्याच्या कल्पनांतून कधींकधीं विसंगतपणा दिसून येतो. आपल्या कवितेला हा कधीं कन्या कल्पून तिला वाटेल त्या रसिकांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं झटत असतो, तर कधीं तिला आपलीच वल्लभा ठरवून तिच्याभोंवती नाचत सुटतो! बाकीं एका अर्थी कवीच्या विश्वबंधुत्वामुळें या विरोधाचें सहज खंडन होण्याजोगें आहे.

साऱ्या जन्मभर कविता करणें हा जरी कवीचा व्यवसाय असला, तरीही वर सांगितलेल्या अवस्थात्रयीमुळें त्याच्या जीवनक्रमांत वेळोवेळीं महत्त्वाचे फेरफार घडून येत असतात. बाळपणीं आईच्या मांडीवर लोळत राहणें, फुलांत उठणेंबसणें, पतंग-फुलपांखरांच्या बरोबर बागडणें, हाच याचा मुख्य रोजगार असतो. पुढें लवकरच याला कविता करण्याची कला प्राप्त होते. या वयांत शकुंतलेच्या सखीप्रमाणें याला 'मेलें विषयसंबंधीं वारें' हीं लागलें नसल्यामुळें अर्थातच हा कवितेसाठीं विषयसुद्धां उघड उघड प्रसिद्ध कवितांतीलच घेत असतो. या वयांतील त्याची कविता स्थलवर्णनांत किंवा नीतिपर तत्त्वें हुडकण्यांत गढलेली असते. षड्रिपूंशी सामने, संसाराच्या भोवऱ्यांत सांपडल्याबद्दल खेदप्रदर्शन, चौऱ्यायशीं लक्ष योनींचा फेरा चुकविण्यासाठीं ईश्वराची प्रार्थना वगैरें भानगडी याच वयाच्या कवितेंत उरकून टाकण्यांत येतात. कवि काळाच्या पुढें असतो, ही गोष्ट सर्वत्र मशहूरच आहे. तिला अनुसरून जरासें वयोमान वाढतांच आपला कवि शृंगाराकडे वळतो. या अल्पवयस्क अवस्थेंतील त्याची सारी कविता बहुतकरून शृंगारालाच वाहिलेली असते. या वेळीं हा सुखसागरांत पोहत असतो. यानंतर बहुतेक लवकरच त्याचें लग्न झाल्यामुळें विरहावस्थेचा काळ सुरू

होतो. साधारण दहाजणींसारखी बायको मिळाल्यामुळें याच्या भ्रमाचा भोपळा फूटून हा सुखसागरांतच गटंगळ्या खाऊं लागतो. बायको मिळाल्यामुळें विरहाला प्रारंभ होणें हा कवीच्या आयुष्यांतील सर्वांत मोठा विरोधाभास अलंकार होय. कवीचें लग्न जरी एकदांच होत असलें, तरी त्याला दोन स्त्रिया असतात. एक संसारकामांत राबणारी बायको व दुसरी कवितेंत नाचणारी प्रिया. यांपैकीं बायको घरांतल्या घरांत कबाडकष्ट करून पोराबाळांच्या खस्ता खात असते, आणि प्रिया कवीला गुंगारा देऊन कोठेंतरी दडून बसलेली असते. बायकोशीं याचें चारचौघांसमक्ष राजरोस लग्न झालेलें असतें. प्रियेशीं हा गांधर्वविवाहानें संबंध जोडूं पाहत असतो. ती याच्या इष्टमित्रांनीं कधीं पाहिलेली नसते. किंबहुना यानेंही पाहिलेली नसते. तिला आळविण्यासाठीं हा परोपरीनें रडत असतो. कधीं कधीं हा छातीवर फुलें ठेवून पडलेला असतो. याच्या डोळ्यांतून अश्रूंचे अलोट पूर वाहत असतात. आमच्या तिंबूनानांनीं तर आगीसाठीं बंब ठेवण्याच्या आटाआटीपेक्षां विरहावस्थेतील कवींचाच उपयोग करण्याची आमच्या म्युनिसिपालिटीला शिफारस करण्याचें मनांत आणिलें होतें; परंतु कवीला आपल्या अलोट पुरानें स्वत;च्या हृदयांतील विरहाग्नीच्या ज्वाळा विझवितां येत नाहींत, असें पाहून नानांनीं आपला हा बेत रद्द केला. या अवस्थेंत कवीच्या सभोंवार भयाण अंधार पडलेला असतो. या अंधारांत बसून तो सिनेमाथिएटरांतील प्रेक्षकांप्रमाणें कल्पनातीत गोष्टी पाहत असतो. पृथ्वीवरील लहानसहान गोष्टींच्या वर्णनासाठींसुद्धां याला स्वर्गापर्यंत भरारी मारावी लागते. उंटावरून शेळ्या वळण्यापेक्षांही वरच्या दर्जाच्या या करामतींत कवीकडून कधीं कधीं गमतीचा वस्तुविपर्यास होत असतो. एका कवीनें मोराच्या मधुर गायनाची शिफारस केली आहे. दुसऱ्याला आश्वीनमासाचे दिवस विलक्षण शांतीचे वाटून जमीन हिरव्या कुरणांनीं मंडित झालेली दिसली आहे. तिसऱ्यानें बोरघाटांत हंसाची वसाहत करून ठेविली आहे. कोणी फुलपांखराचें गाणें ऐकिलें आहे. कोणी कांकडभुंग्याला सकाळीं सूर्याला सामोरें जाऊन स्वागतपर गातांना पाहिलें आहे. एकानें आपण बोलूनचालून स्पष्ट रोडकेच असलों, तरी आपला तिरस्कार न करण्याबद्दल आपल्या प्रियेला विनवणी केली आहे; जणूं काय

सुंदर स्त्रियांच्या डोळ्यांत भरण्यासाठीं तरुणांच्या अंगीं गलेलठ्ठपणा हा गुण अवश्यच आहे ! या व याच धर्तीच्या अनेक आचरट चुका पाहून वाचकांना राग येण्याचा संभव आहे खरा; परंतु हे सारे शोध कवीनें स्वर्गांत भरारी मारून तेथून केलेले आहेत, असें कळल्यावरून तरी ते क्षम्य वाटावयाला हरकत नाहीं, असें वाटतें. स्वर्गाच्या खालोखाल कवीला स्मशानाची आवड असते. यामुळें भुतांखेतांशींही त्याची बरीच जानपछान झालेली असते. विरहावस्थेंत कवि मरणाची सारखी अपेक्षा करीत असतो; परंतु बहुधा त्याच्या काव्यनिर्माणशक्तीला वचकूनच यम त्याची ही प्रार्थना होतांहोईतों ऐकत नाहीं. मला वाटतें, प्राणिमात्राच्या यच्चयावत् हालचालींची नोंद ठेवणाऱ्या चित्रगुप्तानेंसुद्धां, आपल्या आधुनिक कवींच्या कवितांच्या नकला करण्यापुरती देवाजवळून सवलत मागून घेतलेली असेल. आमचा भांबूराव ( याच्या व आबाभटजींच्या कवित्वाचें विस्तृत वर्णन पुढें येणारच आहे. ) आपल्या विरहावस्थेच्या काळांत मरण्यासाठीं असाच आतुर झाला होता. या एकाच विषयावर त्यानें इतक्या कविता केल्या कीं, अखेर नानांनीं कंटाळून त्याच्या टेबलावर अफू, सोमल वगैरे द्रव्यांची साऱ्या आधुनिक कवींना पुरून उरण्याइतकी रास आणून ठेविली होती ! विरहदु:ख भोगीत असतांना आयुष्याच्या शेवटच्या टोंकाप्रमाणें प्रारंभींच्या टोंकावरही कवि मधूनमधून नजर टाकीत असतो. चालू काळाच्या दु:खामुळें त्याला बाळपण विशेषच सुखाचें वाटूं लागतें ! शिवाय बाळपण मूळचेंच सुखप्रद असल्याबद्दल सर्व जगाचीच एकवाक्यता आहे ! वाचकहो ! आपलें बाळपण कोणाला रमणीय वाटत नाहीं ? मोठमोठ्या कवींनींसुद्धां '**बाळपणाचा काळ सुखाचा**', '**रम्य तें बाळपण देईं देवा फिरुनि**' किंवा '**बाळपणींच्या नाना तऱ्हा**' अशांसारखे बाळपणचे पोवाडे गाइलेले आहेत ! अहाहा ! तें बाळपण आणि त्या लीला ! तें अर्ध्या तिकिटानें प्रवास करणें ! तें निम्म्या दरानें नाटक पाहणें ! तें सर्वांनीं कौतुक करणें ! माझ्या लहानपणीं शेजारपाजारच्या बायकांनीं पटापट चुंबनें घेऊन माझे लाड पुरवावेत; पण तेंच आतां——! वाचकहो, बाळपणींचें सुख अवर्णनीय आहे, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

त्यानंतर कवीच्या अंगच्या मुख्य गुणाचें वर्णन करावयाचें आहे. हा गुण म्हणजे कवीचें वेड होय. कवीच्या वेडासाठीं स्वतंत्र टप्पा (पॅराग्राफ) न राखणें निवळ वेडेपणाचें होईल. कवि हा उपजत वेडा असतो. लेखाच्या तोंडांतच कविचा व वेडाचा संबंध उडत्या उल्लेखानें दर्शविलेला आहे. कवीचें हें वेड घालविण्याचा प्रयत्न करणें तर दूरच राहिलें, परंतु तें नाकबूल केल्यानेंसुद्धां आपल्याशीं कवि उभा दावा धरील, या वेडाच्या भरांत कवि वाटेल तो विलक्षण चमत्कार करून दाखवितो. एका कवीनें आपल्या कुटुंबांतील सारीं माणसें मेल्याचें एका सद्गृहस्थाला पत्र पाठविलें आणि दुसऱ्या दिवशीं सर्वांच्या खुशालीचें दुसरें पत्र पाठवून त्यांत पहिल्यांतील सर्व गोष्टी आपण वेडाच्या भरांत लिहिल्याबद्दल खुलासा केला! जगाला उपदेश करावयाला तयार झालेला हा महात्मा स्वतः वेडापीर असतो, हें साहित्यशास्त्रासंबंधीं सत्य, पदार्थमात्राला दृष्टिगोचर स्वरूप देणारा प्रकाश स्वतः अदृश्य असतो या पदार्थशास्त्रांतील तत्त्वालाही लाजविण्याजोगें आहे! कोणाला पैशाचें वेड लागतें, कोणाला कीर्तीचें वेड लागतें. एका बाईला आपण पोस्टाचें तिकिट असल्याबद्दलचें वेड लागलें होतें; एका गृहस्थाला आपण प्रमाणाबाहेर लठ्ठ असल्याचें व दुसऱ्याला अक्षय पाऊस पडत असल्याचें वेड लागलें होतें; परंतु कवीला आपण वेडें असल्याचेंच वेड लागलेलें असतें! प्रत्येक कवि आपल्याला निर्भेळ वेड आगल्याबद्दल अट्टाहासानें दवंडी पिटीत असतो. लोकांना हें वेड खरें वाटण्यासाठीं तो भर दोनप्रहरीं फिरावयाला निघतो, केसांच्या झिंज्या पसरतो, चारचौघांत बोलतांना मध्येंच स्वगत भाषणाला सुरवात करतो, पंक्तीत जेवतांना 'दुर्घीं लिंबू पिळणाऱ्या अर्जुनालाही शहाणा म्हणवितो, (एकानें तर एकदां आपल्या शेजारीं जेवावयाला बसलेल्या एका वृद्ध गृहस्थालाच प्रियामजकूर समजून त्याच्या तोंडांत घांस भरविण्यालाही कमी केलें नाहीं), कोटाचीं बटणें उघडीं टाकतो, टाळक्यावरची टोपी सवा हात मागें ठेवतो, किंवा भररस्त्यांत मध्येंच बैठक मारतो. इस्पितळांतील वेड्यांच्या आणि कवींच्या तोंड्यांची थोडीशी तुलना करणें फारसें वावगें होणार नाहीं. इस्पितळांतील प्रत्येक वेडा तिऱ्हाइताला स्वतः खेरीज तेथील बाकी सर्व रहिवाशी वेडे असल्याबद्दल बजावीत असतो,

आणि कवींच्या टोळींतील प्रत्येक जण हा हक्क स्वतः पुरताच राखून ठेवित असतो. वेडा उगीच आडव्यातिडव्या उड्या मारितो; तर कवीच्या स्वर्गापर्यंत उड्या चाललेल्या असतात! तो लोकांना धोंडे मारतो; तसा हा रसिकांच्या अंगावर धूळ उडवतो. तर दुसरा लोकांचा डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं झटत असतो! या कवींच्या स्वर्गापर्यंतच्या साऱ्या उड्या केवळ त्यांच्या वेडाच्या जिवावर चाललेल्या पाहून मात्र स्वर्गाच्या सरहद्दीवरील बंदोबस्त फारच ढिलाईचा होत चालला असावा, असें वाटूं लागते! हे स्वर्गस्थ देवांनो; आम्हां आर्यांचीं टीकांचीं बाडें मासिक पुस्तकांचीं कपाटें फोडून तुमच्या कानावर येऊन आदळत नाहींत काय? स्वर्गप्राप्तीचे ते कडक निर्बंध आज कोठें गेले? आपल्या विधवेच्या केसानें किंवा जानव्याच्या सूतानें स्वर्गास जाण्याच्या आमच्या आर्य–कल्पना लयाला जाऊन नुसत्या वेडाच्या कल्पनेनेंच आतां स्वर्गसुख मिळणार काय?

कवीच्या आणखी एका गुणाचा उल्लेख करून त्याचें हें लांबलेलें वर्णन पुरें करूं. कविता करण्याइतकाच त्याला आपल्या कविता दुसऱ्याला वाचून दाखविण्याचाही हव्यास असतो. अर्थात् नव्या कवितेचा पहिला मारा कवीच्या निकटच्या मित्रांवरच होत असतो. कांहीं कवि आपलें बाड बरोबर घेऊन हिंडत असतात, आणि कांहीं तर साऱ्याच कविता पाठ म्हणून दाखवीत असतात. या कवितांत लहानसहान गुणांचें सविस्तर स्पष्टीकरणसुद्धां श्रोत्याला ऐकावें लागतें! माझ्या एका कविमित्रानें मला कविता ऐकविण्याचा इतका त्रास दिला कीं, ज्याचें नांव तें! कोठेंही व केव्हांही भेटला कीं त्याच्या सगळ्या बेगम कवितांचा तो मला नजराणा केल्यावांचून राहत नसे! एकदां भरबुधवारांत त्यानें तालसुरावर आपल्या कविता म्हणून दाखवायला सुरवात केली. हळुहळू आमच्याभोंवतीं तमासगिरांचा तांडा जमूं लागला! लोक आपणाला वेडे समजतील, असें मीं त्याला सुचवितांच त्याला दुप्पट अवसान येऊन रंग चढत चालला. शेवटीं बुधवार-चौकांत येईपर्यंत आमच्या मागें इतका बेताल घोळका जमला कीं, ज्याचें नांव तें! त्याच रत्नानें आणखी एकदां माझा असाच कोंडमारा केला होता! त्या वेळीं मी एका निकडीच्या कामांत गढून गेलों होतों. अशांत कोठल्याशा आप्ताच्या मरणाबद्दलचें आपलें शोकरसप्रधान छोटेखानी

काव्य आणून त्यानें माझ्या सेवेला सादर केलें. मला त्या वेळीं फुरसत नसल्यामुळें पुढें केव्हां तरी स्वतःच तें वाचून पाहण्याचें अभिवचन देऊन तूर्त माझा वेळ न घेण्याबद्दल मीं मोठ्या काकुळतीनें त्याची विनवणी केली. बराच वेळ नाखुषीनें आढेवेढे घेऊन शेवटीं त्या छाव्यांतील निदान सत्रावें कडवें तरी आपल्या तोंडूनच ऐकण्याचा मला आग्रह केला. माझा रुकार मिळतांच त्यानें तें कडवें अगदीं ठायींत आळवून आळवून म्हणण्याला प्रारंभ केला. त्यांतील गुणांच्या विवेचनांत मागील संदर्भ माझ्या लक्षांत येण्यासाठीं त्यानें सोळावें कडवें म्हणून दाखविलें! सोळाव्याच्या स्पष्ट बोधासाठीं पुन्हा पंधराव्यांची साक्ष! याप्रमाणें अरेबियन् नाइट्स्मधील गोष्टींतून गोष्ट निघण्याच्या तत्वाबरहुकूम आम्हीं मागल्या पावलीं जात जात पहिल्या कडव्यावर जाऊन ठेपलों! आणि तेथून संगतवार शेवटपर्यंत आलों. गुणांच्या सूक्ष्म शोधासाठीं याप्रमाणें त्या काव्याचीं आम्ही एकंदर तेरा पारायणें केलीं. शिवाय प्रत्येक वेळीं प्रत्येक चरण नीट कळण्यासाठीं तो चारचारदां घोळून म्हणत होता, तें वेगळेंच! मधून मधून आत्मस्तुति-पर मल्लिनाथीचा माराही सारखा चालू होताच. आमच्या संवादांतील चारसहा वाक्यें नमुन्यासाठीं पुढें दिलीं आहेत.

तो—लक्षांत नाहीं आलें तुमच्या! ही या चरणांतली मुख्य मख्खी आहे.

मी—आलें लक्षांत! फार मार्मिकपणानें तुम्हीं हें वर्णिलें आहे खरें!

तो—माझ्यांत हेंच तर विशेष आहे! सृष्टीचें सूक्ष्म-अवलोकन! तुमच्या सामान्य दृष्टीला जिथें कांहीं दिसत नाहीं, तिथें मला हजारों गोष्टी दिसतात.

मी—तुमची कविताच याबद्दल साक्ष देईल! (त्याच्या कवितेंत मला एकही गुण दिसत नसून त्याच्या दृष्टीनें मात्र तिच्यांत गुणांनीं गजब-जलेलीं शहरेंच्या शहरें दिसत होतीं. मात्र माझ्या या वाक्यांतील खोंच त्याच्या लक्षांत आली नाहीं. पण त्याची कविता ऐकण्याचा कंटाळा मीं माझ्या तोंडावर स्पष्टपणें दाखवूनही जेथें त्याच्या सूक्ष्मदर्शक यंत्राच्या आटोक्यांत आला नाहीं, तेथं त्या गर्भित सूचनेचा काय पाड?)

तो—उगीच अशी कविता नाहीं होत! अंतःकरण सृष्टीशीं एकजीव झालें पाहिजे! बस्स, कवीला हृदय पाहिजे! कवीला डोक्याची कांहीं जरूर नाहीं!

मी—अगदीं बरोबर ! आपल्या पुष्कळशा कवींना विधात्यानें डोकें दिलें आहे, तें उपयोगाकरितां नसून केवळ मनुष्यदेहाची परंपरा संभाळण्याकरितांच असावें असा माझा समज आहे !

तो—तुमचा समज अगदीं खरा आहे ! माझेंच उदाहरण घ्या कीं ! हृदय मृदु नसतें, तर अशी कविता होती का ? अहो, हृदयच काय, माझा हात पहा, कविता लिहून लिहून किती मऊ झालेला आहे तो ! स्वर्गापर्यंत भराऱ्या एरवीं साधत नाहींत !

नुसता हात मऊ झाल्यानें स्वर्गापर्यंत जाण्याचें त्याला सामर्थ्य आलेलें पाहून पाठीचींसुद्धां हाडें मऊ करून त्याला आजिबात स्वर्गवासी करण्याची परोपकारबुद्धि क्षणभर माझ्या मनांत येऊन गेली ! हें काव्यवाचन चाललें असतांना तो त्या मेलेल्या आताबद्दल मधून मधून रडतही होता ! मींही मयतमजकूर अगदीं अवेळीं मेल्याबद्दल मनापासून दिलगिरी प्रदर्शित केली ! पुढें तो शोकानें ओक्साबोक्शीं रडूं लागतांच मी किंकाळ्या मारावयाला लागलों, आणि शेवटीं दुःखावेगाच्या भरांत बेशुद्ध झाल्याचें सोंग करून धाडकन् धरणीवर अंग टाकलें ! माझ्या अंदाजाप्रमाणें डॉक्टर वगैरे आणण्याच्या खटपटींत न पडतां तो आपल्या शीघ्रकवित्वाच्या जोरावर अश्रुजलानेंच मला सावध करूं लागला ! कांहीं वेळ श्वासोच्छवास साफ बंद ठेवून मी तसाच निपाचिप पडून राहिलों त्या वेळीं मात्र आपल्यावर कांहीं किचाट येईल, या भीतीनें तो आपलें चंबूगवाळें आवरून घाईघाईनें निघून गेला, आणि मी एकदांचा त्या जाचांतून सुटून अस्वलाच्या तावडींतून वांचलेल्या इंग्रजी प्रवाश्याप्रमाणें मोकळेपणानें आपल्या कामाला लागलों ! प्राणायामाचें महत्त्व या वेळेपर्यंत मला नीटसें समजलें नव्हतें !

काव्यवाचनाबद्दल कवींचा लकडा इतका चिकाटीचा असल्यामुळें त्याच्याशीं ओळख होणें हें दुर्दैवाचें लक्षण आहे. माझा तर असा तर्क आहे कीं, वाल्मीकीच्या शतकोटि रामायणाचे तीन तुकडे तीन लोकीं वांटून देऊन स्वतःसाठीं ' राम ' हीं दोनच अक्षरें ठेवण्यांत भगवान् कैलासनाथाचा हाच लोकहितपर हेतु असला पाहिजे. कारण एवढें मोठें काव्य वाचण्याची जबाबदारी कोणत्याही एकाकी लोकावर टाकणें केवळ निर्दयतेचें झालें असतें ( मात्र एका सबंध काव्याचे तीन तुकडे केल्यानंतरही प्रत्येक

तुकडा ठाकठिकीनें सलंगच्या सलंग कसा राहिला, हें माझ्या बाळबोध मनाला न सुटण्याजोगें कोडें आहे. त्या दिवशीं शृंगीभृंगी वगैरे गणांनीं थंडाई थोडी विशेष कुसरीनें केली असावी, असें वाटतें. ) कांहीं लोकांचा आमच्या आधुनिक कवींवर असा आरोप आहे, कीं त्यांना महाकाव्यें करतां येत नाहींत. मी हा कवीची दोष नसून उलट गुणच समजतों. त्यांच्या इवलाल्या स्फुट काव्यांनींच वाचकांना बेजार करून सोडिलें आहे. मग महाकाव्यें निघूं लागलीं, तर काय प्रलय होइल नकळे ! छेः छे ! कवीश्वरांनों ! भलत्या भरीला पडून तुम्ही महाकाव्यें रचण्याच्या नादीं मात्र मुळींच लागूं नका ! नुसत्या छऱ्यांनीं जमीनदोस्त होणारांवर क्रप तोफांची सरबत्ती कशाला हवी ! कांहीं कवींना आपल्या कवितेंत प्रेतांनाही उठविण्याइतकी धमक असते असें वाटत असतें, तें बहुतकरून याच जोरावर ! खरोखरीच स्मशानांत एखाद्या कवीनें लांबसें काव्य जोरानें वाचावयाला प्रारंभ केला, तर खात्रीनें प्रेतें खडखड उठून उभीं राहतील ! मात्र तीं तें काव्य ऐकावयाला एक क्षणभर तरी थांबतील किंवा नाहीं, एवढाच प्रश्न आहे ! चालू महायुद्धांत सरकारनें हिंदी शिपायांच्या इतक्या पालटणी नेल्या, त्यापेक्षां आधुनिक कवींची लहानशीच तुकडी पुढें घातली असती तर शत्रूची ताबडतोब पांगापांग झाली असती, अशी माझी बालंबाल खात्री आहे !

आपल्या कविमित्राचा निरोप घेण्यापूर्वीं कांहीं भाग्यशालि कवींचें अभिनंदन केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. या कवींच्या घरांतूनही कवितेचा वावर चाललेला असतो. कोठें कोठें तर कवितेची सांथ थेट पोरांबाळांपर्यंत पसरलेली आढळून येते. नामदेवाच्या कुटुंबाप्रमाणें हल्लीं महाराष्ट्रांत बरींच घरें कविता करण्यांत रमलेलीं आहेत. आमच्या भांबूराचाचा धाकटा मुलगा तर उपजतांक्षणींच स्रग्धरावृत्तांत रडत असल्याचें तो शपथेवर सांगत असतो. याप्रमाणें सहकुटुंब सहपरिवारें स्वर्गापर्यंत भराऱ्या मारणाऱ्या आमच्या आधुनिक कवींपुढें एकटा दुकटा सदेह स्वर्गाला जाणारा तुकाराम अगदींच फिक्का पडतो, हें पुराणाभिमानी लोकांनाही कबूल करावें लागेल !

अशा प्रकारें चालत्या जमान्यांतल्या कविवर्गाचें वर्णन केल्यानंतर

दुसऱ्या एका वर्गाकडे न वळणें केवळ अन्यायाचें होणार आहे. हा वर्ग आधुनिक कवींच्या आक्षेपकांचा होय. आजकाल कवितेच्या कारभारांत पडलेल्या लोकांचे मतभेदानुरूप दोन स्पष्ट विभाग पडलेले आहेत. यांपैकीं एका वर्गाला ' नव्याचे सोयरे ' व दुसऱ्या कंपूला ' जुन्याचे सुतकी ' अशी नांवें देतां येतील. पहिला पंथ कोणत्याही नव्या गोष्टीचें अभिनंदन करीत असतो, आणि दुसरा प्रत्येक जुन्या गोष्टीबद्दल हळहळत असतो ! एकाच्या मतें हिंदुस्थानचें उष्टावण अजून व्हावयाचें आहे, तर दुसऱ्याच्या दृष्टीनें त्याच्या उत्तरक्रियेसाठीं भाताचें पिंड वळावयाचेंच काम तेवढें राहिलेलें आहे ! यांचीं हीं सोयरसुतकें केव्हांही फिटण्याजोगीं नसतात. आपल्या बहुतेक कविमित्रांचा सोयऱ्यांत समावेश होत असून त्यांचे आक्षेपक सुतक्यांच्या थव्यांत सामील झालेले असतात. मात्र आनंदाच्या स्मितहास्यापेक्षां दुःखाच्याच किंकाळ्या नेहमीं तीव्र असल्यामुळें सोयरेमंडळीपेक्षां सुतक्यांचीच मुजोरी जास्त जोराची असते. नव्या पक्षाला जुनी कविता इथूनतिथून कमकुवत वाटत असते, आणि जुन्या पंथाला नवी कविता बाटग्या स्वरूपाची भासत असते. या सुतक्यांचीं कांहीं मतें पुढें मासल्यासाठीं दिलेलीं आहेत. भक्ति व कविता एकच होत, हें त्यांचें अत्यंत लाडकें मत होय. अर्थात् सर्व इंग्रजी कविता, बहुतेक चांगली संस्कृत कविता, आणि नलोपाख्यानासारखी बरीच मराठी कविता, यांच्या दृष्टीनें बाष्फळ ठरून मोकळी होते ! भक्तीखेरीज कविता नाहीं आणि भक्तिविषयक जें कांहीं असेल नसेल, तें पूर्वजांनीं म्हणून ठेवलेलेंच आहे; त्यामुळें नव्या कवींनीं मुळींच कविता करूं नये हा यांचा पहिला सिद्धान्त होय ! प्रीतीसारख्या पाचकळ विषयावरील कविता अश्लील असावयाचीच, हें यांचें आवडतें मत असतें ! लग्नसमारंभावर अश्लीलत्वाचा आरोप करण्याला यांची सेना अजून कशी सरसावत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. मेघदूतासारखीं चटोर काव्यें, आणि शाकुंतलासारखीं चवचळ नाटकें, यांच्या डोळ्यांदेखत राजरोस मिरवत आहेत, हें यांच्या उजळ ब्रीदाला अगदीं लांच्छनास्पद आहे ! प्रीतीविषयक कविता करावयाच्या झाल्या, तर त्यांना पुराणाची थोडीशी फोडणी तरी असावी, असा यांचा आग्रह असतो ! प्रणयकल्पनांची किळसवाणी बडबड सोडून देऊन, यशोदेजवळ गाऱ्हाणीं

सांगावयाला आलेल्या गोपींजवळून पांच वर्षांच्या निर्दोषवृत्ति कृष्णानें आपला चेंडू काढून घेण्यांत जें हृदयंगम हस्तकौशल्य दाखविलें, त्याचें वर्णन करावयाला अर्थात् यांची आडकाठी नसते ! नावडत्या गोष्टीवर तुटून पडतांना देवादिकांचीं आणि साधुसंतांचीं पथकें पुढें केल्याखेरीज यांचें नीट जमत नाहीं ! हल्लीं चोहींकडे अधर्म, भ्रष्टाकार आणि पिछेहाट जारीनें सुरू आहे, हें यांचें जन्मवेड असतें. नव्या कवींना किंवा त्यांच्या कविता छापणाऱ्या मासिक पुस्तकांना लोक अद्यापि सार्वत्रिक बहिष्कार कसा घालीत नाहींत याचें या वर्गाला मोठें गूढ वाटत असतें. परमेश्वराचा अकरावा अवतार बहुधा या सत्कार्याकरितांच होणार, असा यांचा आवडता होरा असतो. आधुनिक कवींना महाकाव्यें करितां येत नाहींत, हा यांचा तिसरा आक्षेप असतो. चवथा आक्षेप असा आहे, कीं आधुनिक कवींना मुळींच ज्ञान नसतें. आधुनिक कवींना वेडाची 'सोल एजन्सी' ध्यावीशी वाटते, तर हा आक्षेपक वर्ग सर्वज्ञतेचा मक्ता आपल्याकडेच ठेवूं पाहत असतो. भूमध्यरेषेच्या एका टोंकावरील उत्तरध्रुवाप्रमाणें दुसरीकडील दक्षिणध्रुवाच्याही माथ्यावर विधात्यानें बर्फाच्या घड्या घातलेल्या आहेत, हें लहानसें तत्त्व मात्र यांच्या सर्वज्ञतेंत सामील व्हावयाचें चुकून राहिल्यासारखें वाटतें ! आधुनिक कवि मोठें गंभीर तत्वज्ञान सांगतात; पण त्याचप्रमाणें स्वतः वागत नाहींत, हा यापुढील आक्षेप आहे. या दृष्टीनें पाहतां ज्या वैराग्यपर भक्तिभावाच्या काव्याचें यांना पूर्ण रहस्य समजलेलें आहे, त्याच्या उपदेशाबरहुकूम अंगाला राख फासून निघालेला यांचा भला मोठा तांडा आपल्याला कधीं तरी पहावयाला मिळण्याची आशा वाटूं लागते. कलियुगांत चांगले कवि होणें शक्य नाहीं, हा यांनीं सहावा सिद्धान्त ठरवून ठेवलेला आहे. अर्थात् कलियुगाचा आरंभकाळ मात्र आपली कविता किंवा लेख अलीकडच्या मासिक पुस्तकांकडून परत आल्या दिवसापासून ज्याचा त्यानें स्वतंत्र दृष्ट्या मोजावयाचा असतो. मागील सातआठच शतकांत सुमारें आठदहा चांगले कवि निर्माण होऊन गेल्या पन्नास वर्षांच्या लांबलचक अवधींत शेंपन्नाससुद्धां उत्तम कवि होऊं नयेत, हें वरील विधानाचें बिनतोड प्रत्यक्ष प्रमाण आहे. हल्लींची कविता टिकाऊ नसते, हें या वर्गाचें सरतें म्हणणें असतें, आणि हा मुद्दा मात्र माझ्या

दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. जुन्या बाडांचा पसारा केला, तर त्यांतून जातकवींच्या चारचारशें वर्षांच्या मुरलेल्या कविता किती तरी काढून दाखवितां येतील; परंतु आचकालच्या एकाही कविला आपली कविता शंभर वर्षांपेक्षां जास्त टिकली आहे, असें म्हणतां येणार नाहीं ! ही क्षणभंगुरता खरोखरी लाजिरवाणी आहे !

रस्ता चुकून वाङ्मयाच्या फंदांत पडलेल्या या दोन वर्गांचें परस्परांशी जें हाडवैर असतें, त्यांच्या मानानें अहिनकुलांचे, देवदानवांचें, कोडतांच्रीं पायरी चढलेल्या सख्ख्या भावांचे वैरसुद्धां गुण्यागोविंदाच्या वागण्यासारखें निर्दोष ठरेल. दोन्ही पक्ष आपआपल्या (गैर) समजुतीप्रमाणें नेटाचे प्रयत्न करीत असतात. त्यामुळें मायभाषेला कवितेच्या काव्याबरोबर टीकांच्या नि काव्याचाही भरपूर पुरवठा होत असतो. एक पक्ष मराठी कवितेला नवाईनें बाटगी बनविण्याचा प्रयत्न करितो, तर दुसरा तिला फक्त वारकऱ्यांबरोबर तीर्थक्षेत्रांवर पाठवून अगदीं सोंवळी करण्यासाठीं धडपडत असतो. पहिल्याचा पुढील पिढीवर भरंवसा, तर दुसऱ्याची मागील लोकांवर भिस्त ! एक भविष्यपुराणवादी आणि दुसरा तर सारींच पुराणें उराशीं बाळगणारा ! जगांतील चैतन्य आपल्या कवितेमुळेंच उत्पन्न होत असतें हा पहिल्याचा अभिमान, तर प्रलयकाळ लांबणीवर पडण्याला केवळ आपली पुण्याईच कारण असल्याबद्दल दुसऱ्याची खाजरजमा ! या आक्षेपक वर्गाची जुन्या लोकांबद्दलची आस्था, चालू काळच्या तरुण मंडळीविषयींची कळकळ आणि पुढील पिढीसंबंधीं हळहळ हीं पाहिली, म्हणजे त्यांच्याबद्दल विलक्षण आदर वाटूं लागतो ! आधुनिक कवितेच्या धुडगुसामुळें आम्हां आर्यांच्या आर्यत्वाचें, इतिहासाचें, व्याकरणाचें, धर्माचें प्रासयमकांचें, नीतिमत्तेचें, सर्वस्वाचें पार वाटोळें होणार अशी यांच्या मनानें हाय खाल्लेली दिसते. भिऊं नका, जरीपुराण्यांनों ! भिऊं नका ! आधुनिक कविता कितीही बोकाळली, तरी तिनें आपलें कांहींच नुकसान होणार नाहीं ! त्या कवितेनें पुढच्या पिढीचें अहित होणें हें तुमच्या टीकांनीं आधुनिक कवींना धोका पोहोंचण्याइतकेंच दुरापास्त आहे. त्यांचीं चटसारीं काव्यें तुमच्या स्वतःच्या अप्रसिद्ध कवितांप्रमाणें (हो, हें सांगावयाचें राहिलेंच ! सार्वभौम चमत्कार असा आहे कीं, या आक्षेपकांपैकीं

बहुतेकांजवळ मात्र आपापल्या कवितांचें थोडेंबहुत भरताड हटकून असतेंच.) कोणालाही न कळवितां पचनीं पाडावयाला काळ समर्थ आहे! सरस्वतीच्या सदावर्तांत बेकार दुकाळी पाहुण्यांना सदर परवानगी असते, त्याप्रमाणें तुमच्यासारख्या सोवळेकऱ्यांची सोय होणेंही अवश्य आहे! आपापलें मत संभाळून तुमच्या त्यांच्या खडाजंगीं अशाच जोरानें चालू द्या! मात्र हल्लींच्या कांहीं सत्कवींनाही सरसकट लाथाडण्याचें जोखीम तुम्हीं आपल्या न घेतल्यास बरें; कारण हा वाद त्रिकाळ चालू असल्यामुळें तुमच्या पूर्वजांना, भवभूतीला छळतांना कालिदास वगैरेंच्या कविता जशा उपयोगी पडल्या, तुकारामाचे अभंग बुडविण्यासाठीं ज्ञानेश्वरादि कवींचीं काव्यें आधारभूत झालीं, तशा आजच्या सत्कवींच्या कविता उद्यांपरवांच्या आधुनिक कवींच्या बोकांडीला बसतांना तुमच्या वंशजांच्या कामीं येणार आहेत! आधुनिक कवींचा लौकिकही तुमच्या घराण्याप्रमाणेंच पूर्वापार चाललेला आहे! पंडितराजाच्या काळच्या ' नृत्यति पिनाकपाणौ, वगैरे उक्ति, रामदासाचीं ' धीटपाठ ' काव्यांचीं वर्णनें, किंवा तुकोबारायांचे ' घरोघरीं जाले कवि ' यांसारखे उद्गार सध्यांच्या कवींना उद्देशून केलेले नसावेत असा तर्क करण्याची मी तुमच्याजवळ नम्रपणें परवानगी मागतों! स्वतःची टिमकी वाजविण्याच्या हेतूनें लोकांच्या भाविक पूर्वजप्रियतेचा फायदा घेण्यासाठीं साधुकवींच्याभोंवतीं तुमच्यासारख्या स्वार्थसाधूंनीं मांडलेला सुळसुळाट, आणि नव्या जुन्यांतून आपली शिधासामुग्री काढणारी सालोमालोसारख्या उचल्यांची हातचलाखी, काळाप्रमाणें अनाद्यनंत आहेत! तुमच्या या धक्काबुक्कींत सत्कवींनासुद्धां थोडासा उपद्रव झाल्यास यांनीं दिलगीर होण्याचें कांहीं नाहीं! कधींकाळीं एखाद–दुसऱ्यालाच आंत घेण्यासाठीं उघडणाऱ्या सरस्वतीमंदीराच्या दरवाजानें प्रत्येक सत्कवीच्या प्रवेशकालीं पाहिल्यानें थोडी कुरकूर करणें अगदीं साहाजिकच आहे!

येणेंप्रमाणें मतभेदाच्या धांदलीमुळें चालू काळीं मराठी कविता अगदीं संकीर्ण स्वरूपाची होऊन बसली असल्यास कांहीं नवल नाहीं. इंग्रजी कविता, संस्कृत कविता, आणि जुनी मराठी कविता, या तिघांचाही तिच्यावर थोडाथोडा अंमल बसलेला आहे. फोटो घेण्याच्या कॅमेऱ्यांतील

आधीं अर्धवट उघडलेल्या कांचेवर दुसऱ्या वेळी ज्याप्रमाणें चमत्कारिक मिश्राकृति उमटते, त्याप्रमाणें आमच्या आधुनिक कविहृदयावरही उपरि-निर्दिष्ट छिन्नभिन्न काव्यसंस्कृतीमुळें विलक्षण वर्णसंकराच्या भावनांचा छाप वठत असतो. त्यामुळें सध्यांच्या कवितेच्या स्वरूपाची एकरूपता पार नाहींशी होऊन गेली आहे. संस्कृतांतील मुग्ध श्रृंगारकल्पना इंग्रजीच्या उत्तान रीतीनें प्रकट करितांना मराठी कविता सर्कशीच्या रंगणांत उत-रलेल्या मर्दानी थाटाच्या पोरीसारखी उघडी दिसते, आणि इंग्रजी ढंगानें सांगतांना तिला झगापोलका घालून शेतकाम करणाऱ्या बारदेश-गोंव्याकडील किरिस्ताविणीची कळा येते. कधीं शुद्ध मराठी गोष्टीवर इंग्रजी कल्पनेचें टोपण घालून, वरलीदादरकडे शिमग्याच्या दंगलींतून साडी-चोळीच्या साजावर टोपी चढवून नाचणाऱ्या गोमीप्रमाणें ती वागूं लागते, तर कधीं मराठी वेदान्त इंग्रजी गंभीरतेनें सांगण्याच्या भरांत, मडमेची नक्कल करणाऱ्या देशी दाईप्रमाणें किळंजून बोलत असते. अशा बकाली अवस्थेमुळें तिचे गुणधर्म इतके संख्यातीत बनले आहेत कीं, त्यांचा नुसता नामानिर्देश करणेंही एका लेखाच्या आवांक्याबाहेरचें काम आहे. त्यांतून माझ्या कवींच्या कारखान्याचा पसारा टाटा कंपनीच्या लोखंडी कारखान्यापेक्षांही वाढत चालल्यामुळें मराठी कवितेची अगदीं लांबून डोळेभेट घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

कवितेंतील वर्णभेद आम्हां हिंदु लोकांनाही लज्जेनें खालीं पहावयाला लावण्याजोगा आहे. रचनापरत्वें कवितेचा जातिभेद उभयविध आहे. संस्कृतांतून सरळ जन्म झाल्यामुळें श्लोक आणि आर्या यांची फार उच्च जातींत गणना होते. भिन्नभिन्न वृत्तांमुळें यावरील वर्गांत गोत्रभेदाचीही सोय झालेली आहे. अभंग, ओंव्या, पोवाडे ही मंडळी कनिष्ठ वर्गांत असून लावण्या, छकडी वगैरे अस्पृश्य जातींत जमा होतात. उखाणे, म्हणी, आहाणे यांना गद्य व पद्य यांच्यांमधील सरहद्दीवर राहणाऱ्या बिनआकारी टोळ्या म्हटल्यास चालेल. हुतुतूहमाम्यांसारख्या खेळांतून म्हणावयाचीं समर्पक वाक्यें किंवा 'अलीकडे गंगा' पलीकडे गंगा वाहवून त्यांच्याकरवीं शब्दब्रह्मातींत पातकांचा उद्धार करविणाऱ्या शिमग्यांतला फांका, हीं वरील वर्गांचीं अत्यंत रानटी उदाहरणें होत. यांखेरीज गायकी धर्तीच्या कवितेचा संग्रह

फार मोठा आहे. त्यांच्यांतही चालीरीतींचे लक्षावधि भेदभाव आहेत. युरोपियन लोकांच्या निकट सहवासानें ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील मूळच्या अगणित जातींत युरेजियन, गोवाजीन वगैरे नवीन भर पडली आहे, याप्रमाणें इंग्रजी कवितेच्या वशिल्यानें आमच्या इकडे चतुर्दशकें, वैणिकें इत्यादि नवनवे प्रकार प्रचारांत येत आहेत. शिवाय, मनुष्याच्या मागें जसे राक्षसगण, मनुष्यगण या प्रकारचे उपजत उपद्व्याप लागलेले असतात, तसें अक्षरांतही कोमल, कठोर वगैरे भेद जात्याच ठरून बसलेले आहेत. इतकेंच नाहीं, तर संस्कृत साहित्यशास्त्रानें निरनिराळ्या गणांचीं आणि अक्षरांचीं कायमचीं शुभाशुभ लक्षणेंही ठरवून टाकलेलीं आहेत.

वर्ण्यविषयपरत्वेंही कवितेचे असेच अनेक प्रकार झालेले आहेत. महाकाव्याची रचना फार मोठी असून त्यांतील लोकांना राष्ट्रहितैकपर समाजशासनपद्धतीबरहुकुम वागणाऱ्या स्पार्टन लोकांप्रमाणें व्यक्तिशः जीवितस्वातंत्र्य मुळींच मिळत नाहीं. खंडकाव्यें तशाच वळणाचीं, पण लहान लहान असल्यामुळें त्यांची उभारणी नागपुरांतील बोहरी लोकांच्या मेहेंदीबाग संस्थेसारखी दिसते, एवढेंच! मासिक पुस्तकांतून येणाऱ्या छोट्या कविता अविभक्त कुटुंबपद्धतीच्या वळणावर जातात. आपलें सर्वस्व बरोबर वागविणाऱ्या सुभाषितांचा कंपू यद्यपि एकोप्यानें हिंडत असतो, तरी त्यापैकीं कोणालाही आगापिछा नसल्यामुळें त्याला बैराग्यांच्या तांड्याची उपमा देतां येईल. धावे, पाळणें ही पडदानशीन मंडळी असते. तसाच मंगलाष्टकांचा मेळाही कधीं लग्नमंडपाच्या बाहेर पडत नाहीं. भूपाळ्या पहांटेलाच म्हटल्या जात असल्यामुळें मला त्यांबद्दल विशेष माहिती नाहीं. आरत्या, मुरळ्यांप्रमाणें केवळ देवांना वाहिलेल्या असतात. शिवाय संस्कृत कवितेच्या मार्मिक अनुकरणामुळें कूट प्रश्न, कर्तृ गुप्तें क्रियापदें, कर्मगुप्तें, भावगुप्तें इत्यादि अनेक अवघड काव्यप्रकारही मराठींत उतरतांना दिसून येतात. परंतु यांचा प्रचार अतिशय थोड्या प्रमाणावर असल्याकारणानें माझ्या तद्विषयक कल्पना बऱ्याच अंधुक असण्याचा फार संभव आहे; म्हणून पुढील माहिती साशंकवृत्तीनेंच स्वीकारण्याची वाचकांना विनंती आहे. कूटप्रश्नांत एखादे कोडें सांगितलेलें असतें उत्तर हूडकून काढण्यासाठीं 'षण्मासिचा वायदा' सवतीदाखल देणारें,

'विचित्र पुतळा' किंवा 'विलक्षण वधू' यांच्यासंबंधीचें मराठी कूटश्लोक बहुश्रुत वाचकांना ठाऊक असतीलच. शिवाय ज्या कविता वाचून पाहिल्यावर कवीला काय म्हणावें, याचें वाचकांना मोठें कोडें पडतें, त्यांचीही मी याच सदरांत गणना करितों. कर्मगुप्तांत किंवा क्रियागुप्तांत अनुक्रमें कर्म किंवा क्रियापद शब्दांच्या संधिसमासांत दवडून ठेविलेलें आणि तें वाचकानें हूडकून काढावयाचें असतें. कर्तृगुप्तांत कर्ता नापत्ता होण्याचा प्रयत्न करीत असतो. अलीकडे आपण कविता करून स्त्री-शिक्षणपर सहानुभूतीचा फायदा घेण्यासाठीं बायकांच्या नांवानें त्या छापावयासाठीं पाठविण्याचा शिरस्ता पडूं पहात आहे तोच कर्तृगुप्ताचा मराठी मासला असावा ! भावगुप्तांतून भावार्थ सहसा लक्षांत येत नाहीं, हल्लीची बहुतेक मराठी कविता या सदराखालीं येते. इंग्रजी कविताचाही नवा पायंडा अलीकडे पडूं लागला आहे. 'मिस्टिक' कवितेंत अत्यत गहनार्थ अगदीं अंधुक रीतींनें ध्वनित केलेला असतो. वाच्यार्थांतून तो अंशतः शोधून काढावयाचें काम वाचकांकडे सोंपविलेलें असतें; पुष्कळ प्रसंगीं कवि 'मुर्ख; भ्रमिष्ट, अजाण' वगैरे जीं विशेषणें स्वतःकडे लावून घेत असतो, ती सत्यार्थानें अथवा शालीनतेनें, याचा वाचकांना नीटसा उलगडा होत नाहीं. हीं सारीं 'मिस्टिक' कविता होय. 'पॅस्टोरल' कविता धनगराच्या जीवनक्रमाला वाहिलेली असते. अशा धनगरी कवितेचें मराठी 'मेंढ्यावरी लोंकर दाट भारी' हें एकच उदाहरण काय तें ऐकण्यांत येतें !

मराठी कवितेच्या एका बऱ्याच मोठ्या भागाचें वर्णन करावयाचें चुकून राहिलें आहे. हा भाग म्हणजे संगीताच्या वशिल्यानें नाटकांत घुसलेल्या पदांचा होय. मात्र, इतर प्रकारची कविता जसजशी जास्त मुरेल तसतशी नॉर्वे देशांतील भाकरीप्रमाणें अधिकाधिक रुचकर होत जाते; तसा यांचा प्रकार नाहीं. नाटकी पदांचा जमाना सारखा बदलत असतो. पहिल्यापहिल्यानें रसपोषासाठीं यांच्यांत काव्यसौंदर्याचा उत्कर्ष साधण्याकडे लेखकांची प्रवृत्ति असे. परंतु नाट्यसंगीताचा गायकी चालीकडे मोर्चा वळल्यामुळे अलीकडे मात्र कोठें ही पाहिलें तरी पण नाहीं मी बोलत आतां ! कारण, लौकरच नाटकाविषयासंबंधी स्वतंत्रपणें लिहिण्याचा माझा इरादा आहे.

कविता करतां येण्याला गणमात्रांचें ज्ञान अतिशय अवश्य आहे. अक्षरांच्या ऱ्हस्वदीर्घत्वाप्रमाणें तीं लघु किंवा गुरु ठरत असून 'लघूची तीं एक मात्रा गुरुच्या दोन मानिती' हा तद्विषयक मुख्य नियम आहे. याशिवाय कांहीं किरकोळ नियमही आहेत. आर्या, गीति वगैरे मात्रागणवृत्तांतून व पद्यांतून मात्रांची मोजदाद ठेवायची असते, आणि श्लोकांच्या रचनेला तीनतीन अक्षरांच्या गणांची आवश्यकता असते. गुजराती कवितांतून दीर्घ अक्षरांना मारून मुटकून लघुत्व देण्यासाठीं किंवा लघु अक्षरांना गुरुपदीं बसविण्यासाठीं त्यांच्या डोक्यावर अनुक्रमें ˘ आणि–अशा खुणा ठेवण्याचा रिवाज आहे. यामुळें वर ओळीचा बांध नसल्यामुळें गद्यांत जीं गुजराती अक्षरें देशावरच्या धाब्याच्या घरांसारखीं दिसतात तींच कवितेंत या खुणांच्या योगानें, रिकाम्या टोपल्या वाहणाऱ्या मुंबईतल्या हेलकऱ्यांसारखीं किंवा नारळींच्या चोडांची ने-आण करणाऱ्या मलबारी मजुरांसारखीं दिसावयाला लागतात. मराठी कवि मात्र असा खुणांखुणांचा अजागगळपणा कधींच दाखवीत नाहींत. कारण त्यांना बहुतकरून गणमात्रांची मुळींच माहिती नसते !

कवितेला नटविण्यासाठीं अलंकारांची जरूर असते. त्यांचे शब्दालंकार व अर्थालंकार असे दोन स्थूल भेद असून प्रत्येकाचे कोट्यावधि सूक्ष्म पोटभेद आहेत. अर्थालंकारांपैकीं एकट्या उपमेचे चौऱ्यायशीं प्रकार आहेत असें म्हणतात. तूर्त आपणाला या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत पडण्याचें कांहींएक कारण नाहीं. ठोकळ नगांची माहिती झाली म्हणजे बस्स आहे. शब्दालंकारांत यमक व प्रास यांना मुख्य महत्त्व मिळालेलें आहे. यमकें देशादेशाच्या रिवाजाप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. मराठी–गुजराती कवितांना सबंध अक्षरांचें यमक जुळविण्याची आटाआट असते; इंग्रजींत शेवटच्या स्वराशीं स्वर जमला म्हणजे यमकाची पूर्णता होते. संस्कृतांत स्तोत्रें, अष्टकें वजा जातां, अन्यत्र कोठेंही यमकें दिसत नाहींत; तर फारसी वाङ्मयांत पद्याप्रमाणें गद्य वाक्यांचीही यमकें जमवितात. मराठींत संस्कृतांतील सयमक अपवादाइतकाच भाग, फार झालें तर निर्यमक असेल. इंग्रजी यमकांचा मुळींच विधिनिषेध नाहीं. ( मराठींतील हा निर्यमक भाग अगदीं आधुनिक कवींनींच केलेला आहे. जुन्या कवि-

तेंत थोरल्या शास्त्रीबुवांच्या 'ज्याची स्पर्धा' इत्यादि श्लोकांचे शेवटचे व 'गोविंद गोपाळ हे दोन बंधू' या श्लोकांतील पहिले चरण, हीच निर्यमक उदाहरणें आहेत.) मराठींत अनुष्टुप् श्लोकाला मात्र नजरचुकीनें निर्यमक फिरण्याची सवलत मिळालेली असून आर्यांच्या दुसऱ्या-चवथ्या चरणांचीं यमकें जोडण्याचा विलक्षण प्रघात पडला आहे. इकडे इंग्रजी-मराठींत यमकाक्षरें एकाच शब्दाचीं असून चालत नाहींत, तर तिकडे उर्दू-फारशींत दहादहा चरणांच्या शेवटीं एकच शब्द यमकांची बाजू राखीत असतो. आमच्यांतही पोथींतल्या ओव्यांच्या तीन चरणांचीं यमकें जमून चौथा आडमाप असतो, तर बायकांच्या ओंव्यांतून दुसऱ्यातिसऱ्या चरणांचेंच यमक दिसून येतें. मराठींतून यमकें साधण्याच्या व्यासंगाचीं सर्व प्रकारचीं उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. पैकीं 'अनलसमीहित' हीं दोन्ही एकरूप चरणाचीं आर्या एका टोंकावर असून, 'ल, ळ' 'त, ट' 'ह, व, य, अ' यासारख्या अक्षरांचीं यमकें जुळविण्याच्या सवलतीचा फायदा घेणारीं उदाहरणें दुसऱ्या टोंकाशीं पडलेलीं आहेत. प्रास हें यमकाचेंच जुळें भावंड होय. त्याच त्याच अक्षरांच्या पुनरावृत्तीनें प्रास तयार होत असतो. व्यवहारांतील उदाहरण द्यावयाचें असल्यास, मुंबईच्या रस्त्यावरून चारचार पांचपांच घरें टाकून चहाच्या दुकानांचा प्रास साधला आहे असें म्हणतां येईल. श्लेषालंकार हाही शब्द व अर्थ या दोघांच्याही मदतीनें तयार होतो. श्लिष्ट शब्दाला दोन अर्थ असल्यामुळें तद्युक्त वाक्यांकडे, एकीकडून कृष्णाच्या रासक्रीडेचें आणि दुसरीकडून रामपंचायतनाचें, अशीं एकाच कागदावर दोन चित्रें दाखविणाऱ्या तसबिरीप्रमाणें निरनिराळ्या दृष्टींनीं पहावयाचें असतें. शब्दालंकारांत चित्रबंध, पद्मबंध वगैरे हजारों करामती असतात. या प्रकारच्या कौशल्यांत भूमितीचीं वर्तुळें, ज्योतिषांतील कुंडल्या, कमळाच्या पाकळ्या वगैरे सर्वच प्रकार सामील झाल्यामुळें प्रेक्षकाला गणितविद्या, चित्रकला, कविता; ज्योतिःशास्त्र या सर्वांच्या प्रीतिभोजनाचा भास होतो. संस्कृत काव्यांत कांहीं श्लोकांतून दोनच आणि कांहींतून तर फक्त एकाच अक्षरावर सारी कसरत करून दाखविलेली पाहण्यांत येते. या सर्व प्रकारच्या शब्दच्छलाची यद्यपि तज्ज्ञांनीं अधमकाव्यांत गणना केली असली, तरी त्याचा

-व्यामोह मात्र फारच जबरदस्त आहे. मोठमोठ्या सत्कवींनाही या सैतानानें पछाडलेलें आहे. रसाळ वाणीच्या वामनपंडितासारख्या थोर सत्कवीनेंसुद्धां रसिकांना 'वंशी नादनटी तिला कटितटीं' या प्रकारच्या 'टीपाऱ्यां' देऊन 'यमक्या' ही पदवी कमाविली आहे! अर्थालंकारांच्या सम्यग्ज्ञा-पोटीं वाचकांना थोडक्यांत एवढें सांगतां येईल कीं, "काव्यप्रकाश वाचा."

---

५५६०
७९०९
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
REFBK-0005567

# राम गणेश गडकरी वाङ्मय

## नाटकें

(१) संगीत एकच प्याला
(२) संगीत प्रेमसंन्यास
(३) संगीत पुण्यप्रभाव
(४) संगीत भावबंधन
(५) संगीत वेड्यांचा बाजार
(६) संगीत गर्वनिर्वाण
(७) संगीत राजसंन्यास

## विनोदी

(१) रिकामपणची कामगिरी
(२) संपूर्ण बाळकराम

## काव्य

(१) वाग्वैजयंती

## बालवाङ्मय

(१) चिमुकली इसापनीति
(२) दोन चुटके